अध्याय सतरावा.

श्रीगणेशाय नमः । ॐ नमो श्रीगुरु महामेरू । सूक्ष्मस्वरूपें तूं गिरिवरू । चैतन्यस्वभावें अतिथोरू । तूं आधारू सर्वांचा ॥ १ ॥ तुझ्या निजबोधाचीं शिखरें । वैकुंठकैलासादि अतिथोरें । तेथें ब्रह्माविष्णुमहारुद्रें । तुझेनि आधारें नांदिजे ॥ २ ॥ तुझिया आधारस्थितीं । नांदती त्रैलोक्यें लोकपंक्ती । सकळ भूतांची उत्पत्ति स्थिती । निदान अंतीं तुजमाजीं ॥ ३ ॥ सुरासुर लहानथोर । एक सौम्य एक क्रूर । इयें भूतें धरूनी निर्विकार । स्वरूप साचार पैं तुझें ॥ ४ ॥ तेथ विवेकाचे आगर । सच्चिदानन्दाचे रत्नाकर । तेथील लाधल्या कांकर । नीच ते थोर वेव्हारे होती ॥ ५ ॥ ज्याच्या औषधींचा

मराठींत बोलविलें. याचें मात्र माझें मलाच आश्चर्य वाटतें. ३७ यास्तव एकनाथ श्रीजनार्दनाला शरण आहे ज्याची अशी पूर्ण कृपा आहे, त्याच्या श्रीचरणांचें स्मरण करून हा सोळावा अध्याय समाप्त केला. ३३८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील
विभूतियोग नांवाचा सोळावा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूपी श्रीगुरुराया ! तुला नमस्कार असो. तूं महामेरु पर्वत आहेस; परंतु तूं सूक्ष्मरूप असल्यामुळें कोणाला दिसत नाहींस. तरीहि चैतन्यस्वरूपानें अतिशय उंच असल्यामुळें तूं सर्वांचा आधार आहेस. १ तुझ्या आत्मज्ञानाचीं शिखरें वैकुंठ-कैलासाहूनहि फार उंच आहेत. ब्रह्मदेव विष्णु-महारुद्र हे तुझ्याच आधारानें तेथें नांदतात. २ तुझ्या आधारानेंच त्रैलोक्यादि अनेक भुवनें राहिलीं आहेत. सगळ्या भूतांची उत्पत्ति-स्थिति-क्षय यांचें मूळ कारण तूंच आहेस. ३ लहान-मोठे, सुर-असुर, कोणी सौम्य, कोणी क्रूर, अशीं अनेक प्रकारचीं भूतें धारण करूनहि तुझें स्वरूप निर्विकारच आहे. ४ तेथें विवेकाचें आगर व सच्चिदानंदरूपी रत्नांच्या खाणीच आहेत. त्यांतील एक जरी खडा हातीं आला तरी हीन मनुष्यहि मोठा व्यापारी बनतो. ५ त्याच्यावरील औषधींचा तर असा चमत्कार आहे कीं, त्यांचें सेवन करणारा तत्काल अजरामर होतो. त्या मेरुपर्वतांतून

चमत्कार । सेवितां करी अजरामर । जेथ चिद्गंगेचे निर्झर । निरंतर प्रवाहती ॥ ६ ॥ जो सुरनरांचा विश्राम । जो सकळ आश्रमांचा आश्रम । जो क्रियाकर्मांचें नैष्कर्म्य । जो निजधाम जीवाचें ॥ ७ ॥ जो भजनाची कुळवाडी । जो भक्तजीवनाची कडी । आवडीची जो निजआवडी । जो गोडियेची गोडी निजात्मता ॥ ८ ॥ ऐसा सद्गुरु महामेरू । जो कठिणत्वेंवीण आधारू । ज्याचेनि अंगें संसारू । होय सुखकरू साधकां ॥ ९ ॥ त्या साधकांचें समाधान । शिष्यांचा स्वानंदघन । आर्त चातकां निजजीवन । स्वामी जनार्दन तुष्टला ॥ १० ॥ तयाचा जो चरणप्रसादु । श्रीभागवतीं एकादशस्कंधू । पूर्वार्धाचा विनोदू । भाषाप्रबंधू वाखाणिला ॥ ११ ॥ तेथें उद्धवें पुशिल्या विभूती । त्या षोडशाध्यायीं श्रीपती । सांगीतल्या यथानिगुतीं । भजनस्थितीलागोनी ॥ १२ ॥ त्याविभूतींमाजीं निजवर्म । भक्तांचें जें भजनकर्म । तें मी केवळ आत्माराम । ऐसें पुरुषोत्तम बोलिला ॥ १३ ॥ तेथ आशंकेची व्युत्पत्ती । करितां कर्मांची कर्मगती । कर्मठ जाहले नेणों किती । तरी कर्में मुक्ती घडे केवीं ॥ १४ ॥ कर्में करितां वाडेंकोडें । कर्मीं कर्मठता न चढे । कर्मांमाजीं मोक्ष आंतुडे । हेंचि रोकडें पुसों पां ॥ १५ ॥ स्वयें बोलिला श्रीपती । सात्विकांची जे कर्मस्थिती । तें कर्मचि माझी विभूती । हें सोळाव्याअंतीं निरूपिलें ॥ १६ ॥ स्वयें आचरितां स्वकर्म । तें कर्मचि होय ब्रह्म । हेंचि कर्मक्रियेचें वर्म । देवासी सुगम पुसों पां ॥ १७ ॥ ऐसा पोटींचा आवांका । तेचि पुसावया आशंका । वर्णाश्रमांची स्वधर्मपीठिका । देवासी देखा पुसत ॥ १८ ॥

ज्ञानगंगेचे झरे वहात असतात. ६ जो सुरअसुरांचें विश्रांतिस्थान; जो ब्रह्मचर्यादि सगळ्या आश्रमांचा आश्रम; जो क्रिया-कर्मांचें नैष्कर्म्य; जो जीवांचें माहेरघर; ७ भजनाचें क्षेत्र; जो भक्तांच्या भजनाचा दुवा; जो आवडीचीहि आवड, जो आत्मानुभवाच्या गोडीचीहि गोडी; ८ ज्याच्या योगें साधकाचा संसार सुखमय होतो; असा जो सद्गुरुरूपी महामेरु तो कठिणपणावांचूनच सर्वांना आधार देतो. ९ साधकांचें समाधान व शिष्यांना आनंदरूप, अशा मुमुक्षुरूपी चातकांचें जीवन असलेला जो जनार्दनस्वामी तो प्रसन्न झाला. १० त्याच्या चरणप्रसादानें भागवतांतील अकराव्या स्कंधाचा पूर्वार्ध मोठ्या प्रेमानें कवितारूपानें सांगितला. ११ त्यांत उद्धवानें श्रीकृष्णाला विभूति विचारिल्या. श्रीहरीनें सोळाव्या अध्यायांत त्यांचें सविस्तर वर्णन करून भजनाची स्थितीहि सांगितली. १२ त्या विभूतींचें वर्म म्हणजे भक्तांची सर्व भजनक्रिया मी आत्मारामच आहें, असें श्रीकृष्णानें सांगितलें. १३ तेव्हां त्यावर अशी आशंका आली कीं, कर्में आचरित असतां किती लोक केवळ कर्मठ होऊनच बसतात, याची गणती नाहीं, असें असतां कर्मानें मुक्ति कशी मिळते! १४ आवडीनें कर्में करीत असतां त्यांविषयीं अभिमान न ठेवितां, त्या कर्मांपासून मोक्षप्राप्ति होईल असा उपाय प्रत्यक्षच विचारूं या. १५ कारण सात्त्विक लोकांचें जें कर्म तें माझीच विभूति आहे, असें सोळाव्या अध्यायाच्या शेवटीं श्रीकृष्णानें स्वतःच सांगितलें आहे. १६ आपण स्वकर्म आचरिलें असतां तें कर्मच ब्रह्मस्वरूप होतें. हें कर्म-क्रियेंतील वर्म सोपें करून सांगण्याविषयीं देवाला विचारूं या. १७ याप्रमाणें उद्धव आपल्या मनांतील या शंकेचें निरसन करून घेण्यासाठीं श्रीकृष्णाला वर्णाश्रम व स्वधर्म यांची मूळपीठिका विचारूं लागला. १८

उ० उ०–यस्त्वयाऽभिहितः पूर्वं धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः। वर्णाश्रमाचारवतां सर्वेषां द्विपदामपि ॥ १ ॥
यथानुष्ठीयमानेन त्वयि भक्तिर्नृणां भवेत्। स्वधर्मेणारविन्दाक्ष तत्समाख्यातुमर्हसि ॥ २ ॥

उद्धव ह्मणे गा भक्तपती। ऐकतां तुझ्या निजविभूती। मज ऐसें गमलें चित्तीं। स्वधर्मेंसी भक्ति घडे कैसी ॥ १९ ॥ तुवां कल्पादि वाडेंकोडें। स्वधर्मकर्में भक्ति जोडे। हें वर्णाश्रमनिजनिवाडें। निरूपण चोखडें निरूपिलें ॥ २० ॥ सर्वां मानवां परम गती। स्वधर्में घडे भगवद्भक्ती। या निरूपणाची निगुती। तुवां निश्चितीं निरूपिली ॥ २१ ॥

ऐक कमलनयना अच्युता। जो कां स्वधर्म अनुष्ठितां। तुझी निजभक्ति स्वभावतां। प्राण्याच्या हाता जेणें लाभे ॥ २२ ॥ ते कर्मकुशलतेची स्थिती। मज सांगावी सुनिश्चितीं। कमलनयना कमलापती। कृपामूर्ती माधवा ॥ २३ ॥ तूं ऐसें ह्मणशील श्रीपती। म्यां कल्पाचे आधीं कवणाप्रती। सांगीतली स्वधर्मस्थिती। तरी ते विनंती अवधारीं ॥ २४ ॥

पुरा किल महाबाहो धर्मं परमकं प्रभो। यत्तेन हंसरूपेण ब्रह्मणेऽभ्यात्थ माधव ॥ ३ ॥
स इदानीं सुमहता कालेनामित्रकर्शन। न प्रायो भविता मर्त्यलोके प्रागनुशासितः ॥ ४ ॥

[उद्धवानें या सतराव्या अध्यायांत भक्तिलक्षण स्वधर्माविषयीं प्रश्न केला आसतां ब्रह्मचारी व गृहस्थ यांचा हंसानें सांगितलेला धर्म भगवान् सांगतात.]

—सोळाव्या अध्यायाच्या बत्तिसाव्या श्लोकांत भगवानाच्या भक्तीनें केलेलें मोक्षसाधनरूप कर्म मी आहें असें सांगितलें. तसेंच मीं सांगितलेल्या धर्मामध्यें तूं सावधान चित्तानें रहा. इत्यादि वाक्यांनीं ठिकठिकाणीं भगवानांनीं कर्मांचें भक्तिसाधनत्व सांगितलें; पण कर्मांचें अनुष्ठान करणाऱ्या लोकांमध्यें भक्ति नियमानें दिसत नाहीं, म्हणून उद्धव पुढील सात श्लोकांनीं प्रश्न करीत आहे—

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला, हे अरविंदाक्ष त्वया पूर्वं वर्णाश्रम चारवतां सर्वेषां द्विपदां अपि नृणां यः त्वद्भक्तिलक्षणः धर्मः अभिहितः–हे भगवन्! तूं कल्पाच्या आरंभीं वर्ण व आश्रम यांच्या आचारांनीं युक्त असलेल्या व वर्णाश्रमहीन अशाहि सर्व मनुष्यांचा जो ईश्वरभक्तिलक्षण धर्म सांगितलास, अनुष्ठीयमानेन स्वधर्मेण यथा त्वयि भक्तिः भवेत् तत् समाख्यातुं अर्हसि–त्याचें स्वधर्मानुसार अनुष्ठान केल्यानें ज्या प्रकारें तुझ्या विषयींची भक्ति उत्पन्न होते, तो प्रकार मला सांगण्यास तूंच योग्य आहेस. १–२.

उद्धव म्हणाला कीं, हे भक्तांच्या ईश्वरा! तुझ्या आत्मविभूति ऐकून माझ्या मनाला असें वाटूं लागलें आहे कीं, स्वधर्मानें भक्ति कशी घडेल! १९ स्वधर्मकर्मानेंच भक्ति प्राप्त होते, असें तूं कल्पाच्या प्रारंभापासूनच सांगत आहेस व त्यासाठीं वर्णाश्रमधर्मांची व्यवस्था तूं उत्कृष्ट रीतीनें करून ठेविली आहेस २० व स्वधर्मानेंच भगवद्भक्ति घडून सर्व मानवांना परम गति प्राप्त होते, असें तूंच यथार्थ व निश्चित निरूपण केलें आहेस. २१

हे कमलनयना अच्युता! ऐक. ज्या स्वधर्माचें आचरण केलें असतां तुझी भक्ति भक्तांना सहज लाभते, २२ तें त्या कर्मांच्या कुशलतेचें निश्चित लक्षण मला सांग. हे कमललोचना, लक्ष्मीपते, दयाळु माधवा! २३ हे श्रीपते! तूं जर असें म्हणशील कीं, मीं कल्पाच्या आधीं स्वधर्माची स्थिति कोणाला सांगितली, तर ऐक. २४.

—'उद्धवा! संप्रदायावरूनच तुला हें कळेल. मी आणखी कशाला सांगूं' असें भगवान् म्हणेल, म्हणून उद्धव म्हणतो—

महाबाहो प्रभो माधव–हे पराक्रमी स्वामिन् माधवा! पुरा किल तेन हंसरूपेण ब्रह्मणे यत् परमकं धर्मं अभ्यात्थ–पूर्वीं हंसरूपानें ब्रह्मदेवाला तूं जो परम सुखरूप धर्म सांगितलास, सः इदानीं सुमहता कालेन–तो आतां फारच मोठा काल मध्यें गेल्यामुळें, अमित्रकर्शन प्राक् अनुशासितः मर्त्यलोके न भविता–हे शत्रुनाशका! तूं पूर्वीं सांगितलेलाहि तो धर्म मनुष्यलोकामध्यें प्रायः रहाणार नाहीं. ३-४.

ज्याच्या बाहूंचा प्रताप अद्भुत । विश्वमर्यादा धर्मसेत । राखों जाणे यथास्थित । त्यालागीं ह्मणिपत महाबाहो ॥ २५ ॥ स्वधर्मकर्मांचा द्योतकू । अनादि वक्ता तूं एकू । वर्णाश्रमादि विवेकू । उपदेशकू तूं स्रष्ट्याचा ॥ २६ ॥ पूर्वीं हंसरूपें सविस्तर । बोलिलासी स्वधर्मांचा निर्धार । त्यांतील तुवां अध्यात्मसार । निवडूनि साचार मज सांगीतलें ॥ २७ ॥ तेथील स्वधर्माचें लक्षण । मज न कळेचि निरूपण । जें तूं हंसरूपें आपण । स्वधर्म जाण बोलिलासी ॥ २८ ॥ तुझेनि मुखें यथोचितें । भक्तियुक्त आश्रमधर्मातें । सनत्कुमार जाहले श्रोते । तेंचि मातें सांगावें ॥ २९ ॥ भणसी सनत्कुमारद्वारा । धर्म विस्तारला परंपरा । तो विचारूनि करीं निर्धारा । हें सारंगधरा घडेना ॥ ३० ॥

काम क्रोध लोभ अभिमान । हे भक्तांचे वैरी सहाजण । त्यांचें तूं करिशी निर्दळण । अरिमर्दन या हेतू ॥ ३१ ॥ भक्तांचें अरिनिर्दळण । तुजवांचोनि कर्ता आन । तिहीं लोकीं नाहीं जाण । अनन्यशरण यालागीं ॥ ३२ ॥ तुवां कल्पाचिये आदीसी । उपदेशिलें सनकादिकांसी । बहुकाळ जाहले त्या बोलासी । ते धर्म कोणापाशीं प्रायशा नाहीं ॥ ३३ ॥ प्रायशा ये काळीं नर । नाहीं स्वधर्मीं तत्पर । शिश्नोदरीं अत्यादर । स्वधर्मविचार विसरोनी ॥ ३४ ॥ यथातथ्यें धर्मप्रतिष्ठा । करी ऐसा नाहीं उपदेष्टा । यालागीं जी वैकुंठा । स्वधर्मनिजनिष्ठा मज सांग ॥ ३५ ॥

वक्ता कर्ताऽविता नान्यो धर्मस्याच्युत ते भुवि । सभायामपि वैरिंच्यां यत्र मूर्तिधराः कलाः ॥ ५ ॥
कर्त्राऽवित्रा प्रवक्त्रा च भवता मधुसूदन । त्यक्ते महितले देव विनष्टं कः प्रवक्ष्यति ॥ ६ ॥

ज्याच्या बाहूंचा पराक्रम मोठा विलक्षण असतो व जो विश्वमर्यादेंतील धर्मरूपी सेतु व्यवस्थित ठेवण्याचें जाणतो, त्याला महाबाहु असें म्हणतात. २५ तूं स्वधर्मांचा प्रकाशक आहेस. तूंच एक अनादि वक्ता आहेस. वर्णाश्रमधर्मांचा विवेक करून ब्रह्मदेवाला उपदेश करणाराहि तूंच आहेस. २६ पूर्वीं (चवदाव्या अध्यायांत) तूं हंसरूपानें जो स्वधर्मांचा निर्धार केला होतास, त्यांतील आत्मज्ञानाचें सार निवडून तूं मला उत्तमप्रकारें सांगितलेंस, २७ पण त्यांतील जें स्वधर्माचें लक्षण तूं हंसरूपानें बोलला होतास तें मला कळलें नाहीं. २८ तुझ्या तोंडून सनत्कुमारांनीं जो यथार्थ भक्तियुक्त आश्रमधर्म ऐकिला, तोच मला आतां सांगावा. २९ हे सारंगधरा ! तूं जर म्हणशील कीं, मी सनत्कुमारांच्या द्वारां परंपरेनें धर्म पसरविला आहे, त्याचा विचार करून निश्चय कर, तर तें शक्य नाहीं. ३०.

भक्तांचे काम, क्रोध, लोभ, अभिमान इत्यादि सहा वैरी आहेत; त्यांचें तूं निर्दालन करितोस; म्हणून तुला अरिमर्दन म्हणतात. ३१ भक्तांच्या शत्रूंचा नाश करणारा सगळ्या त्रिभुवनांत तुझ्यावांचून दुसरा कोणी नाहीं. यास्तव मी तुला अनन्यशरण आलों आहें. ३२ तूं सृष्टीच्या आरंभीं सनकादिकांस उपदेश केला होतास. त्याला कितीतरी काळ होऊन गेला. आतां तो धर्म बहुधा कोणाला ठाऊकहि नसेल. ३३ कारण सांप्रत काळीं लोक प्रायः स्वधर्मांत तत्पर नसतात. ते स्वधर्मांचा विचार विसरून कामासक्ति व उदरपूर्ति यांतच अत्यंत लुब्ध झालेले असतात. ३४ यथार्थ धर्मप्रतिष्ठेचा उपदेश करणारा कोणीच नाहीं. यास्तव हे वैकुंठाधीशा ! मला स्वधर्माची आत्मनिष्ठा सांग. ३५.

—उद्धव याविषयीं हेतु सांगतो—

अच्युत–हे अच्युता, भुवि धर्मस्य वक्ता कर्ता अविता ते अन्यः न–या भूलोकीं त्या धर्माचा वक्ता, कर्ता व रक्षिता तुझ्याहून दुसरा कोणी नाहीं, यत्र वैरिंच्यां सभायां अपि मूर्तिधराः कलाः–कारण कीं, ब्रह्मदेवांच्या सभेंत सुद्धां मूर्तिमंत वेदादि कला आहेत. मधुसूदन–हे मधुसूदना ! कर्त्रा अवित्रा प्रवक्त्रा च भवता महीतले त्यक्ते सति–कर्ता, रक्षिता व प्रवक्ता अशा तुजकडून या भूतलाचा त्याग केला गेला असतां, देव–हे देवा ! विनष्टं कः प्रवक्ष्यति–नष्ट झालेल्या त्या धर्माचा कोण उपदेश करील ! ५–६.

अलुप्तज्ञान धर्मवक्ता । ये भूलोकीं गा तत्त्वतां । तुजवांचोनि अच्युता । आणिक सर्वथा असेना ॥ ३६ ॥ एक शास्त्रमर्यादाव्युत्पत्ती । कर्मकलाप बोलों जाणती । परी कर्माची आचरती गती । तेही नेणती तत्त्वतां ॥ ३७ ॥ यालागीं गा भगवंता । धर्माचा कर्ता वक्ता । धर्म विस्तारूनि रक्षिता । आणिक सर्वथा असेना ॥ ३८ ॥ पाहतां या लोकांच्या ठायीं । तुजऐसा सर्वज्ञ नाहीं । ऐसें विचारितां लोकीं तिहीं । तुजसमान नाहीं सांगता ॥ ३९ ॥ जरी सत्यलोक पाहणें । जेथें चारी वेद षड्दर्शनें । इतिहास स्मृति पुराणें । मूर्तिमंतपणें उभीं असतीं ॥ ४० ॥ तेथें सनकादिकांचा प्रश्न । ब्रह्मयासी न सांगवे जाण । तुवां हंसरूपें येऊन । समाधान दीधलें ॥ ४१ ॥ ते ब्रह्मसभेच्या ठायीं । तुजऐसा वक्ता नाहीं । तो तूं भक्तानुग्रहें पाहीं । या लोकांच्या ठायीं मूर्तिमंत ब्रह्म ॥ ४२ ॥ तेणें तुवां सर्व कर्मधर्मसंस्था । करूनि दाविली तत्त्वतां । तो तूं निजधामा गेलिया आतां । स्वधर्मवक्ता मग कैंचा ॥ ४३ ॥ भक्तियुक्त स्वधर्मगती । सांगावया यथास्थिती । तुजवांचोनियां श्रीपती । आणिकासी शक्ती असेना ॥ ४४ ॥ तूं भक्तसाह्य जगज्जीवन । भक्तमदगजभंजन । यालागीं नांवें मधुसूदन । ऐसें प्रार्थून बोलत ॥ ४५ ॥

तत्त्वं नः सर्वधर्मज्ञ धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः । यथा यस्य विधीयेत तथा वर्णय मे प्रभो ॥ ७ ॥

तूं सर्वज्ञ ज्ञानमूर्ती । तरी मनुष्यांची कर्मगती । वर्णाश्रमांची धर्मस्थिती । यथानिगुतीं मज सांग ॥ ४६ ॥ वर्णबाह्याचें निजकर्म । तेंही सांगावें विहित कर्म । उद्धवें प्रार्थिला पुरुषोत्तम । तेणें मेघश्याम तुष्टला ॥ ४७ ॥ सकळ जनांचा हितकर । उद्धवें प्रश्न केला सधर । तो ऐकोनि शुक-

---

हे अच्युता ! ज्याचें ज्ञान लुप्त झालें नाहीं, असा धर्मोपदेशक या भूलोकीं तुझ्यावांचून दुसरा कोणीहि नाहीं. ३६ कित्येक विद्वान् शास्त्रीय ग्रंथांचा अर्थ व अखिल कर्में यांचा उपदेश कसा करावा, तें मात्र चांगलें जाणतात. परंतु त्या कर्मांचें आचरण कसें करावें तें जाणत नाहींत. ३७ म्हणून हे भगवन् श्रीकृष्णा ! धर्म करणारा, तो सांगणारा व त्या धर्माचा प्रसार करून त्याचें रक्षण करणारा तुझ्यावांचून दुसरा कोणीहि नाहीं. ३८ या लोकींच केवळ तुझ्यासारखा सर्वज्ञ नाहीं असें नाहीं, तर विचारपूर्वक पाहिलें असतां सगळ्या त्रिभुवनांत तुझ्यासारखा उपदेशक नाहीं. ३९ सत्यलोकांत पाहूं गेलें तरी तेथें ऋक्, साम, यजु, व अथर्व हे चार वेद; छंद, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष, शिक्षा व कल्पसूत्र हीं सहा शास्त्रें; सौर, शाक्त, गाणपत्य, शैव, वैष्णव व स्कंध हीं सहा दर्शनें; इतिहास, स्मृति, पुराणें हीं सगळीं मूर्तिमंत उभीं असूनहि, ४० सनकादिकांच्या प्रश्नाचें उत्तर ब्रह्मदेवाला देतां आलें नाहीं. म्हणून तुला तेथें हंसरूपानें जाऊन त्यांचें समाधान करावें लागलें. ४१ त्या ब्रह्मसभेंतहि तुझ्या तोडीचा दुसरा वक्ता नाहीं, तो तूं साक्षात् ब्रह्मच केवल भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं या लोकीं अवतरलास ४२ व त्या अवतारांत तूं कर्मधर्माची स्थापना करून दाखविलीस. अशा प्रकारचा तूं निजधामाला गेल्यावर मग स्वधर्माचा उपदेश कोठचा ! ४३ हे श्रीपते ! भक्तियुक्त स्वधर्माचें यथार्थ लक्षण सांगणारा तुजवांचून दुसरा कोणीहि समर्थ नाहीं. ४४ तूं भक्तांना साह्य करणारा जगज्जीवन आहेस. तूं भक्तांच्या अभिमानरूपी मत्त हत्तीचें निर्दालन करितोस, म्हणून तुला मधुसूदन म्हणतात, असें संबोधून उद्धव बोलला. ४५.

तत् त्वं नः सर्वधर्मज्ञ प्रभो—तो तूं आमच्या सर्व धर्मांना जाणणाऱ्या हे ईश्वरा ! त्वद्भक्तिलक्षणः धर्मः—तुझी भक्ति हेंच ज्याचें लक्षण आहे असा धर्म, यथा यस्य विधीयेत—मनुष्यांतील ज्याला ज्याप्रकारें विहित असेल, तथा मे वर्णय—त्याप्रकारें मला सांग. ८.

तूं सर्वज्ञ, केवल ज्ञानाची मूर्तीच आहेस. करितां मनुष्याची कर्मगति व वर्णाश्रमांची धर्मस्थिति मला सविस्तर सांग. ४६ वर्णबाह्य लोकांचें विहित कर्महि मला सांग, अशी उद्धवानें प्रार्थना केली असतां श्रीकृष्ण संतुष्ट झाला. ४७ उद्धवानें सगळ्या लोकांना हितावह असा हा उत्तम प्रश्न केला. तो ऐकून

योगींद्र । आनंदनिर्भर तेणें प्रश्नें ॥ ४८ ॥ शुक ह्मणे परिक्षितीसी । धन्य बुद्धी ते उद्धवासी । जेणें प्रार्थूनि हृषीकेशी । जाहला जगासी उपकारी ॥ ४९ ॥

श्रीबादरायणिरुवाच–एवं स्वभृत्यमुख्येन पृष्टः स भगवान्हरिः ।
प्रीतः क्षेमाय मर्त्यानां धर्मानाह सनातनान् ॥ ८ ॥

शुक ह्मणे गा परीक्षिती । सावधान होई चित्तीं । धन्य उद्धवाची प्रश्नोक्ती । स्वकर्में मुक्ती पुशिली ॥ ५० ॥ जो भृत्यांमाजीं पढियंता । अत्यंत आवडे कृष्णनाथा । त्यावेगळें श्रीअनंता । क्षणही सर्वथा क्रमेना ॥ ५१ ॥ ज्यापाशीं गा निजगुज । सदा सांगे गरुडध्वज । ज्यावेगळें आप्तकाज । अधोक्षज बोलेना ॥ ५२ ॥ ज्याच्या वचनासी विलंबू । क्षण न करीच रमावल्लभू । जो ब्रह्मादिकां दुर्लभू । तो जाहला सुलभू उद्धवा ॥ ५३ ॥ या जगीं भृत्यमुख्यता । आली उद्धवाचे हाता । तेणें प्रार्थूनियां भगवंता । स्वकर्में मुक्तता पुशिली ॥ ५४ ॥ हो कां ज्याचेनि प्रश्नधर्में । जग उद्धरिलें यथानुक्रमें । ज्यालागीं गा पुरुषोत्तमें । मोक्ष स्वधर्में प्रकटिजे ॥ ५५ ॥ स्वधर्म करितां स्वभावतां । निज-मोक्ष लाभे आइता । एवढ्या उपकाराची कथा । उद्धवें तत्त्वतां पुशिली ॥ ५६ ॥ ऐकोनि चातकाचें वचन । गर्जोनि वर्षे जेवीं घन । कां वत्सहुंकारें जाण । ये हुंबरोन धेनु जैशी ॥ ५७ ॥ तेवीं ऐकोनि उद्धवाच्या बोला । कृष्ण निजबोधें गर्जिन्नला । अतिस्वानंदें संतोषला । काय बोलिला गोविंदू ॥ ५९ ॥

श्री० भ०–धर्म्य एष तव प्रश्नो नैःश्रेयसकरो नृणाम् । वर्णाश्रमाचारवतां तमुद्धव निबोध मे ॥ ९ ॥

योगिश्रेष्ठ शुकाचार्यांसहि आनंदाचें भरतें आलें ४८ व तें परीक्षितीराजाला म्हणाले कीं, खरोखर उद्धवाची बुद्धि धन्य होय. त्यानें श्रीकृष्णाला मार्मिक प्रश्न विचारून सगळ्या जगावर उपकार केला. ४९.

श्रीबादरायणिः उवाच–श्रीशुकाचार्य म्हणाले, एवं स्वभृत्यमुख्येन पृष्टः सः भगवान् हरिः प्रीतः सन् मर्त्यानां क्षेमाय सनातनान् धर्मान् आह–आपल्या भक्तांतील मुख्य जो उद्धव त्याच्याकडून असें विचारला गेलेला तो भगवान् हरि संतुष्ट होऊन मनुष्यांच्या कल्याणासाठीं सनातन धर्म सांगता झाला. ८.

श्री शुकाचार्य म्हणाले कीं, अरे बाबा परीक्षितीराजा ! सावधान चित्तानें ऐक, उद्धवाचा प्रश्न खरोखरच मोठा धन्य; त्यानें स्वकर्मानें मुक्ति विचारिली. ५० सगळ्या सेवकांत श्रीकृष्णाचा उद्धव अत्यंत आवडता आहे. त्याच्या वांचून श्रीअनंताला एक क्षणभरहि करमत नाहीं. ५१ त्याला श्रीकृष्ण निरंतर आपलें गुह्य सांगत असतो. त्याच्या खेरीज दुसऱ्या कोणाशींच तो सल्ला-मसलत करीत नाहीं. ५२ त्याच्या तोंडांतून शब्द निघण्याचाच अवकाश कीं, लक्ष्मीपति एका क्षणाचाहि उशीर न करितां तो पुरवितो. ब्रह्मदेवादिकांसहि जो दुर्लभ, तो परमात्मा उद्धवाला सुलभ झाला आहे. ५३ या लोकीं सेवकांचा प्रमुखपणा एका उद्धवाच्याच हातीं आला; तेव्हां त्यानें भगवानाची प्रार्थना करून स्वकर्मानें मुक्ति विचारिली. ५४ अहो ! ज्याच्या प्रश्नाच्या योगानें सर्व जगाचा क्रमानें उद्धार झाला, ज्याच्यासाठीं श्रीकृष्णानें स्वधर्मानें मोक्ष कसा मिळतो, हें स्पष्ट करून सांगितलें. ५५ त्या उद्धवानें स्वाभाविक स्वधर्म आचरिला असतां अनायासें मोक्षप्राप्ति होईल, एवढ्या उपकाराची कथा तत्त्वतः विचारिली. ५६ चातकाचा शब्द ऐकतांच मेघ जसा गर्जना करून वृष्टि करितो, किंवा वासराचा हुंकार ऐकतांच गाय जशी हंबरते व धांवत सुटते. ५७ त्याप्रमाणें उद्धवाचें भाषण ऐकतांच श्रीकृष्ण आत्मज्ञानाची गर्जना करीत स्वानंदानें संतुष्ट होऊन काय बोलला तें ऐका. ५८.

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान् म्हणाले, उद्धव–हे उद्धवा ! तव एषः धर्म्यः प्रश्नः वर्णाश्रमाचारवतां नृणां नैःश्रेयसकरः–तुझा हा धर्माला धरून असलेला प्रश्न वर्ण व आश्रम यांच्या आचारांनीं युक्त असलेल्या मनुष्यांना मोक्ष देणारा आहे, तं मे निबोध–तो माझ्या तोंडून ऐक. ९.

जेवीं कां पुत्र एकुलता । त्यासी कांहीं वंचीना माता । तेवीं उद्धव श्रीकृष्णनाथा । त्याचें वचन वृथा हों नेदी ॥ ५९ ॥ हरिखें ह्मणे सारंगपाणी । धन्य उद्धवा तुझी वाणी । मोक्षमार्गींची निशाणी । हे जनालागोनी त्वां केली ॥ ६० ॥ तुझ्या प्रश्नाचें प्रश्नोत्तर । वर्णाश्रमीं जे कोणी नर । त्यांसी स्वधर्मचि मोक्षकर । ऐक साचार सांगेन ॥ ६१ ॥ कल्पादिपासोनि स्वधर्मसंस्था । पुरातनयुगवर्ती कथा । तुज मी सांगेन तत्त्वतां । ऐक आतां उद्धवा ॥ ६२ ॥

आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति श्रुतः । कृतकृत्याः प्रजा जात्या तस्मात्कृतयुगं विदुः ॥ १० ॥
वेदः प्रणव एवाग्रे धर्मोऽहं वृषरूपधृक् । उपासते तपोनिष्ठा हंसं मां मुक्तकिल्बिषाः ॥ ११ ॥

पूर्वील कृतयुगींचें लक्षण । तैं नव्हते गा चारी वर्ण । बहुशाखा वेदपठण । कर्माचरण तैं नाहीं ॥ ६३ ॥ तैं सकळ मनुष्यांसी जाण । सोहंहंसाचें अखंड ध्यान । यालागीं हंस हा एकचि वर्ण । सर्वांसही जाण ते काळीं ॥ ६४ ॥ तैं प्रणवमात्रें वेदपठण । वृषरूपें मी आपण । धर्म चतुष्पाद संपूर्ण । अधर्माचें जाण नांवही नाहीं ॥ ६५ ॥ ते काळीं श्रेष्ठ सत्त्वगुण । सत्यवादी यालागीं जन । अवघे धर्मपरायण । कपट तैं जाण जन्मलें नाहीं ॥ ६६ ॥ परद्रव्य आणि परदारा । यांच्या अभिलाषाचा वारा । स्पर्शला नाहीं जिव्हारा । ते काळींच्या नरां धर्मिष्ठां ॥ ६७ ॥ ते काळींच्या जनां धर्मिष्ठां । सोहंहंसाची

ज्याप्रमाणें मातेला एकुलता एक पुत्र असला म्हणजे ती त्याला क्षणभरहि विसंबत नाहीं, तसाच श्रीकृष्णाचा उद्धव लाडका होता. तो त्याचा शब्द केव्हांहि व्यर्थ होऊं देत नसे. ५९ सारंगपाणी आनंदानें म्हणाला कीं, उद्धवा ! तुझी वाणी धन्य आहे. तूं लोकांच्यासाठीं मोक्षमार्गाची ही शिडीच लाविलीस. ६० वर्णाश्रमी लोकांना स्वधर्मच मोक्षकर आहे, असें तुझ्या प्रश्नाचें उत्तर मी आतां सांगणार आहें. तें ऐक ६१ कल्पाच्या आरंभापासून प्रवृत्त झालेल्या स्वधर्मसंस्थेची युगानुरूप प्राचीन कथा तुला मी आतां तत्त्वतः सांगतों, ती ऐक. ६२.

—'आरंभीं उपासनालक्षणधर्मच मुख्य होता; आचारलक्षणधर्म मागाहून प्रवृत्त झाला आणि तोच आतां मी सांगत आहें त्याप्रमाणें अनुष्ठिला असतां भक्तीचें निमित्त होतो' असें वर्णन करण्यासाठीं श्रीभगवान् सांगतात—

आदौ कृतयुगे नृणां हंसः वर्णः इति श्रुतः-कल्पाच्या आरंभीं जें कृतयुग झालें, त्यांत मनुष्यांचा हंस हा एकच वर्ण सांगितलेला आहे. (त्या युगांतील लोक केवळ माझी उपासना करीत होते, दुसरें कांहीं करीत नव्हतें, हें सांगण्यासाठीं 'कृतयुग' या नांवाची व्युत्पत्ति सांगतात—) प्रजाः जात्या कृतकृत्याः—त्या युगांतील प्रजा जन्मतांच कृतकृत्य होत्या. तस्मात् कृतयुगं विदुः—म्हणून त्याला कृतयुग म्हणतात. १०. (—शिवाय कर्माचें विधान करणारा वेदहि त्यावेळीं नसल्यामुळें त्यावेळीं उपासनेहून निराळें कर्म नव्हतें असें आतां सांगतात—) अग्रे प्रणवः एव वेदः—त्यावेळीं प्रणव हाच वेद होता. धर्मः अहं वृषरूपधृक्—आणि मनाचा विषय न होणारा धर्म मीच चतुष्पाद वृषरूप धारण करणारा होतों. (त्या काळांत यज्ञादि दुसऱ्या कोणत्याहि क्रियेचा विशेष नव्हता.) तपोनिष्ठा मुक्तकिल्बिषाः हंसं मां उपासते—मन व इंद्रियें यांचें ऐकाग्र्य हेंच परम तप आहे, या वचनानुसार ऐकाग्र्यरूप तपामध्यें तत्पर झालेले व त्यामुळेंच पापरहित लोक त्यावेळीं एकाग्र मनानें अत्यंत शुद्ध अशा माझें ध्यान करीत होते. ११.

पूर्वीं कृतयुगाची स्थिति अशी होती कीं, त्यावेळीं ब्राह्मण-क्षत्रियादि चार वर्ण नव्हते. अनेक पंथ, वेदपठण, कर्माचरण हें कांहीं नव्हतें. ६३ त्या काळीं सगळीं मनुष्यें 'सोहं म्ह० मीच ब्रह्म' या मंत्रानें सतत ध्यान करीत असत. म्हणून त्या सर्वांचा हंस हा एकच वर्ण होता. ६४ त्या युगांत केवळ प्रणवानेंच वेदपठण होत असे. तप, सत्य, दया व शुद्धि हे चार पाद धारण करणारा मी वृषरूपी धर्म होतों. ६५ तेव्हां अधर्माचें नांवहि कोठें नव्हतें. त्या काळांत सत्त्वगुण श्रेष्ठ होता; त्यामुळें सगळे लोक सत्यनिष्ठ, व धर्मपरायण होते. तेव्हां कपटाचा जन्महि झाला नव्हता. ६६ त्या काळांतील धर्मनिष्ठ लोकांच्या अंतःकरणाला परद्रव्य व परदारा यांच्या अभिलाषाचा वाराहि कधीं स्पर्श करीत नव्हता. ६७ त्या काळांतील धर्मिष्ठ लोकांची 'सोहं' हंसावर

आत्मनिष्ठा । हेंचि भजन मज वरिष्ठा । तपोनिष्ठा त्या नांव ॥ ६८ ॥ तें स्वर्गा जावें हे नाहीं कथा । नेणती नरकाची वार्ता । अधर्माची अवस्था । स्वप्नीही चित्ता स्पर्शेना ॥ ६९ ॥ यापरी प्रजा समस्त । स्वधर्मस्वभावें कृतकृत्य । यालागीं जाण निश्चित । त्यातें बोलिजेत कृतयुग ॥ ७० ॥

त्रेतामुखे महाभाग प्राणान्मे हृदयात्त्रयी । विद्या प्रादुरभूत्तस्या अहमासं त्रिवृन्मखः ॥ १२ ॥

उद्धवा या कलियुगाच्या ठायीं । तुझ्या भाग्याची परम नवाई । कृतयुगींच्या प्रजांपरीस पाहीं । तुज माझ्या ठायीं विश्वास ॥ ७१ ॥ त्रेतायुगीं प्रकटलें कर्म । जो वैराज मी पुरुषोत्तम । त्या माझेनि निःश्वासें त्रिधर्म । वेदसंभ्रम वाढला ॥ ७२ ॥ तेथ त्रैविद्या विविध भेद । नाना मंत्र नाना छंद । ऋग्वेदादि तिन्ही वेद । प्रकटले प्रसिद्ध निजशाखीं ॥ ७३ ॥ त्या वेदांपासोनि त्रिविध मख । त्रिमेखलायुक्त मीचि देख । जेथ होत आध्वर्यव हौत्रिक । कर्मविशेख जे ठायीं ॥ ७४ ॥ ऐसें मद्रूपें यज्ञकर्म । तेथिल्या अधिकाराचें वर्म । दो श्लोकीं पुरुषोत्तम । वर्णाश्रम सांगत ॥ ७५ ॥

विप्रक्षत्रियविट्शूद्रा मुखबाहूरुपादजाः । वैराजात्पुरुषाज्जाता य आत्माचारलक्षणाः ॥ १३ ॥

वैराजात्पुरुषापासाव जाण । मुखीं उपजले ब्राह्मण । बाहूपासूनि राजन्य । ऊरू जन्मस्थान वैश्यांचें ॥ ७६ ॥ शूद्र चरणीं जन्मले जाण । यापरी जाहले चारी वर्ण । यांचें एक मुख्य लक्षण । स्वधर्माचरण सर्वांशीं ॥ ७७ ॥ चतुर्वर्णांची उत्पत्ती । पुरुषापासूनि या रीतीं । आतां आश्रमांची स्थिती । ऐक निश्चितीं सांगेन ॥ ७८ ॥

म्ह० मज परमात्म्याच्या आत्मस्वरूपांतच निष्ठा होती. मला तेंच भजन अतिशय मान्य आहे. त्याला तपोनिष्ठा असें म्हणतात. ६८ त्यांना स्वर्गाला जावें अशी वार्ताहि ठाऊक नव्हती, किंवा नरकाचें नांवहि माहीत नव्हतें आणि अधर्म तर स्वप्नांतहि कधीं त्यांच्या मनांत येत नव्हता. ६९ याप्रमाणें सगळी प्रजा स्वधर्माचरणानें कृत-कृत्य होती, हें निश्चयानें जाण. म्हणूनच त्याला कृतयुग म्हणतात. ७०.

महाभाग–हे भाग्यवान् उद्धवा ! त्रेतायुगे मे प्राणात् हृदयात् त्रयी विद्या प्रादुरभूत्–त्यानंतर त्रेतायुगाच्या आरंभीं मज विराट्रूपाच्या प्राणनिमित्तानें हृदयापासून वेदविद्या प्रकट झाली, तस्याः अहं त्रिवृत् मखः आसं–त्या त्रयी-विद्येपासून मी हौत्र, आध्वर्यव आणि औद्गात्र या रूपांनीं त्रिरूप झालेला विष्णु झालों. १२.

हे उद्धवा ! कलियुगांत तुझें भाग्य मोठें आश्चर्यकारक खरें ! कारण कृतयुगांतील प्रजाजनांसारखाच तुझा मजवर विश्वास आहे. ७१ त्रेतायुगांत कर्म प्रकट झालें, मज विराट्स्वरूपी पुरुषोत्तमाच्या श्वासोच्छ्वासा-पासून तीन वेद उत्पन्न झाले व त्यांचा विस्तार वाढला; ७२ तेव्हां वैदिकांचे विविध भेद, नाना मंत्र, नाना छंद, ऋग्वेदादि वेद आपापल्या शाखेंत उदयास आले. ७३ या वेदापासून झालेले तीन मेखलायुक्त विविध यज्ञ मीच आहें. त्यांत हौत्र, आध्वर्यव आणि औद्गात्र हे कर्मांचे तीन प्रकार आहेत. ७४ याप्रमाणें मद्रूपानें यज्ञकर्म होत असे, हें त्यांतील अधिकाराचें वर्म आहे. आतां पुढील दोन श्लोकांनीं पुरुषोत्तम वर्णाश्रम सांगत आहे. ७५.

—वर्ण व आश्रम यांचे धर्म सांगण्यासाठीं अगोदर दोन श्लोकांनीं त्यांची उत्पत्ति सांगतात—

मुखबाहूरुपादजाः विप्र-क्षत्रिय-विट्-शूद्राः वैराजात् पुरुषात् जाताः–मुख, बाहु, मांड्या व पाय यांपासून क्रमानें झालेले ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य व शूद्र विराट् पुरुषापासून झाले. ये आत्माचारलक्षणाः–त्या ब्राह्मणादिकांचें स्वधर्म हेंच लक्षण होतें. १३.

विराट्पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण उत्पन्न झाले. बाहूपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य व पायापासून शूद्र उत्पन्न झाले. ७६ याप्रमाणें चार वर्ण झाले. सर्वप्रकारें स्वतःचा आचार पाळणें हेंच या सर्वांचें मुख्य लक्षण होतें. ७७ विराट्पुरुषापासून अशाप्रकारें चातुर्वर्ण्य झालें. आतां चार आश्रमांची स्थिति सांगतों, ती ऐक. ७८.

गृहाश्रमो जघनतो ब्रह्मचर्यं हृदो मम । वृक्षःस्थलाद्वने वासो न्यासः शीर्षणि संस्थितः ॥ १४ ॥

गृहस्थाश्रमासी जघनस्थान । ब्रह्मचर्य माझ्या हृदयीं जाण । वानप्रस्थासी मी आपण । वाढवीं माहिमान वक्षःस्थळीं ॥ ७९ ॥ जो चतुर्थाश्रम संन्यास । त्याचा माझे शिरीं रहिवास । एवं वर्णाश्रम-विलास । तुज सावकाश सांगीतला ॥ ८० ॥

वर्णानामाश्रमाणां च जन्मभूम्यनुसारिणीः । आसन्प्रकृतयो नृणां नीचैर्नीचोत्तमोत्तमैः ॥ १५ ॥

जैसें जन्म जैसें स्थान । त्या वर्णाश्रमांमाजीं तैसे गुण । उत्तमीं उत्तमत्व जाण । नीचीं नीचपण सहजचि ॥ ८१ ॥ सत्वप्राधान्यें ब्राह्मण । सत्वरजें क्षत्रिय जाण । रजतमें वैश्यवर्ण । शूद्र ते जाण तमोनिष्ठ ॥ ८२ ॥ तेचि ब्राह्मणादि चारी वर्ण । त्यांचे प्रकृतींचें लक्षण । वेगळें वेगळेंचि पैं जाण । स्वयें नारायण सांगत ॥ ८३ ॥

शमो दमस्तपः शौचं सन्तोषः क्षान्तिरार्जवम् । मद्भक्तिश्च दया सत्यं ब्रह्मप्रकृतयस्त्विमाः ॥ १६ ॥

उद्धवासी म्हणे श्रीकृष्ण । ब्राह्मणप्रकृति दशलक्षण । तुज मी सांगेन निरूपण । तें सावधान अवधारीं ॥ ८४ ॥ मनादि ज्ञानेंद्रियवृत्ती । बाह्य दृष्टीं परिचारस्थिती । ते आवरूनि विवेकयुक्तीं । आत्मप्रतीती धरावी ॥ ८५ ॥ तेचि वृत्तीचें धरणें ऐसें । कृष्णसर्पाचें मुख धरणें जैसें । तो वेढे उकली

मम जघनतः गृहाश्रमः—माझ्या पृष्ठप्रदेशापासून गृहस्थाश्रम, **हृदः ब्रह्मचर्यं**—हृदयापासून नैष्ठिक ब्रह्मचर्य, **वक्षः-स्थलात् वने वासः**—वक्षस्थलाच्या खालील प्रदेशापासून वानप्रस्थ, **न्यासः शीर्षणि संस्थितः**—व संन्यास विराट् पुरुषाच्या मस्तकावर स्थित आहे. १४.

माझ्या कमरे खालचा भाग गृहस्थाश्रमास दिला आहे. ब्रह्मचर्य माझ्या हृदयांत असतें. तिसरा आश्रम जो वानप्रस्थ त्याचा महिमा मी माझ्या वक्षःस्थलावर वाढवितों. ७९ व चवथा संन्यासाश्रम माझ्या मस्तकावर वास करितो. याप्रमाणें वर्ण आणि आश्रम यांची व्यवस्था तुला थोडक्यांत सांगितली. ८०.

—अधिकाराप्रमाणें त्यांचे स्वभाव पुढील पांच श्लोकांनीं सांगतात—

वर्णानां आश्रमाणां च जन्मभूम्यनुसारिणीः नृणां प्रकृतयः आसन्—वर्ण व आश्रम यांच्या जन्मस्थानाच्या अनुसार मनुष्यांचे स्वभाव झाले, **नीचैः नीचः उत्तमैः उत्तमः**—नीच स्थानापासून जे झाले त्यांचे स्वभाव नीच व उत्तम स्थानासून जे झाले ते उत्तम. १५.

जसें ज्याचें जन्मस्थान, तशी वर्ण व आश्रम यांची श्रेष्ठ किंवा निकृष्ट योग्यता असते. (ब्राह्मणवर्ण मुख या उत्तम स्थानापासून निघाल्यामुळें तो उच्च व त्याच्या अपेक्षेनें क्षत्रियादि क्रमानें खालोखाल येतात. त्याचप्रमाणें ब्रह्मचर्य व संन्यास यांचें हृदय व मस्तक या ठिकाणीं वास्तव्य असल्यामुळें ते आश्रम वरिष्ठ होत, उत्तम स्थानासून उत्पत्ति असल्यास सहजच गुणहि उत्तमच येतात व नीच स्थानापासून उत्पन्न झाल्यास त्याच्या अंगीं गुणहि नीच येतात. ८१ ब्राह्मणांमध्यें सत्त्वगुण अधिक असतो; क्षत्रियांत सत्त्व व रज हे दोन गुण असतात; वैश्यांत रज व तम हे दोन असतात; आणि शूद्रांत केवळ तमोगुणाचेंच आधिक्य असतें. ८२ (सु. गी. १८-४१ पृ. ३३३) ब्राह्मणादि चार वर्णांचें व त्यांच्या भिन्न-भिन्न स्वभावांचें लक्षण स्वतः नारायण सांगत आहे !

शमः० . . . सत्यं इमाः ब्रह्मप्रकृतयः—विचारयुक्त शम, दम, शौच, संतोष, क्षमा, मनाचा सरळपणा, माझी भक्ति, दया, सत्य या ब्रह्मप्रकृति म्ह० ब्राह्मणांचे स्वभाव आहेत. १६.

श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाला कीं, ब्राह्मण स्वभावाचीं दहा लक्षणें मी तुला सांगतों, तीं लक्षपूर्वक ऐक. ८४ मनादि ज्ञानेंद्रियवृत्ति नेहमीं बाह्य दृष्टीनें वावरत असतात; त्यांना विवेकानें आंवरून आत्मस्वरूपांत स्थिर कराव्या. ८५ त्या वृत्तींना आवरणें म्हणजे कृष्णसर्पाचें मुख धरण्यासारखेंच दुष्कर आहे. परंतु त्याचें मुख

आपैसें । तंव धारणा सौरसें नेहटावी ॥ ८६ ॥ तेवीं वैराग्यप्रतापवशें । गुरुवचनाचेनि विश्वासें । अंतरवृत्तीतें नेहटावें ऐसें । जंव ये आत्मसमरसें निजात्मता ॥ ८७ ॥ मुख्य करूनि गुरुवचन । तदर्थीं बुद्धि निमग्न । तत्प्रवण होय मन । शम तो जाण या नांव ॥ ८८ ॥ ब्राह्मणप्रकृतीमाजीं जाण । हें स्वाभाविक निजलक्षण । या नांव गा शमगुण । ऐक निरूपण दमाचें ॥ ८९ ॥ विषयप्रवृत्ति प्रचंड । कर्मेंद्रियांचें बळ बंड । विधीनें त्यांचें ठेंचूनि तोंड । सैरा वितंड विचरों नेदी ॥ ९० ॥ वेदविधीचेनि हातें । देहनिर्वाहापुरतें । खाणें जेवणें इंद्रियांतें । तो जाण येथें दमगुण ॥ ९१ ॥ तेथ शम तो जाण मुख्य राजा । दमादि इतर त्याच्या प्रजा । ते दोनी सांगीतले वोजा । ऐक तिजा तपोनेमू ॥ ९२ ॥ शमें ज्ञानेंद्रियउपशमू । तोचि कर्मेंद्रियां मुख्य दमू । याहीवरी वेदोक्त कर्मू । तें ज्ञान परमू गौरवाचें ॥ ९३ ॥ शरीरशोषणा नांव तप । तें प्रारब्धभोगानुरूप । हृदयीं हरि चिंतणें सद्रूप । हें मुख्य तप तपांमाजीं ॥ ९४ ॥ जो वर्ततां स्वधर्मस्थितीं । हरीतें विसंबेना निजवृत्ती । जो आत्मनिश्चयो चित्तीं । अहोरातीं विवंचित ॥ ९५ ॥ जेवीं लोभिया वाहे धन । कां तरुणालागीं तरुणी जाण । तैसें निजात्मविवंचन । जयाचें मन सदा करी ॥ ९६ ॥ त्या नांव गा तपोनिष्ठ । हें तपांमाजीं तप वरिष्ठ । ब्राह्मणप्रकृतीमाजीं श्रेष्ठ । तप तें उद्भट या नांव ॥ ९७ ॥ ऐक शौचाचा विचार । तो आहे द्विप्रकार । अंतरीं ज्ञान निर्धार । बाह्य आचार वेदोक्त ॥ ९८ ॥ बाह्य मळाचें क्षाळण । मृज्जलादि वेदविधान । आंतर मळाचें निर्दळण । आत्मज्ञान निजानिष्ठा ॥ ९९ ॥ शुद्ध शौचें निर्मळपण । मुख्यत्वें उद्धवा हेंचि जाण । आतां संतोषाचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ १०० ॥ पुत्र जन्मल्या होय सुख । तो गेलिया सर्वेचि दुःख । धन जोडलिया होय हरिख । सर्वेचि शोक तन्नाशीं ॥ १ ॥ ज्या सुखाची होतां

एकदां घट्ट आंवळून धरिलें, म्हणजे तो जसा वेटे सैल सोडितो, त्याप्रमाणें वृत्तींना ताब्यांत ठेवण्यांत सावध रहावें; ८६ अशा प्रकारें वैराग्याच्या प्रभावानें व गुरुवचनाच्या विश्वासानें आत्मस्वरूपांत ऐक्य होईपर्यंत वृत्तींना दाबून ठेवावें. ८७ गुरुवचन मुख्य समजून त्यांतच बुद्धि निमग्न करून, मन तत्पर करणें याला शम असें म्हणतात. ८८ ब्राह्मणस्वभावांत हा गुण उपजतच असतो. याला शमगुण म्हणतात. आतां दमाचें निरूपण ऐक. ८९ विषयप्रवृत्ति प्रचंड आहे व कर्मेंद्रियांचें बंड तर अनिवार्य आहे. यास्तव वेदविधीनें त्यांचें तोंड ठेंचून, त्यांना स्वैर भटकूं देऊं नये. ९० वेदविधानाप्रमाणें केवल शरीरपोषणापुरतेंच इंद्रियांना अन्न देणें याला दम गुण म्हणतात. ९१ येथें शम हा मुख्य राजा समजावा आणि दमादि इतर गुण त्याची प्रजा समजावी. हे दोन गुण यथायोग्य सांगितले. आतां तिसरा तपाचा नेम ऐक. ९२ शमानें ज्ञानेंद्रियें शांत होतात. दमानें कर्मेंद्रियें स्थिर होतात. याखेरीज जें वेदोक्त कर्माचरण त्याचें ज्ञान फार महत्त्वाचें आहे. ९३ व्रतादिकांच्या योगानें शरीर कष्टविणें याला तप म्हणतात. तें प्रारब्धकर्मानुसार होत असतें. हृदयांत सत्स्वरूप श्रीहरीचें चिंतन करणें हें सर्व तपांमध्यें श्रेष्ठ तप आहे. ९४ जो स्वधर्माप्रमाणें वागत असतां अंतःकरणांत श्रीहरीला विसरत नाहीं, जो रात्रं-दिवस मनामध्यें आत्मस्वरूपाचाच निश्चय करीत असतो, ९५ ज्याप्रमाणें लोभी माणसाला धनाचा, किंवा तरुणाला तरुणीचा सतत ध्यास लागलेला असतो, त्याप्रमाणें ज्याचें मन निरंतर आत्मविचार करीत असतें, ९६ त्याला तपोनिष्ठ असें म्हणतात. सर्व तपांमध्यें हें तप श्रेष्ठ आहे. ब्राह्मणस्वभावांतील या श्रेष्ठ गुणालाच उज्ज्वल तप असें म्हणतात. ९७ आतां शुचिर्भूतपणाचा प्रकार ऐक. तो दोन प्रकारचा आहे. एक अंतःकरणांतील ज्ञानाचा निश्चय व बाहेरचें वेदोक्त आचरण. ९८ माती, जल यांनीं देहावरील बाह्य मलाची शुद्धि होते व आत्मज्ञाननिष्ठेनें अंतःकरणाची शुद्धि होते. ९९ उद्धवा ! शुद्धतेनें निर्मलपणा अंगीं आणणें हेंच खरें शौच आहे, असें समज. आतां संतोषाचें संक्षिप्त लक्षण सांगतों, तें ऐक. १०० पुत्रजन्म झाला कीं सुख होतें व तो मरण पावला कीं लगेच दुःख होतें. द्रव्य मिळालें कीं, आनंद वाटतो व तें नाहींसें झालें कीं तत्काल शोक होतो. १ ज्या सुखाची प्राप्ति झाली असतां दुःखाच्या राशी समूळ नाश पावतात, तेंच खरें

भेटी । निःशेष मावळे दुःखकोटी । या नांव सत्य सुखसृष्टी । इतर चावटी ते मिथ्या ॥ २ ॥ निरुपचार अंतरगती । मद्भावें जें सुख प्राप्ती । जाहलिया संपत्ती विपत्ती । जे संतोषप्राप्ती समसाम्यें ॥ ३ ॥ येचि पदीं पाठांतर । तितिक्षा म्हणती थोरथोर । ऐक त्यांचेंही अर्थांतर । पदार्थविचार तो ऐसा ॥ ४ ॥ शीत उष्ण मृदु कठिण । अंगीं आदळतां जाण । ज्याचें डळमळीना मन । भावना पूर्ण मद्भावें ॥ ५ ॥ संतोषतितिक्षाव्याख्यान । हें पांचव्या पदाचें लक्षण । उद्धवासी म्हणे श्रीकृष्ण । ऐक निरूपण शांतीचें ॥ ६ ॥ माझा निर्धारितां निजबोध । अंतरीं निमालें कामक्रोध । त्यासी केलिया अपराध । न मनीं विरुद्ध पुढिलांचें ॥ ७ ॥ परी तेथींची नवलपरी । अपकाऱ्या होय उपकारी । विकार नाहीं ज्याचे अंतरीं । जाण ते खरी निजशांती ॥ ८ ॥ ऐशी सदा शांति संपूर्ण । तें ब्राह्मणाचें षष्ठ लक्षण । ऐक आर्जवाचें निरूपण । जीवींची खूण सांगेन ॥ ९ ॥ कुरूप जरी जाहली माता । परी स्नेहासी नाहीं कुरूपता । कां सुवर्णाचे नाग करितां । सोनें सर्वथा नव्हे सर्पू ॥ ११० ॥ तेवीं कुटिलांसी कुटिलता । करावी म्हणोनि शिकवितां । कुटिलत्व नुपजे चित्ता । जाण तत्त्वतां तें आर्जव ॥ ११ ॥ गायीसी गोड व्याघ्रासी कडू । हा गंगाजळी नाहीं पवाडू । तेवीं आर्जवाचा पडिपाडू । विषमाही गोडू समसाम्यें ॥ १२ ॥ या नांव जाण आर्जव । सातवें लक्षण अपूर्व । आतां निजभक्तीचा स्वभाव । देवाधिदेव सांगत ॥ १३ ॥ वन उद्यान गंगाजीवन । यांस पृथ्वी जेवीं अधिष्ठान । तेवीं सकळ लक्षणांचें जन्मस्थान । माझी भक्ति जाण उद्धवा ॥ १४ ॥ सकळ पिकांचिये प्राप्ती । आधारभूत जेवीं क्षिती । तेवीं सकळ लक्षणां उत्पत्ती । माझिये भक्ति माझारीं ॥ १५ ॥ ऐक ते भक्तीचा इत्यर्थ । सांडोनि विषयस्वार्थ । जीवीहूनि मजलागीं भावार्थ । तो निजभक्त

शाश्वत सुख होय. इतर सगळी वाचाळता व्यर्थ आहे. १ माझ्या भक्तीनें अंतःकरणांत जें स्वाभाविक सुख प्राप्त होतें, तें संपात्ति किंवा विपात्ति आली तरी समभावामुळें संतोषच देत असतें. ३ याविषयीं कांहीं ठिकाणीं पाठभेद आढळतो. संतोषाला कांहीं विद्वान् लोक 'तितिक्षा' असेंहि म्हणतात. त्या शब्दाचाहि अर्थ सांगतों, ऐक. ४ ज्याची मद्भक्तींत पूर्ण भावना असते त्याला शीत-उष्ण, मऊ-कठिण यांतील कांहीं जरी प्राप्त झालें तरी त्याचें मन डळमळत नाहीं. ५ याप्रमाणें संतोष-तितिक्षेचें व्याख्यान हें पांचव्या पदाचें लक्षण झालें. श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाला कीं, आतां शांतीचें निरूपण ऐक. ६ माझा आत्मबोध निश्चित झाला असतां अंतःकरणांतील काम-क्रोध नाहींसे होतात. ज्ञानी कोणीं अपराध केला तरी त्याच्याशीं विरोध तर करीत नाहींतच, ७ पण त्याचें असें आश्चर्य असतें कीं, ते अपकार करणाऱ्यावर उपकार करीत असतात. त्यांच्या अंतःकरणांत मुळींच विकार उद्भवत नाहीं. तीच खरी आत्मशांति होय. ८ हें ब्राह्मणाचें सहावें लक्षण झालें. आतां आर्जवाचें निरूपण करितों, तें ऐक. त्याची अंतःकरणांतील खूणच तुला सांगतों. ९ माता जरी कुरूप असली तरी तिचें वात्सल्य-प्रेम कुरूप ठरत नाहीं, किंवा सोन्याचा नाग केला तर सोनें कांहीं नाग होत नाहीं. ११० त्याप्रमाणें कपटी लोकांबरोबर कपटानें वागलें पाहिजे, असें जरी कोणीं शिकविलें, तरी त्याच्या मनांत कांहीं कपट उत्पन्न होत नाहीं. याला आर्जव असें म्हण-तात. ११ गंगेच्या जलांत गायीला गोड व वाघाला कडु असा कधीं पक्षपात नसतो, तसाच आर्जवाचा प्रकार आहे. तें विरोधी जनांशींहि सरळ असतें. १२ यालाच आर्जव म्ह० अंतःकरणाचा सरळपणा असें म्हणतात. हें ब्राह्मणाचें सातवें अपूर्व लक्षण आहे. आतां देवाधिदेव आत्मभक्तीचें लक्षण सांगत आहे. १३ हे उद्धवा ! वन, उपवन व गंगाजल यांस पृथ्वीचा जसा आधार आहे, त्याचप्रमाणें माझी भक्ति सगळ्या लक्षणांचें उत्पत्तिस्थान आहे. १४ ज्याप्रमाणें सगळीं पिकें भूमीच्या आधारानें पिकतात, त्याप्रमाणें माझ्या भक्तीपासून सगळ्या लक्षणांची उत्पात्ति होते. १५ आतां त्या भक्तीचा भावार्थ ऐक. विषयासक्ति सोडून मना-

पैं माझा ॥ १६ ॥ भक्त आणि धनाचें अर्जन । हेंचि मुख्यत्वें भक्तीसी विघ्न । धनलोभी तो अभक्त पूर्ण । सत्य जाण उद्धवा ॥ १७ ॥ माझा भाव नाहीं जिव्हारीं । आहाचवाहाच माझी भक्ति करी । तो आंधळ्या पक्ष्याचे परी । उडे परी निर्धारी स्थान नेणे ॥ १८ ॥ माझा भावार्थ जेथ होये । तेथ मी जाती कुळ न पाहें । मी भावाचेनि लवलाहें । वश्य होयें निजभक्तां ॥ १९ ॥ जेथ भावार्थें माझी आवडी । तेथ अवश्य माझी पडे उडी । जेणें भावार्थाची उभविली गुढी । तो जाणे गोडी मद्भक्तीची ॥ १२० ॥ जें जें भेटे तोचि देवो । ऐसा भावार्थी ज्याचा भावो । तो एक पढियंता मज पहा वो । त्याचे भावें जीवों आम्ही उद्धवा ॥ २१ ॥ तोचि माझा जीवप्राण । त्यासी मी सर्वस्वें करीं निंबलोण । मी सर्वदा त्याअधीन । जेवीं व्याली धेनु वत्सासी ॥ २२ ॥ एवं निःसीम भावार्थाची स्थिती । त्या नांव उद्धवा माझी भक्ती । यापरी भक्तीची व्युत्पत्ती । ऐक पां ख्याती दयेची ॥ २३ ॥ बाळक देखोनि संकटीं । जेवीं न सांवरत माय उठी । तेवीं दीन देखोनि दृष्टीं । ज्याचे पोटीं दया द्रवे ॥ २४ ॥ ऐशिया दयेच्या ठायीं जाण । आपुलें पारकें पुसे कोण । स्वजातिविजातिलक्षण । पुसायाही पण धीर नाहीं ॥ २५ ॥ महापूरीं बुडतयातें । कृपाळु जाती न पुसे तेथें । उडी घालूनि वांचवी त्यातें । दया निश्चितें ती नांव ॥ २६ ॥ दीनाचिये दयेलागीं । जो रिघे जळत्या आगीं । त्याचे चरण मी वंदीं वेगीं । धन्य जगीं दयाळु ॥ २७ ॥ ऐशिये दयेचेनि गुणें । मज अनंतालागीं तेणें । विकत घेतलें जीवेंभावें जाणें । कीं जाहलों पोसणें मी त्याचें ॥ २८ ॥ यालागीं दयाळुवाचे घरीं । मी सदा नाटिका काम करीं । जे दयावंताचे अवसरीं । तें माझे शिरीं सर्वदा ॥ २९ ॥ जो जाणे दीनांचा विचार ।

पासून जो माझ्यावर निरतिशय प्रीति करितो, तो माझा खरा भक्त होय. १६ भक्ताचें द्रव्यार्जन भक्तीमध्यें मुख्य विघ्न आणणारें आहे. हे उद्धवा ! धनलोभी मनुष्य पूर्ण अभक्त आहे, असें समजावें. १७ अंतःकरणांत माझी भक्ति नसतां केवळ दांभिकपणानें जो वर-वर माझी भक्ति दाखवितो त्याची स्थिति आंधळा पक्षी जसा उडत असतो, पण निश्चित स्थान जाणत नाहीं, त्याच्या सारखीहोते. १८ जेथें मजवर खरी श्रद्धा दिसते, तेथें मी त्याच्या जातीचा किंवा कुळाचा विचार करीत नाहीं. केवळ भक्तीसाठीं मी माझ्या भक्तांच्या अधीन होतों. १९ जेथें भक्तिभावानें माझी आवड असते, तेथें मी अवश्य उडी टाकितों. जो आपल्या भक्तीचा ध्वज उभारितो तोच माझ्या भक्तीची गोडी जाणतो. १२० हे उद्धवा ! जेवढा प्राणी भेटेल तेवढा देवच आहे, असा ज्याचा भाव असतो, तो माझा अत्यंत आवडता भक्त होय. त्याच्या भाविकपणानें आम्ही जगतों. २१ असा भक्त मला जीव कीं प्राण वाटतो. त्याच्यावरून मी सर्वस्व ओंवाळून टाकितों. ज्याप्रमाणें व्यालेली गाय आपल्या वासराच्या वश असते, त्याप्रमाणें मी सर्वदा त्याच्या अधीन असतों. ४२ उद्धवा ! अशा प्रकारची जी निःसीम भाविकपणाची अवस्था त्याला माझी भक्ति म्हणतात. अशी भक्तीची व्याख्या आहे. आतां दयेचें वर्णन ऐक. २३ माता आपलें बालक संकटांत असलेलें पहातांच त्याचें दुःख असह्य होऊन तत्काळ जशी त्याच्या साह्यार्थ उठते, त्याप्रमाणें कोणीहि दीन प्राणी दृष्टीस पडतांच ज्याचें मन दयेनें द्रवतें, २४ त्याच्या मनांत अशी दया उपजल्यावर मग आपलें व परकें हा भेद कोठून रहाणार ! तो प्राणी स्वजातीचा आहे किंवा अन्य जातीचा आहे हें पहाण्याइतकाहि धीर त्याला निघत नाहीं. २५ महापुरांत कोणीहि बुडत असलेलें दिसतांच जो आप-पर, जात-गोत न पहातां एकदम उडी घालून त्याला वांचवितो, त्याच्या या कृतीला दया असें म्हणतात. २६ अनाथावरील दयेमुळें जो पेटलेल्या आगींत उडी टाकितो, त्याच्या चरणांना मी वंदन करितों. असा दयाळु मनुष्य जगांत धन्य होय. २७ त्याच्या या दयाळुपणानें तो मज अनंताला जीवाभावानें विकत घेतो; किंबहुना मीच त्याचा आश्रित होऊन रहातों, २८ त्यामुळें मी दयाळु माणसाच्या घरीं निरंतर पडेल तें काम करितों. दयाळु माणसावर कांहींहि प्रसंग आला तरी त्याची जबाबदारी माझ्या डोकीवर असते. २९ जो दीन जनांचा

दीनदयाळु जो साचार । उद्धवा तो माझें निजभांडार । सुखाचें सुखसार तो मज ॥ १३० ॥ या नांव गा दया जाण । तें हें नववें लक्षण । आतां सत्याची उणखूण । तुज मी संपूर्ण सांगेन ॥ ३१ ॥ सत्याचें सत्यत्व हें ऐसें । जागृतिस्वप्नसुषुप्तिवशें । ज्यासी असत्यता न स्पर्शे । निज सत्य ऐसें निडारिलें ॥ ३२ ॥ ऐसें सत्य परिपक्कल्या पोटीं । सत्य वाचा सत्य दृष्टी । निजसत्यत्वें सत्य सृष्टी । पडिली तुटी असत्याची ॥ ३३ ॥ यापरी गा सत्यत्व जाण । त्या नांव दहावें लक्षण । हें ब्राह्मणाचें संपूर्ण । कर्माचरण स्वभावें ॥ ३४ ॥ ब्राह्मणप्रकृतीचे क्षितीं । या दश लक्षणांची उत्पत्ती । स्वाभाविक सहजगती । अकृत्रिम स्थिति उद्धवा ॥ ३५ ॥ येहीं दश लक्षणीं संपूर्ण । वर्णवरिष्ठ वंद्य ब्राह्मण । आतां क्षात्रप्रकृतीचे गुण । ऐक निरूपण उद्धवा ॥ ३६ ॥

तेजो बलं धृतिः शौर्यं तितिक्षौदार्यमुद्यमः । स्थैर्यं ब्रह्मण्यतैश्वर्यं क्षत्रप्रकृतयस्त्विमाः ॥ १७ ॥

ब्राह्मणप्रकृति दश लक्षण । तुज म्यां सांगीतली सुलक्षण । आतां क्षात्रवृत्तीचे दश गुण । ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ३७ ॥ तेज म्हणजे प्रतापशक्ती । जैसा क्षितितळींचा गभस्ती । ज्याचिया प्रतापदीप्ती । लोपले जाती महींद्र ॥ ३८ ॥ क्षात्रधर्मीं प्रथम काज । तया नांव जाण तेज । आतां क्षात्रबळाची वोज । ऐक चोज सांगेन ॥ ३९ ॥ त्याच्या शरीरबळाचें कोड । एकला लक्षावरी दे झड । जरी तुटला दुधड । तरी वैरियांचें तोंड विभांडी ॥ १४० ॥ रिघतां रणामाझारीं । दुजयाचें साह्य न विचारी । जेवीं वनगजीं केसरी । तेवीं रिघोनि दळभारीं विभांडी वीर ॥ ४१ ॥ आकाश दाटल्या निशाचरीं । भूमंडळीं कोंदल्या असुरीं । ऐसे प्रबळ बळें आल्या वैरी । ज्याचे धृतीमाझारीं विस्मयो नुठी ॥ ४२ ॥ आकाश पडावया गडाडी । पृथ्वी उलथावया हडबडी । तरी ज्याचे धृतीची रोकडी । नव्हे वांकुडी

कनवाळु असतो तो खरोखर दीनदयाळ होय. उद्धवा ! तो माझ्या सर्व सुखाचें सार असा आत्मठेवाच आहे. १३० अशा वृत्तीला दया म्हणतात. हें नववें लक्षण झालें. आतां सत्याची खरी खूण मी तुला सविस्तर सांगतों. ३१ जागृति-स्वप्न-सुषुप्ति या तीन्ही अवस्थेंत ज्याला असत्य स्पर्शहि करीत नाहीं, तें खरें सत्य होय. सत्याचा सत्यपणा असा असतो. ३२ अशा प्रकारें सत्यपणा पूर्ण वाढला, म्हणजे त्याची वाणी व दृष्टि हीं सत्यच होतात. (म्ह० तो नेहमीं सत्य भाषण करितो व सत्य दृष्टि ठेवितो.) असत्य तत्काल पळून जातें. ३३ असें जें सत्य तें दहावें लक्षण होय. हें ब्राह्मणाचें स्वाभाविक संपूर्ण कर्माचरण झालें. ३४ उद्धवा ! ब्राह्मण-प्रकृतीच्या शेतांत हीं दहा लक्षणें उत्पन्न होतात. हीं उपजत, स्वाभाविक व अकृत्रिम आहेत. ३५ चार वर्णांतील वरिष्ठ व वंद्य असे जे ब्राह्मण त्यांचीं हीं दहा लक्षणें सविस्तर सांगितलीं. आतां हे उद्धवा ! क्षत्रिय स्वभावांतील गुण सांगतों, ते ऐक. १३६.

तेजः०... ऐश्वर्यं इमाः क्षत्रप्रकृतयः—प्रताप, प्रबल, धैर्य, शौर्य, सहनशीलता, औदार्य, उद्योग, स्थैर्य, ब्राह्मणभक्ति व ऐश्वर्य या क्षत्रियप्रकृति आहेत. [यांवरून आश्रमस्वभावहि ओळखवेत.] १७.

उद्धवा ! मी तुला ब्राह्मणस्वभावांतील दहा उत्तम लक्षणें सांगितलीं. आतां क्षत्रिय स्वभावांतील दहा गुण सविस्तर सांगतों, ते ऐक. ३७ तेज म्हणजे क्षत्रियांचा प्रताप. जणुंकाय क्षितिजावरील सूर्यच अशा त्याच्या प्रतापानें सगळे राजे दिपून जातात. ३८ क्षत्रिय धर्मांतील हा मुख्य गुण आहे. याला तेज असें म्हणतात. आतां क्षत्रियांच्या सामर्थ्याचें स्वरूप सांगतों, तो चमत्कार ऐक. ३९ त्याच्या शरीरसामर्थ्याचें कौतुक असें असतें कीं, तो एकटा लक्षावधि माणसांवर तुटून पडतो. शरीराचीं दोन शकलें झालीं, तरी तो शत्रूचें तोंड फोडल्यावांचून रहात नाहीं. १४० तो युद्धाला निघते वेळीं दुसऱ्याचें साह्य मागत नाहीं. सिंह जसा वनांतील हत्तीवर चालून जातो, तसा हा वीर मोठ्या सैन्यावर चाल करून तें नामशेष करितो. ४१ निशाचरांनीं सगळें आकाश व्यापिलें व असुरांनीं भूमंडळ भरलें, अशा प्रचंड सेनेसह जरी शत्रु आला तरी वीराचें धैर्य डळमळत नाहीं व तो विस्मितहि होत नाहीं. ४२ आकाश आतां कोसळून पडतें कीं काय इतकें गडगडत

रोमावळी ॥ ४३ ॥ वोडवलियाही कल्पांता । धाक रिघों नेणे ज्याच्या चित्ता । ऐसें निजधैर्य स्वभावतां । धृति तत्त्वतां ती नांव ॥ ४४ ॥ चौऱ्याशीं दंडायुधें करूं जाणती । शस्त्रास्त्रें धारणा युक्ती । स्वधर्में आवशर्के करिती । या नांव धृति क्षत्रियांची ॥ ४५ ॥ शूरांचें शौर्य तें कैसें । शत्रूंचें निःशेष नांव पुसे । वैरी कोणी कोठेंचि नसे । करणें ऐसें तें शौर्य ॥ ४६ ॥ धर्मयुद्धाची शौर्यवृत्ती जेणें विजयश्री चढे हातीं । दुश्चित्त निःशस्त्रीं न हाणिती । पळतया न मारिती महाशूर ॥ ४७ ॥ संमुख आलिया रणांगणीं । मागें पावो न ठेवी रणीं । एकला विभांडी वीरक्षोणी । हे स्वधर्मकरणी निजशौर्यें ॥ ४८ ॥ मृत्यूएवढा महावैरी । जो निःशेष नाहीं करी । त्याच्या शौर्याची थोरी । सुरासुरीं वानिजे ॥ ४९ ॥ एवं निजशौर्य निर्धारा । निर्वैरा करणें धरा । हा चौथा गुण खरा । जाण क्षात्रद्वारा क्षत्रियांचा ॥ १५० ॥ शास्त्रांचे घाय वाजतां माथां । कां सपिच्छ बाण खडतरतां । रणांगणीं न सरे मागुता । हे सहिष्णुता क्षत्रियांची ॥ ५१ ॥ आलिया गजदळाचे थाट । महावीरांचे घडघडाट । तो यावा साहे सुभट । सहिष्णुता चोखट ती नांव ॥ ५२ ॥ समुद्रलहरींच्या संपाता । कुलाचल न सरे परता । तेवीं परसैन्याच्या आघाता । न सरे मागुता रणांगणीं ॥ ५३ ॥ तेथ यशअपयशांची व्यथा । हर्षशोकविषमता । बाधीना क्षत्रियांच्या चित्ता । सर्वसहिष्णुता या नांव ॥ ५४ ॥ या नांव तितिक्षा जाण । हें क्षत्रियांचें पांचवें लक्षण । एक औदार्याचा गुण । दातेपण क्षत्रियांचें ॥ ५५ ॥ क्षत्रियांचे प्रकृतीस जाण । द्रव्य तें तृणासमान । याचकांचें निवे मन । तें देणें दान सर्वस्वें ॥ ५६ ॥ देश काल सत्पात्र स्थान । तेथ देऊनि सन्मान । निर्विकल्पभावें गहन । देणें

असलें, पृथ्वी उलथून पडते कीं काय अशी हांदरत असली, तरी त्याचें धैर्य रेसभरहि ढळत नाहीं. ४३ प्रलयकाल जरी ओढवला तरी त्याच्या मनाला यत्किंचित्‌हि भय वाटत नाहीं. असें ज्याचें स्वाभाविक धैर्य असतें त्याला धृति असें म्हणतात. ४४ चौऱ्यांशी प्रकारचे दांड-पट्टे खेळण्यांत निपुण असलेला जो स्वधर्माप्रमाणें शस्त्र व अस्त्रविद्येंत प्रवीण असून युक्ति-प्रयुक्तीनें युद्धांत त्यांचा उपयोग करण्याचें जाणतो, त्याच्या त्या गुणालाच क्षत्रियांची धृति म्ह० धैर्य म्हणतात. ४५ शूराचें शौर्य कसें असतें, तें ऐक. शत्रूचें नांवच साफ पुसून टाकिल्यामुळें त्याला मुळीं शत्रु उरतच नाहीं. असें करणें हेंच खरें शौर्य होय. ४६ त्याच्या शौर्याची वृत्ति धर्मयुद्धाची असते. त्यामुळें त्याला नेहमीं विजय मिळतो. निःशस्त्र असणारांवर व शत्रु व मित्र या दोहोंपक्षांविषयीं उदासीन असणारांवर तो कधींहि शस्त्र उचलीत नाहीं. त्याचप्रमाणें खरा पुरुष पळणारास केव्हांहि मारीत नाहीं. ४७ रणभूमीवर समोर आल्यावर मग तो युद्धांतून मागें पाऊल घेत नाहीं. एकटा शत्रूच्या असंख्य सेनेवर मारा करितो हेंच स्वधर्मयुक्त खरें शौर्य होय. ४८ मृत्यूसारख्या प्रबळ शत्रूलाहि तो नाहींसा करितो. तेव्हां त्याच्या शौर्याची थोरवी देव-दानवहि गातात. ४९ याप्रमाणें आपल्या अंगच्या शौर्यानें तो सगळी पृथ्वी शत्रुशून्य करितो. हा क्षात्रधर्मानुसार क्षत्रियांचा चौथा गुण आहे. १५० मस्तकावर शस्त्राचे घाव जरी बसले, किंवा पंखानें युक्त असलेले बाण अंगांत शिरले तरीहि समरांगणांतून मागें न फिरणें ही क्षत्रियाची सहिष्णुता म्ह० सहनशीलता होय. ५१ हत्तीच्या सैन्यांचीं पथकें व मोठाले योद्धे जरी अंगावर धांवून आले तरी जो श्रेष्ठ वीर तो हल्ला सहन करितो, त्यालाच सहिष्णुता असें म्हणतात. ५२ समुद्राच्या मोठाल्या लाटा वेगानें जरी येऊन आपटत असल्या तरी कुलपर्वत जसा मागें सरत नाहीं, त्याप्रमाणें शत्रुसैन्याचे भयंकर आघात जरी होत असले, तरी (क्षत्रिय) रणांगणांतून माघार घेत नाहीं. ५३ त्यांतील यश व अपयश यांची व्यथा किंवा हर्ष व शोक यांची विषमता क्षत्रियांच्या चित्ताला पीडा देत नाहीं. यालाच सर्वसहिष्णुता म्हणतात. ५४ हें सहनशीलत्व क्षत्रियांचें पांचवें लक्षण आहे. आतां क्षत्रियांची दानशीलता म्ह० औदार्य ऐक. ५५ क्षत्रियस्वभावाला द्रव्य तृणासारखें वाटत असतें. तो याचकाची तृप्ति होईपर्यंत आपल्या सर्वस्वाचें दान करितो. ५६ योग्य देश, काल व सत्पात्र पाहून तो निर्विकल्प भावनेनें विधियुक्त

दान विध्युक्त ॥ ५७ ॥ चंद्र चकोराते पाहीं । सदा देतां नुबगे कांहीं । तेवीं हा याचकाचे ठायीं । पराङ्मुखता नाहीं क्षत्रिया ॥ ऐसें स्वाभाविक जे दान । हा क्षत्रियांचा प्रकृतिगुण । या नांव गा उदारपण । सहावें लक्षण क्षत्रियांचें ॥ ५९ ॥ परमार्थप्राप्तिउपायीं । स्वधर्मनिष्ठा क्षत्रियांठायीं । जो जो व्यवसावो करणें कांहीं । तो उद्यम पाहीं बोलिजे ॥ १६० ॥ वेंचूनियां निजप्राण । गोब्राह्मणांचें संरक्षण । स्वधर्में प्रजापालन । पृथ्वीरक्षण निरुपद्रवें ॥ ६१ ॥ या नाव गा उद्यम जाण । क्षत्रियांचें सातवें लक्षण । आतां स्वधर्मस्थैर्यगुण । तेंही निरूपण अवधारीं ॥ ६२ ॥ गोब्राह्मणसंरक्षणता । स्वधर्में प्रजापाळकता । ये ठायीं उबगु न ये चित्ता । या नांव स्थिरता क्षत्रियांची ॥६३॥ स्वधर्म जे स्थिरता । तें आठवें लक्षण तत्त्वतां । ब्राह्मणभक्तीची जे कथा । ऐक आतां सांगेन ॥६४॥ परमार्थप्राप्तीचें कारण । क्षत्रियासी मुख्यत्वें गुरु ब्राह्मण । त्या ब्राह्मणाचें ब्रह्मभजन । सर्वस्वें जाण करावें ॥६५॥ ब्रह्मभावें ब्राह्मणभजन । विधियुक्त देवोनि सन्मान । अनुदिनीं ब्राह्मणपूजन । सद्भावें जाण जो करी ॥ ६६ ॥ जो मद्भावें ब्राह्मणपूजा । सन्मानें सुखी करी द्विजा । उद्धवा तो आत्मा माझा । तेणें मज अधोक्षजा पूजिलें ॥ ६७ ॥ क्षत्रिय सन्मानें द्विज पूजिती । तेणें त्यांसी ऐश्वर्यप्राप्ती । ब्राह्मण ब्राह्मणां द्वेषिती । तेणें पावती दरिद्रदुःख ॥ ६८ ॥ ब्राह्मणभजनमार्गें । ब्रह्मसुख पायां लागे । ब्रह्मसायुज्य घर रिघे । तरी भक्त नेघे द्विजभजनें ॥ ६९ ॥ ऐसें करितां ब्राह्मणभजन । मी परब्रह्म होय त्या अधीन । त्याच्या ऐश्वर्याचें चिन्ह । दहावें लक्षण तें ऐक ॥ १७० ॥ न करितां ब्राह्मणभजन । अंगीं ऐश्वर्य न ये जाण । मी जाहलों षड्गुणैश्वर्यसंपन्न । सदा द्विजचरण हृदयीं दृढ वाहतां ॥ ७१ ॥ ब्राह्मणभजनें स्वभावतां । माझी सत्ता ये त्याच्या हाता । तेव्हां त्याची आज्ञा वंदिती माथां । जाण तत्त्वतां सुरासुर ॥ ७२ ॥ त्याचे आज्ञेभेण ।

दान देतो. ५७ चंद्र जसा चकोराला सतत यथेच्छ चांदणें देण्यास कधीं त्रासत नाहीं, तसाच क्षत्रिय याचकाला दान देण्यांत केव्हांहि माघार घेत नाहीं. ५८ अशी जी स्वाभाविक दान देण्याची प्रवृत्ति हा क्षत्रियाचा प्रकृतिसिद्ध गुण आहे. अशा प्रकारचें औदार्य हें त्यांचें सहावें लक्षण आहे. ५९ परमार्थप्राप्तीच्या उपायांत क्षत्रियाची स्वधर्मावर निष्ठा असते. त्यास अनुसरून जो जो व्यवसाय, त्याला उद्यम म्हणतात. १६० स्वतःचा प्राणहि खर्ची घालून गोब्राह्मणांचें रक्षण, स्वधर्मानें प्रजापालन व उपद्रव न देतां पृथ्वीचें संरक्षण हे जे क्षत्रियांचे धर्म त्याला उद्यम असें म्हणतात. ६१ हें क्षत्रियांचें सातवें लक्षण आहे. आतां त्यांच्या स्वधर्मनिष्ठेचें लक्षण ऐक. ६२ गो-ब्राह्मणांचा प्रतिपाल व स्वधर्मानें प्रजापालन करण्यांत क्षत्रियाला केव्हांहि कंटाळा येत नाहीं, हीच त्याची स्थिरता होय. ६३ स्वधर्मानें स्थैर्य हें आठवें लक्षण झालें. आतां त्यांच्या ब्राह्मणभक्तीची कथा सांगतों, ती ऐक. ६४ क्षत्रियांच्या परमार्थप्राप्तीचे गुरु ब्राह्मण आहेत. त्या ब्राह्मणांची ब्रह्मभावनेनें ते भक्ति करितात. ६५ जो ब्रह्मभावानें नित्य ब्राह्मणाचें पूजन, सत्कार व भक्ति करितो, मद्भावानें ब्राह्मणांना पूजितो, ६६ आदरानें ब्राह्मणाला सुखी करितो, तो माझा आत्माच आहे, असें समज. उद्धवा ! त्यानें मज परमात्म्याची पूजा केली असें समजावें. ६७ क्षत्रिय मोठ्या सन्मानानें ब्राह्मणांची पूजा करितात. त्यांना ऐश्वर्य प्राप्त होतें व ब्राह्मण ब्राह्मणांचा द्वेष करितात, त्यामुळें ते दारिद्र्याचें दुःख भोगितात. ६८ ब्राह्मणांची भक्ति केल्यानें ब्रह्मसुख पायां पडत येतें, सायुज्यमुक्ति घरीं चालून येते, तरीहि माझा क्षत्रियभक्त ब्राह्मणाची भक्ति टाकून त्यांचा स्वीकार करीत नाहीं. ६९ अशा प्रकारें ब्राह्मणाची भक्ति केली असतां मी साक्षात् परमात्मा त्याच्या अधीन होतों. (हें नववें लक्षण झालें.) आतां क्षत्रियांचें दहावें लक्षण जें ऐश्वर्य त्याची खुण सांगतों, ऐक. १७० ब्राह्मणांचें भजन केल्यावांचून अंगीं ऐश्वर्य बाणत नाहीं. ब्राह्मणाच्या पदाचें चिन्ह सतत हृदयावर वागविल्यामुळेंच मी षड्गुणैश्वर्यसंपन्न झालों. ७१ ब्राह्मणाची भक्ति केल्यानें माझी सत्ता क्षत्रियभक्ताच्या हातीं जाते, त्यामुळें देव-दानवहि त्यांची आज्ञा शिरसा वंद्य मानितात. ७२ त्यांच्या आज्ञेच्या भयानें कधीं अवर्षण (म्ह० पाऊस न पडल्यानें दुष्काळ) पडूं शकत

पडों न शके अवर्षण । न्यायतां प्रजापालन । धर्मसंरक्षण त्याचेनी ॥ ७३ ॥ येणेंच स्वधर्में अतिचोख । भरत पुरूरवा जनकादिक । महाऐश्वर्य पावले देख । अलौलिक द्विजभजनें ॥ ७४ ॥ एवं क्षत्रियांचें दशलक्षण । तुज म्यां केलें निरूपण । यांत मुख्यत्वें ब्राह्मणभजन । श्रेयस्कर सर्वांसी ॥ ७५ ॥ वैश्याचे प्रकृतीस जाण । स्वाभाविक पंचलक्षण । ऐक त्यांचें निरूपण । आचरण यथार्थें ॥ ७६ ॥

आस्तिक्यं दाननिष्ठा च अदम्भो ब्रह्मसेवनम् । अतुष्टिरर्थोपचयैर्वैश्यप्रकृतयस्त्विमाः ॥ १८ ॥

वैश्याचे प्रकृतीसी जाण । अर्थतृष्णा अतिगहन । जाहलिया कोट्यानुकोटी धन । तृष्णा परिपूर्ण हों नेणे ॥ ७७ ॥ अस्तिक्यता अर्थसंचयासी । द्वीपींहूनि द्वीपांतरासी । नाना वस्तु ने विश्वासेंसीं । साधावया अर्थासी भावार्थी ॥ ७८ ॥ कां वेदशास्त्रीं अतिविश्वासी । हें मुख्यत्वें ऐश्वर्य वैश्यासी । नेदें लिहिल्या स्वधर्मासी । नव्हे उदासी अणुमात्र ॥ ७९ ॥ वैश्याचें स्वधर्माचरण । नेमेंसी द्यावें नित्यदान । प्राणांत मांडल्या जाण । दानखंडण हों नेदी ॥ १८० ॥ परलोकप्राप्तीचें कारण । ब्राह्मणाची सेवा जाण । ब्राह्मणआज्ञा परम प्रमाण । विशेष जाण गुरुसेवा ॥ ८१ ॥ वेदशास्त्रार्थें प्रमाण । सद्गुरु परब्रह्म जाण । तद्रूपें देखावे ब्राह्मण । सेवेसी प्राण अर्पावा ॥ ८२ ॥ मी मान्य होईन अतिश्रेष्ठा । कां लौकिकीं जोडावी प्रतिष्ठा । ऐशा परीची दांभिक निष्ठा । वैश्या वरिष्ठा स्पर्शेना ॥ ८३ ॥ सांडूनियां धूर्तपण । निर्लोभ निर्दंभ जाण । विप्रसेवेसी वोपिती प्राण । हें मुख्य लक्षण वैश्याचें ॥ ८४ ॥ येणेंचि परमार्थप्राप्ती । सत्य जाण वैश्ययाती । हे स्वाभाविक गा प्रकृती । जाण निश्चितीं वैश्यासी ॥ ८५ ॥ आतां शूद्राचिया प्रकृती । त्रिविध कर्मांची पैं प्राप्ती । तेही सांगेन तुजप्रती । ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ८६ ॥

नाहीं. तो राजा न्यायानें प्रजेचें पालन करून धर्माचें रक्षण करीत असतो. ७३ याच उत्तम धर्मानें व अलौकिक ब्राह्मण सेवेनें सम्राट भरत, पुरूरवा व जनकादिक प्रसिद्ध राजे एवढ्या ऐश्वर्याला प्राप्त झाले. ७४ याप्रमाणें क्षत्रियस्वभावांतील दहा लक्षणें मीं तुला सांगितलीं. त्यांत मुख्यत्वेंकरून ब्राह्मणाची सेवा सर्वांनाच श्रेयस्कर आहे. ७५ आतां वैश्यांच्या स्वभावांत पांचच गुण आहेत. त्यांचें लक्षण व आचरण स्पष्ट करून सांगतों, तें ऐक. १७६.

आस्तिक्यं दाननिष्ठा च अदम्भः ब्रह्मसेवनं अर्थोपचयैः अतुष्टिः इमाः वैश्यप्रकृतयः तु—गुरु व शास्त्र यांच्या वचनावर विश्वास, दानतत्परता, अदंभ, ब्राह्मणसेवा व धनसंचयांनीं संतुष्ट नसणें या वैश्यप्रकृति आहेत. १८.

वैश्यांचा स्वभाव अत्यंत द्रव्यलोभी असतो. त्यांच्या जवळ कोट्यवधि धनाच्या राशी जरी असल्या तरी त्यांची तृप्ति केव्हांहि होत नाहीं. ७७ द्रव्यसंचयाच्या श्रद्धेनें तो या द्वीपाहून त्या द्वीपाला अनेक वस्तू द्रव्य मिळविण्याच्या आशेनें नेतो. वेदशास्त्रावर श्रद्धा ठेवणें हेंच वैश्यांचें मुख्य ऐश्वर्य आहे. ७८ वेदविहित स्वधर्माचरण करण्यांत तो यत्किंचित्‌हि उदासीन नसतो. ७९ नित्य नियमानें दान द्यावें, प्राण गेला तरी त्यांत खंड पडूं देऊं नये, हें वैश्यांचें धर्माचरण आहे. ८० परलोकप्राप्तीसाठीं त्यानें ब्राह्मणांची सेवा करावी. ब्राह्मणांची आज्ञा प्रमाण मानावी. विशेषतः गुरुसेवा करावी. ८१ सद्गुरु साक्षात् परब्रह्म आहे, हें वेदशास्त्रांसहि प्रमाण आहे. करितां ब्राह्मणांना सद्गुरु समजून त्यांच्या सेवेसाठीं आपण प्राण अर्पण करावा. ८२ आपली श्रेष्ठ लोकांत प्रतिष्ठा व्हावी, मान-मान्यता मिळावी अशा प्रकारची दांभिक वृत्ति उत्तम वैश्यांना स्पर्शहि करीत नाहीं. ८३ कपट टाकून लोभरहित व दंभरहित होऊन ब्राह्मणसेवेंत स्वतःला वाहून घेणें, हें वैश्यांचें मुख्य लक्षण आहे. ८४ या गुणांनीं वैश्यांना परमार्थ प्राप्त होतो. ही वैश्यांची स्वाभाविक वृत्ति आहे, हें तूं निश्चित जाण. ८५ आतां शूद्राचा स्वभाव तीन प्रकारचीं कर्में करीत असतो. उद्धवा ! तोहि प्रकार तुला सांगतों, लक्ष देऊन ऐक. १८६.

शुश्रूषणं द्विजगवां देवानां चाप्यमायया । तत्र लब्धेन सन्तोषः शूद्रप्रकृतयस्त्विमाः ॥ १९ ॥

स्वकर्म शूद्राचिये ज्ञाती । द्विजसेवा यथानिगुती । त्याचेनि प्रसादें जीविकावृत्ती । निष्कपट स्थिति सेवेची ॥ ८७ ॥ करावें गृहस्थाचें गोरक्षण । चाराव्या जेथें तृणजीवन । श्वापदभय आलिया जाण । वेंचूनि प्राण रक्षाव्या ॥ ८८ ॥ गोरक्षणीं वेंचिल्या प्राण । त्यासी उत्तम गति जाहली जाण । ज्यासी गायींचा कळवळा गहन । त्यासी मी श्रीकृष्ण सदा साह्य ॥ ८९ ॥ द्विजसेवा गोरक्षण । दोनही वृत्ति न मिळतां जाण । तरी देवालयीं समार्जन । जीविकार्थ जाण करावें ॥ १९० ॥ निष्कपटभावें आपण । निर्मळ करावें हरिरंगण । तेथील प्राप्तीचेनि जाण । करावी पूर्ण जीविका ॥ ९१ ॥ तेथ जे जे काळीं जे जे प्राप्ती । तेणें सुखें असावें निजवृत्तीं । स्वधर्मकर्मस्थिती । शूद्रप्रकृतिस्वभावो ॥ ९२ ॥ विप्रासी अग्निहोत्रादिक कर्म । शूद्र नमी द्विजोत्तम । तेथ दोहींचा स्वधर्म । सहजें सम होतसे ॥ ९३ ॥ गृहस्थाश्रमाचें वर्तन । तिन्ही आश्रमां आश्रयो आपण । अन्न वस्त्र देऊनि जाण । संरक्षण करावें ॥ ९४ ॥ ब्रह्मचर्याश्रमवर्तन । गुरुसेवा वेदाध्ययन । त्यासी द्यावया दान । अधिकार जाण असेना ॥ ९५ ॥ ब्रम्हचाऱ्यासी जें जें योजिलें । तें पाहिजे गुरूसी समर्पिलें । गुरूसी वंचूनि दान दीधलें । ते तेणें केलें अधर्म ॥ ९६ ॥ वानप्रस्थाश्रमीं जाण । मुख्यत्वें तप प्रधान । करावें अग्निशुश्रूषण । वेदोक्तलक्षणप्रकारें ॥ ९७ ॥ संन्यासी ब्रम्हचारी दीन । समयीं आश्रमा आल्या जाण । यथानुशक्त्या द्यावें अन्न । हें आश्रमरक्षण वानप्रस्था ॥ ९८ ॥ संन्याशासी अहिंसा प्रधान । ज्ञानपरिपाकें शांति संपूर्ण । अनोळखी भिक्षाटण । हा मुख्य धर्म जाण चतुर्थाश्रमीं ॥ ९९ ॥ वर्णाश्रमांहूनि बाह्य जाण । केवळ अंत्यजादि जे जन । त्यांचें प्रकृतीचें जें लक्षण । स्वयें नारायण सांगत ॥ २०० ॥

द्विजगवां देवानां च अपि अमायया शुश्रूषणं–ब्राह्मण व गायी, यांची आणि देवांचीहि निष्कपटपणें सेवा करणें, तत्र लब्धेन सन्तोषः–त्यांत जें प्राप्त होईल त्यानें संतुष्ट होणें, इमाः शूद्रप्रकृतयः तु–या शूद्राच्या प्रकृति आहेत. १९.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या द्विजांची योग्यप्रकारें सेवा करून त्यांच्या कृपेवर उपजीविका करणें, अशी जी निष्कपटसेवा तेंच शूद्रजातीचें स्वकर्म होय. ८७ त्यानें जेथें गवत व पाणी असेल तेथें गृहस्थांच्या गायी नेऊन चाराव्या. वाघ, लांडग्यांसारखा हिंस्र पशूंचें भय दिसतांच स्वतःच्या प्राणाचीहि पर्वा न करितां त्यांचें रक्षण करावें. ८८ कारण गायींचें रक्षण करण्यांत ज्यांचा प्राण खर्ची पडतो, तो उत्तम गतीला प्राप्त होतो. ज्याला गायींचा अतिशय कळवळा असतो, त्याला मी श्रीकृष्ण निरंतर साह्य करितों. ८९ म्हणून ब्राह्मणांची सेवा व गायींचें रक्षण हीं दोन्हीं कामें जर मिळालीं नाहींत तर शूद्रानें देवळांत जाऊन तेथें झाड-लोट, सडा-संमार्जन करावें व त्यावर आपली उपजीविका करावी. १९० निष्कपटमनानें देवाचा सभामंडप व अंगण झाडून स्वच्छ करावें. तेथें होणाऱ्या प्राप्तीवर आपला निर्वाह चालवावा. ९१ ज्या काळीं जी प्राप्ति होईल, त्यांत समाधान मानून सेवावृत्तीवर उपजीविका करणें हा शूद्राचा जन्मसिद्ध स्वभाव आहे. ९२ ब्राह्मणाचें अग्निहोत्रादि कर्म व शूद्राचें श्रेष्ठ ब्राह्मणांना नमन, हे दोन्ही त्या दोघांचे समसमान स्वधर्म आहेत. ९३ गृहस्थानें अन्न-वस्त्र देऊन ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी यांना आश्रय द्यावा. ९४ ब्रह्मचाऱ्यानें केवल गुरुसेवा व वेदाध्ययन करावें. त्याला दान देण्याचा अधिकार नाहीं. ९५ ब्रह्मचाऱ्याला जें कांहीं मिळेल तें त्यानें गुरूला अर्पण करावें. गुरूला फसवून दिलेलें दानहि अधर्म होतो. ९६ वानप्रस्थाला मुख्यत्वेंकरून तप श्रेष्ठ आहे. वेदोक्तप्रकारानें अरण्यांत राहून त्यानें अग्निसेवा व तपश्चर्या करावी. ९७ एखाद्या प्रसंगीं कोणी संन्यासी, ब्रह्मचारी किंवा दीन याचक दाराशीं आला तर त्याला यथाशक्ति अन्न द्यावें. हाच वानप्रस्थाचा आश्रमधर्म आहे. ९८ संन्याश्याला अहिंसा मुख्य आहे. ज्ञान परिपक्व झाल्यामुळें त्याला पूर्ण शांति असते. अपरिचित ठिकाणीं भिक्षा मागत फिरणें हा त्याचा मुख्य धर्म आहे, असें जाण. ९९ आतां या चार वर्णाश्रमांहून भिन्न जे अंत्यजादि वर्णबाह्य लोक त्यांच्या स्वभावाचें लक्षण स्वतः नारायण सांगत आहे. २००.

अशौचमनृतं स्तेयं नास्तिक्यं शुष्कविग्रहः । कामः क्रोधश्च तर्षश्च स्वभावोऽन्तेवसायिनाम् ॥ २० ॥

ये श्लोकींचे अष्ट गुण । त्यागावया न मनी ज्याचें मन । तोही अंत्यजासमान । हें प्रकृतिलक्षण अतिनिंद्य ॥ १ ॥ ज्यासी स्नानसंध्या शौचाचार । स्वकर्म नावडे साचार । अंतरीं विकल्प अपार । जैसा विखार काळिया ॥ २ ॥ कनकफळ नामें गोमटें । आंत माजिरें बाहेर कांटे । तैसें सबाह्य वोखटें । अशौच मोठें त्या नांव ॥ ३ ॥ शरीर श्वेत निर्नासिक । तोंडाळ बोढाळ पतिनिंदक । ते स्त्रियेच्या ऐसें देख । अशौचक सबाह्य ॥ ४ ॥ यापरी गा अशौचता । ज्याचे अंगीं स्वभावतां । तो जाण पां तत्त्वतां । गुण प्रथमतां अंत्यजाचा ॥ ५ ॥ असत्यता जे प्रकृतीपाशीं । अखंड वसे अहर्निशीं । मातापितादि गुरूंसी । झकवणें त्यांसी मिथ्यात्वें ॥ ६ ॥ जेवीं कां शिमग्याच्या सणीं । रामकृष्ण न म्हणे कोणी । उपस्थनामें गर्जे वाणी । संतोषोनी स्वानंदें ॥ ७ ॥ तेवीं जागृति स्वप्न सुषुप्तीं । असत्य आवडे ज्याच्या चित्तीं । तो जाण पां निश्चितीं । अंत्यजप्रकृति स्वभावें ॥ ८ ॥ पडिलिया दृष्टी बुडीं । मायबापांचें ठेवणें काढी । नाना विश्वासपरवडी । बुडवी गांठोडी गुरूची ॥ ९ ॥ सधन सांपडल्या हाता । नाना युक्ती अतिक्षुद्रता । नातरी बलात्कारें सर्वथा । घ्यावें तत्त्वतां सर्वस्व ॥ २१० ॥ यापरी गा अधर्मतां । परद्रव्य यावया हाता । आसक्ति ज्याचिया चित्ता । जाण तत्त्वतां ते चोरी ॥ ११ ॥ स्वधर्मकर्मीं स्वभावतां । विश्वास नाहीं ज्याच्या चित्ता । वेदशास्त्रपुराणार्था । मिथ्या सर्वथा जो मानी ॥ १२ ॥ उद्धवा जाण तत्त्वतां । या नांव गा नास्तिकता । आस्तिक्यभावो स्वभावतां । अणुमात्रतां जेथ नाहीं ॥ १३ ॥ गांठीं असतां लक्षकोडी । सदा

—वर्णबाह्य लोकांचेहि स्वभाव सांगतात—

अशौचं०...तर्षः च अन्तेवसायिनां स्वभावः—अशुद्धि, असत्य, चौर्य, नास्तिक्य, कारणावांचून कलह, काम, क्रोध व तृष्णा हे अति शूद्रांचे स्वभाव आहेत. २०.

या श्लोकांत सांगितलेले मिथ्या भाषण, चोरी, अपवित्रपणा इत्यादि आठ दोष टाकण्याचें ज्याच्या कधीं मनांतहि येत नाहीं, तो मनुष्य अंत्यजासारखा समजावा. हें प्रकृतीचें अतिनिंद्य लक्षण आहे. १ त्याला स्नान-संध्या, पवित्रपणा, आचार व स्वकर्म आवडत नाहीं; काळ्या सर्पाप्रमाणें त्याच्या मनांत अपार विकल्प असतो; २ कनकफळ (धोतऱ्याचें फळ) हें नांव मोठें सुंदर असतें, पण तें उन्माद आणणारें व बाहेरून कांट्यांनीं युक्त असतें; तसें आंतून बाहेरून जें मलिन असतें, त्यास अशौच म्हणतात. ३ शरीराचा वर्ण चांगला गोरा-गोमटा असावा. पण नाक नसावें; किंवा तोंडाळ, आळशी व पतीची निंदा करणारी स्त्री असावी तसें हें सबाह्य अशौच आहे. ४ अशा प्रकारचा अपवित्रपणा स्वभावतःच ज्याच्या अंगीं असतो तें अंत्यजाचें पहिलें लक्षण समजावें. ५ ज्याच्या स्वभावांत मिथ्या भाषण निरंतर भरलेलें असतें; माता-पिता गुरु इत्यादिकांना खोटेपणानें फसवीत असतो. ६ ज्याप्रमाणें शिमग्याच्या सणांत कोणी राम-कृष्णाचें नांव उच्चारीत नाहीं, पण बहुतेक सर्व लोक अश्लील शब्दांचा घोष मोठ्या हर्षानें करीत असतात, ७ त्याप्रमाणें जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ति या या तीन्ही अवस्थां-मध्यें ज्याच्या चित्ताला असत्याचीच आवड असते, तो अंत्यजाचा दुसरा स्वभावगुण होय. असें निश्चयानें जाणावें. ८ ठेवीवर दृष्टि गेली पुरें, कीं तो आई-बापांचा ठेवाहि लुबाडण्यास कमी करीत नाहीं. मोठ्या विश्वासानें ठेविलेली गुरूची ठेवहि बुडवितो. ९ एखादा धनिक हातीं सापडतांच अनेक युक्ति-प्रयुक्तीनें, अतिक्षुद्र उपायानें, नाहीं तर शेवटीं बलात्कारानें त्याचें सर्वस्व लुटून घेतो. १०. याप्रमाणें परद्रव्य हस्तगत करून घेण्याची ज्याला आसक्ति असते, जो अधर्म करितो, त्याच्या या वृत्तीला चोरी असें म्हणतात. ११ स्वधर्म-कर्म यांवर ज्याचा स्वभावतःच विश्वास नसतो, जो वेदशास्त्र-पुराणांस सर्वथा मिथ्या मानितो १२ त्याच्या त्या वृत्तीस नास्तिकपणा असें म्हणतात. हे उद्धवा ! त्याच्या स्वभावांत रेसभरहि आस्तिकपणा नसतो. १३ पदरीं पुष्कळ धन असूनहि ज्याच्या तोंडांत नेहमीं 'माझ्यापाशीं कांहीं नाहीं ' हे शब्द असतात, पण घरांतील आपत्तीचें निवारण करण्यासाठीं तो अमार्गानें

नास्तिकता ज्याचे तोंडीं । घरींच्या आपदा लावी गाढी । ते प्रकृति रोकडी अंत्यजाची ॥ १४ ॥ कार्येवीण कोरडी कळी । संबंधेंवीण वृथा सळी । अखंड करी दांतकसोळी । ते अंत्यजाची निजवृत्ती ॥ १५ ॥ जया सदा विरोध पोटीं । वरिवरी गोड मैंद गोठी । भीतरीं द्वेषाचा भडका उठी । जो क्रूरदृष्टी सर्वदा ॥ १६ ॥ जन्मवरी केल्या उपकारकोटी । त्यासी एकचि उत्तरासाठीं । अपकारू करावया पोटीं । छिद्रदृष्टी सदा ठेवी । ॥ १७ ॥ उपकाऱ्या अपकारस्थिती । अंत्यज न करीं प्राणांतीं । ऐशिया विरोधातें जे वाहती । शुष्कविग्रहगती त्या नांव ॥ १८ ॥ जो सुहृदांमाजी पाडी वैर । अपायीं घाली थोरथोर । अशौच नास्तिक्य घोर । जाणावा नर अतिविग्रही ॥ १९ ॥ स्वार्थेंवीण परकार्य नाशी । शुष्कविग्रही म्हणिपे त्यासी । उद्धवा ऐशी प्रकृति ज्यासी । अंत्यजही त्यासी पैं भीती ॥ २२० ॥ ऐक कामाची कथा । कनक आणि कांता । येविषयीं अतिलोभता । उपरमु चित्ता असेना ॥ २१ ॥ स्त्रीकामाचेनि नांवें । लिंगमात्र असावें । मग सेव्यासेव्यभावें । विचारू जीवें स्मरेना ॥ २२ ॥ तैसेंच जाण द्रव्यार्था । भलतैसें पावो हाता । न विचारी विहिता अविहिता । अतिकामता अर्थार्थी ॥ २३ ॥ अविहित कामस्थिती । हा स्वभाव ज्याचे वृत्ती । ते अंत्यजादि प्रकृती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २४ ॥ पाहें पां कामिकांच्या पोटीं । सदा क्रोधाची आगटी । कामअप्राप्ती ऐकतां गोष्टी । भडका उठी प्रळयांत ॥ २५ ॥ ज्याचिये शरीरस्थिती । उसंतू नाहीं क्रोधाहातीं । सदा धुपधुपीत वृत्ती । ते जाण प्रकृती अतिनीच ॥ २६ ॥ प्राप्तभोगें तृष्णा न बाणे । ऐकिल्याही भोगाकारणें । अखंड मनाचें बैसे धरणें । ते प्रकृति जाणें अतिनीच ॥ २७ ॥ म्यां सांगितले जे आठही गुण । हे ज्याचे प्रकृतीस लक्षण । तो हो कां भलता वर्ण ।

वाटेल तितकें धन उधळितो, अशा प्रकारचा स्वभाव ही अंत्यजाची प्रकृति होय. १४ जो कारणावांचून रिकामें भांडण उपस्थित करितो, कांहीं संबंध नसतां लोकांना व्यर्थ छळीत असतो, सदा सर्वकाळ दांत-ओठ चावीत असतो, ती अंत्यजाची स्वाभाविक वृत्ति होय. १६ ज्याच्या मनांत निरंतर वैरभाव असतो, वरून मात्र तो ठगाच्या मिठ्या गोष्टी करितो, पण त्याच्या अंतःकरणांत द्वेषाचा भडका उठलेला असतो व नेहमीं क्रूरदृष्टि असतो. १६ त्याच्यावर ज्यानें जन्मभर असंख्य उपकार केले असतील, त्यानें कधीं एखादा वांकडा शब्द उच्चारला तर तेवढ्यासाठींहि त्याला अपकार करण्यास तो टपलेला असतो व नेहमीं संधि पहात असतो. १७ अंत्यजहि उपकार करणाराला प्राणान्तींहि अपाय करीत नाहीं, पण त्याच्याहि उलट ज्या माणसाचें वर्तन असतें, त्याला शुष्कविग्रह म्हणतात. १८ जो दोघां जीवलग स्नेहांत वैर उत्पन्न करितो, मोठ-मोठ्या लोकांना संकटांत टाकितो, असा अपवित्र, नास्तिक, भयंकर मनुष्य मोठा भांडखोर समजावा. १९ लाभावांचून दुसऱ्याच्या कार्याचा नाश करणारासहि शुष्कविग्रही म्हणतात. उद्धवा ! अशा स्वभावाच्या माणसाला अंत्यजहि भितात. २२० आतां कामाचा प्रकार ऐक. त्यास द्रव्य व दारा यांचा अतिशय लोभ असतो. त्याच्या चित्ताला विश्रांति कशी ती नसते. २१ स्त्रीसंगाविषयीं तर तो इतका लंपट असतो कीं, स्त्रीजाति दिसली पुरें, कीं योग्य-अयोग्यतेचा तो विचारच करीत नाहीं. २२ द्रव्यासंबंधींहि अशीच स्थिति. कसल्याहि भलत्या मार्गानें जरी तें प्राप्त झालें तरी तो चांगल्या-वाईटाचा विचारच करीत नाहीं. द्रव्यार्जनाचा त्याला अतिशय लोभ असतो. २३ उद्धवा ! धर्मशास्त्राच्या नियमाविरुद्ध अयोग्य मार्गानें इच्छा पूर्ण करण्याची ज्याची वृत्ति असते, तो हीन जातीच्या स्वभावाचा जाणावा. २४ विषयासक्त लोकांच्या अंतःकरणांत निरंतर क्रोधाची शेकोटीच पेटलेली असते. आपली इच्छा पूर्ण होत नाहीं, असें दिसतांच प्रलयकालासारखा त्याच्या अंगाचा भडका होतो. २५ ज्याचें शरीर क्रोधाच्या स्वाधीन असतें, त्याच्या मनाला क्षणभरहि शांति नसते. ज्याची वृत्ति सर्वदा धुमसत असते, ती अति नीच प्रकृति होय. २६ प्राप्त झालेल्या सुखांत त्याची तृप्ति नसते. एखाद्या सुखाचें नांव कानीं पडतांच त्याच्या प्राप्तीसाठीं मन सारखें धरणें धरून बसतें, असा स्वभाव अतिशय नीच समजावा. २७ मीं सांगितलेले हे आठ अवगुण ज्याच्या वृत्तींत दिसतात, तो कोणत्याहि (उच्च

परी अंत्यजपण त्यामाजीं ॥ २८ ॥ अवगुण सांगितले समस्त । एक एक नरकदानीं विख्यात । मा आठही मिळाले जेथ । उगड तेथ मग कैंचा ॥ २९ ॥ त्यागावया निजस्थिती । या अवगुणांची व्युत्पत्ती । म्यां सांगितली तुजप्रती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २३० ॥ त्या गुणांतें अंगीकारिती । ते नरकगामी गा निश्चितीं । या गुणांतें जे त्यागिती । ते पावती पद माझें ॥ ३१ ॥ तेणें माझ्या पदाची प्राप्ती । सर्वां वर्णां उत्तम गती । ऐशिया गुणांची व्युत्पत्ती । सांगेन तुजप्रती उद्धवा ॥ ३२ ॥ सकळ लक्षणांचें निजसार । जें गुह्यगुणांचें भांडार । जेणें पाविजे संसारपार । ऐक साचार उद्धवा ॥ ३३ ॥ जो सर्व वर्णांचा सहज धर्म । जेणें पाविजे परब्रह्म । जे नाशिती चित्तभ्रम । ते गुण उत्तम अवधारीं ॥ ३४ ॥

अहिंसा सत्यमस्तेयमकामक्रोधलोभता । भूतप्रियहितेहा च धर्मोऽयं सार्ववर्णिकः ॥ २१ ॥

हो कां उपायो जेणें तेणें । पुढिलासी जें सुख देणें । तें उपतिष्ठे मजकारणें । तो गुण म्यां श्रीकृष्णें वंदिजे ॥ ३५ ॥ तैसेंच परपीडा असुख । पुढिलिया न देणें दुःख । तेंहीकरूनि मज होय सुख । जाण निष्टंक उद्धवा ॥ ३६ ॥ दुःख नेदूनि सुख देणें । या नांव अहिंसा म्हणणें । हा पहिला गुण जाणणें । ऐक लक्षणें सत्याचीं ॥ ३७ ॥ सत्य तें जाण पां ऐसें । ज्याचें मन वाचा असत्यदोषें । जागृतिस्वप्नसुषुप्तिवशें । स्पर्शलें नसे अणुमात्र ॥ ३८ ॥ निंदा आणि नरस्तवन । कदा मिथ्या न बोले वचन । वाचा अनसुट धरणें जाण । सत्य संपूर्ण या नांव ॥ ३९ ॥ हो कां अधर्माचिये जोडी । कोडी

अथवा नीच जातीचा) वर्णाचा कां असेना, त्याच्या अंगीं अंत्यजपणा आहे, असें खात्रीनें समजावें. २८ हे जे सगळे अवगुण मीं सांगितले, त्यांतील प्रत्येक दुर्गुण नरकप्राप्ति करून देण्याविषयीं प्रसिद्ध आहे. मग जेथें हे आठहि गुण एकवटलेले असतात, तेथें या भवचक्रांतून त्याची सुटका कशी होणार ! २९ उद्धवा ! आपल्या अंगचे हे अवगुण घालविण्यासाठींच मीं तुला त्या सर्वांचा प्रकार स्पष्ट करून सांगितला. २३० या अवगुणांचा जे स्वीकार करितात ते नरकाला जातात आणि जे या दुर्गुणांना सोडून देतात, ते माझ्या पदाला येऊन पोंचतात. ३१ ज्या गुणाच्या योगानें माझ्या पदाची प्राप्ति होते व सर्व वर्णांना उत्तम गति मिळते, त्यांचेहि प्रकार आतां तुला सांगतों. ३२ उद्धवा सगळ्या लक्षणांचें केवळ सारच, गूढगुणांचें भांडार व ज्याच्या योगानें संसाराच्या परतीराला जातां येतें, तें सांगतों ऐक. ३३ सगळ्या वर्णांचा स्वाभाविक धर्म, ज्याच्या योगानें परब्रह्मप्राप्ति होते व मनाचा चंचलपणा नाहींसा होतो, ते उत्तम गुण आतां ऐक. २३४.

—आतां सर्वलोक साधारण धर्म सांगतात—

अहिंसा–प्राण्यांची मनानेंहि हिंसा न करणें, सत्यं–आपल्याला जसें कळलें असेल तसेंच सांगणें, अस्तेयं–चोरी न करणें, अकामक्रोधलोभता–काम-क्रोध-लोभ या वृत्तींचा अभाव, भूतप्रियहितेहा च–सर्व प्राण्यांचें प्रिय व हित करण्याची इच्छा, अयं धर्मः सार्ववर्णिकः–हा धर्म सर्ववर्णसाधारण आहे. (येथील वर्ण हा शब्द सर्व लोकांच्या उपलक्षणार्थ आहे. कारण वर्णांचें धर्म पुढें गृहस्थ प्रकरणांत सांगतील.) २१.

ज्या कोणत्याहि उपायानें दुसऱ्याला सुख होईल, तो उपाय केला असतां तो मलाच प्राप्त होतो. त्याच्या त्या गुणाला मी श्रीकृष्ण वंदन करितों. ३५ त्याचप्रमाणें दुसऱ्यास पीडा न देणें, इतरांस दुःख न देणें, याहि गुणांनीं मला सुख होतें, हें निश्चित जाण. ३६ दुसऱ्यास दुःख न देतां सुख देणें याला अहिंसा म्हणतात. हा पहिला गुण झाला. आतां सत्याचें लक्षण ऐक. ३७ ज्याच्या मनाला व वाणीला जागृति-स्वप्न-सुषुप्ति या तीन्हीं अवस्थेंत असत्य भाषणाचा यत्किंचितहि स्पर्श नसतो, त्याला सत्य असें म्हणतात. ३८ एखाद्याची निंदा किंवा स्तुति करिते वेळींहि जो मिथ्या वचन उच्चारीत नाहीं, जो वाणीला पूर्णपणें ताब्यांत ठेवितो याला सत्य असें म्हणतात. ३९ अधर्मानें कोट्यवधि धन जरी मिळत असलें तरी त्याला कवडीप्रमाणें लेखून तो त्याच्याकडे पहात

धरोनियां कवडी । जो रिघों नेदी दृष्टी बुडीं । फुटकी कवडी स्पर्शेना ॥ २४० ॥ तेथेंही चोरी करणें । कां दृष्टि चुकवूनि वस्तु घेणें । अथवा न पुसतां नेणे । जीवेंप्राणें न संभवे ॥ ४१ ॥ अन्यायेोपार्जित धन । स्वप्नींही नातळे मन । हे अचौर्याचें लक्षण । तिसरा गुण उद्धवा ॥ ४२ ॥ स्वधर्मे धन यावें हाता । हेही नसे धनकामता । कामिनीकामाची नेणे वार्ता । परस्त्री ते माता नेमस्त ॥ ४३ ॥ हो कां स्वदाराभिगमन । तेथेंही आसक्त नसे मन । आश्रमधर्मार्थ जाण । प्रतिपालन स्त्रियेचें ॥ ४४ ॥ या नांव गा अकामता । उद्धवा जाण तत्त्वतां । हे चौथी लक्षणता । ऐक आतां अक्रोधू ॥ ४५ ॥ जेथ कामाचा आदरू नाहीं । तेथ क्रोधाचें न चले कांहीं । जेवीं आकाशाचे ठायीं । न रुपती पाहीं निजशस्त्रें ॥ ४६ ॥ जरी बीज जाहलें गोमटें । तरी भूमीवीण अंकुर न फुटे । तैसें कामावांचूनि कोठें । क्रोध उद्धटें न वाढे ॥ ४७ ॥ एवं कामाची जे बोळवण । तेचि क्रोधाचीही जाण । जैसें गरोदरीचें मरण । करी निर्दळण गर्भाचें ॥ ४८ ॥ शिर तुटलिया पाठीं । हस्तपादादिक्रिया तुटी । काम निमालिया पाठीं । निमाली गोठी क्रोधाची ॥ ४९ ॥ जेथ काम क्रोध नाहीं । तेथ लोभ उठी कोणे ठायीं । तळवटीं नसतां भुयी । वृक्ष कांहीं वाढेना ॥ २५० ॥ शीस बोडिलें सकेशीं । तेथ राहूं न शके ऊ जैसी । तेवीं गेलिया कामक्रोधांसी । वस्ती लोभासी असेना ॥ ५१ ॥ जेवीं कां भ्रताराचें मरण । घेऊनि जाये अहेवपण । तेवीं कामक्रोधेंवीण । लोभलक्षण असेना ॥ ५२ ॥ या नांव निर्लोभता । सत्य जाण सर्वथा । क्रोधलोभांतें वाढविता । जाण तत्त्वतां कामाचि ॥ ५३ ॥ जेथ कामाचें अपूर्ण काज । तेथ क्रोधाचें खवळे तेज । जेव्हां कामाचें पूर्ण निज । तेव्हां नाचे भोज लोभाचें ॥ ५४ ॥ जेवीं दीपाची दीपकळा । ते सर्वे बागवी तेजकाजळां । तेवीं क्रोधलोभांचा सोहळा । कामाजवळा संतत ॥ ५५ ॥ जेवीं कां

नाहीं व त्यांतील फुटक्या कवडीलाहि स्पर्श करीत नाहीं. २४० अशा पुरुषामध्यें चोरी करणें, नजर चुकवून दुसऱ्याची वस्तु घेणें किंवा न विचारतां ती वस्तु घेऊन जाणें या गोष्टी प्राण गेला तरी संभवत नाहींत. ४१ त्याचें मन अन्यायानें मिळविलेल्या धनाला स्वप्नांतहि स्पर्श करीत नाहीं, हें अचौर्याचें लक्षण आहे. उद्धवा हा तिसरा गुण झाला. ४२ स्वधर्मानें द्रव्य मिळवावें, असाहि लोभ त्याला नसतो. तो स्त्रीविषयक सुखाचीहि इच्छा करीत नाहीं. तो परस्त्रीला मातेसमान मानितो. ४३ किंवा स्वतःच्या पत्नीवरहि त्याचें मन आसक्त नसतें, तो गृहस्थाश्रमाच्या धर्माचें पालन करण्यासाठीं स्त्रीचा प्रतिपाल करीत असतो. ४४ याला विषयपराङ्मुखता म्हणतात. उद्धवा ! हें चवथें लक्षण झालें. आतां अक्रोधाचें लक्षण ऐक. ४५ जेथें इच्छेची उपेक्षा होते, तेथें, क्रोधाचें सामर्थ्य कांहीं चालत नाहीं. आकाशाला जशीं शस्त्रें भोंक पाडूं शकत नाहींत, ४६ किंवा उत्तम बीज जरी असलें तरी भूमीवांचून त्याला जसा अंकुर फुटत नाहीं, त्याप्रमाणें कामावांचून क्रोध प्रबल होत नाहीं. ४७ याप्रमाणें कामाची बोळवण करणें हीच क्रोधाची बोळवण आहे. गरोदर स्त्रीच्या मरणानें जसें तिच्या गर्भांतील बालकहि नाश पावतें. ४८ किंवा मस्तक तोडिलें असतां त्याच्या हस्त-पादादि अवयवांच्या क्रिया आपोआपच थांबतात, त्याप्रमाणें काम नाहींसा होतांच क्रोधाची गोष्टच उरत नाहीं. ४९ जेथें काम नाहीं व क्रोध नाहीं तेथें लोभ कोठून येणार ! कारण तळाला जमीन असल्यावांचून नुस्त्या दगडावर वृक्ष वाढत नाहीं. २५० मस्तकावरील केंसांचें साफ मुंडन करून टाकिलें कीं, मग तेथें जशी एकहि ऊं राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें काम-क्रोध नाहींसा झाला कीं, तेथें लोभ रहात नाहीं. ५१ पतीचें मरण जसें स्त्रीचें सौभाग्य घेऊन जातें, त्याप्रमाणें काम-क्रोधाच्या मागोमाग लोभ निघून जातो. ५२ याचेंच नांव निर्लोभपणा. क्रोध व लोभ यांस वाढविणारा खरोखर कामच आहे. ५३ जेव्हां कामना अपुरी राहते, तेव्हां क्रोध खवळतो व जेव्हां कामना पूर्ण होते, तेव्हां लोभाचें सोंग नाचूं लागतें. ५४ दिव्याच्या ज्योतीबरोबर जशी त्याची प्रभा व काजळी असते त्याप्रमाणें क्रोध व लोभ कामनेजवळ सतत असतात. ५५ किंवा अंगावर शहारे

शारियाचें शीत। घामज्वरासमवेत। तेवीं क्रोधलाभयुक्त। जाण निश्चित कामचि ॥ ५६ ॥ जेथ कामाचा नाहीं पांगू। तोचि क्रोधलोभांचा त्यागू। हा समूळ उपावो चांगू। स्वयें श्रीरंगू बोलिला ॥ ५७ ॥ एवं कामत्यागें सर्वथा। त्यागू पावे क्रोधलोभता। भूतांसी जे प्रियत्वें हितता। ऐक तत्त्वतां सांगेन ॥५८॥ जैशी शक्ति आपणासी। तैसें प्रिय करावें भूतांसी। अगत्य विंचबू ज्याचा ज्यासी। तें तें त्यासी अर्पावें ॥ ५९ ॥ अन्न वस्त्र दान मान। पोटींच्या कळवळ्यानें जाण। करावें भूतीं प्रियाचरण। हा स्वधर्म जाण सर्वांचा ॥ २६० ॥ ऐसें प्रिय करावें भूतां। जें परिपाकीं ये त्याच्या हिता। जेणें प्रियत्वा उपजे बाधकता। तें सर्वथा न करावें ॥ ६१ ॥ भूतप्रिय हितकारी। ऐसा जो पुरुष संसारीं। मी भगवंत त्याच्या घरीं। सर्व हित करीं सर्वदा ॥ ६२ ॥ त्याच्या अशुभाची होळी। भूतहितप्रियमेळीं। मी स्वयें करीं वनमाळी। तेचि काळीं तत्त्वतां ॥६३॥ जो सद्भावें सत्य साचार। भूतांसी हितत्वें प्रियकर। त्यासी मी भूतात्मा श्रीधर। करीं संसार सुखरूप ॥ ६४ ॥ अहिंसादि सप्तलक्षण। हा सर्वांचा स्वधर्म जाण। सर्वाश्रम सर्व वर्ण। त्यांसी मुख्यत्वें जाण हा धर्म ॥६५॥ चतुर्वर्णस्वभावप्रकृती। वर्णबाह्यांची लक्षणस्थिती। सर्व वर्णांची स्वधर्मगती। ते म्यां तुजप्रती सांगीतली ॥ ६६ ॥ यावरी आश्रमस्वधर्मता। तुज मी सांगेन आतां। उद्धवा ऐक गा तत्त्वतां। प्रथमतां ब्रह्मचर्य ॥ ६७ ॥ ब्रह्मचर्य द्विविध जाण। एकाचें नैष्ठिक्य संपूर्ण। एक तो उपकुर्वाण। ऐक लक्षण दोहींचें ॥ ६८ ॥ व्रतबंध वेदाध्ययन जाहल्यापाठीं। जो परमार्थीं ठेवूनि दृष्टी। गृहस्थाश्रमाची न करी गोठी। नैष्ठिक्यपरिपाटी त्या नांव ॥ ६९ ॥ वेदशास्त्रसंपूर्ण पठन। गुरुदक्षिणा व्रतविसर्जन। करून करी पाणिग्रहण। उपकुर्वाण या नांव ॥ २७० ॥

येऊन हींव येतांच त्याबरोबर ज्वर व घाम जसा येतो, त्याप्रमाणें कामना क्रोध-लोभांनीं युक्त असते. ५६ जेथें कामना नसते, तेथें क्रोध-लोभ यांचा सहजच त्याग होतो. हा उत्तम उपाय श्रीकृष्णानें स्वतः सांगितला. ५७ याप्रमाणें कामना टाकितांच क्रोध-लोभ आपोआप नाहींसे होतात. आतां प्राणिमात्रांना प्रिय होऊन त्यांचें हित कसें साधावें, तें सांगतों ऐक. ५८ आपली जशी शक्ति असेल त्याप्रमाणें प्राणिमात्रांचें हित करीत असावें. ज्याला ज्याची गरज असेल, त्याला ती वस्तु अर्पण करावी. ५९ गरजू प्राण्यांना अन्न, वस्त्र, दान, मान देऊन त्यांना प्रिय वाटेल असें त्यांच्याशीं आचरण ठेवावें. हा सर्व लोकांचा सामान्य धर्म आहे. २६० ज्यायोगें परिणामीं हित होईल, असेंच प्रिय करावें. ज्यामुळें त्यांच्या प्रेमांत बाध येईल अशी गोष्ट करूं नये. ६१ कारण प्राणिमात्रांचें प्रिय व हित करणाऱ्या संसारी पुरुषाच्या घरीं मी भगवान् सतत रहातों व त्याचें सतत हित करितों. ६२ तो भूतांचें प्रिय व हित करणारा असल्यामुळें त्याच्यावर कांहीं अशुभ येतांच मी तत्काल त्या अशुभाची होळी करितों. ६३ जो सद्भावानें वागणारा, सत्यवक्ता, प्राण्यांचा हितकर्ता असतो त्याचा संसार मी सर्व भूतांचा आत्मा श्रीहरी सुखाचा करितों. ६४ वर सांगितलेलीं अहिंसादि सात लक्षणें हा सर्वांचा स्वधर्म आहे. चारी आश्रमांस व चारी वर्णांस हा धर्म लागू आहे, ६५ चतुर्वर्णांचा स्वभावधर्म, वर्णाश्रमबाह्य जे इतर वर्ण त्यांचा स्वभाव व सर्व वर्णांच्या स्वधर्मांचें लक्षण मीं तुला सांगितलें. ६६ उद्धवा ! मी आतां तुला आश्रमाचे धर्म सविस्तर सांगतों, तें ऐक. पहिला आश्रम ब्रह्मचर्य. ६७ तें दोन प्रकारचें आहे. एक नैष्ठिक व दुसरें उपकुर्वाण ब्रह्मचर्य, त्या दोहोंचें लक्षण ऐक. ६८ मौजीबंधन झाल्यावर वेदाध्ययन संपलें कीं, जो परमार्थाकडे लक्ष लावितो व गृहस्थाश्रमाचें नांवहि घेत नाहीं त्याला नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणतात. ६९ वेदाध्ययन संपल्यावर गुरुदक्षिणा देऊन जो ब्रह्मचर्यव्रताची समाप्ति करितो व विवाह करून गृहस्थाश्रम स्वीकारितो त्याला उपकुर्वाण म्हणतात. २७०.

द्वितीयं प्राप्यानुपूर्व्याज्जन्मोपनयनं द्विजः । वसन्गुरुकुले दान्तो ब्रह्माऽधीयीत चाहूतः ॥ २२ ॥
मेखलाऽजिनदण्डाक्षब्रह्मसूत्रकमण्डलून् । जटिलोऽधौतदद्वासोऽरक्तपीठः कुशान् दधत् ॥ २३ ॥
स्नानभोजनहोमेषु जपोच्चारे च वाग्यतः । न च्छिंद्यान्नखरोमाणि कक्षोपस्थगतान्यपि ॥ २४ ॥

गर्भाधान पुंसवन । जातकर्म अन्नप्राशन । हीं समस्त कर्मे पूर्वीं जाण । केलीं संपूर्ण चौलांत ॥ ७१ ॥ याउपरी उपनयन । गुरुद्वारा गायत्रीग्रहण । सावित्रजन्म हें संपूर्ण । व्रतबंध जाण या नांव ॥ ७२ ॥ एवं गायत्रीमंत्रें जाण । द्विजन्मे होती तीनी वर्ण । हा ब्रह्मचर्याश्रम संपूर्ण । व्रतधारण वेदार्थ ॥ ७३ ॥ तेथ वेदाध्ययन निर्धारीं । गुरुगृहीं वसे ब्रह्मचारी । त्याच्या व्रतनेमाची कुसरी । ऐक ते परी सांगेन ॥ ७४ ॥ मुंजी जानवें कृष्णाजिन । पळसाचा दंडग्रहण । कमंडलु वागवावा जाण । जळाचरण करावया ॥ ७५ ॥ न करावें मस्तकवपन । न करावें तैलाभ्यंगस्नान । न करावें दंतधावन । केशविंचरण न करावें ॥ ७६ ॥ न करावें नखनिकृंतन । न करावें रोमच्छेदन । बाहुमूलादिक जे जाण । गुह्य स्थान अतिव्याप्त ॥ ७७ ॥ रजकक्षाळित वस्त्रें जाण । त्यांचें न करावें परिधान । प्रवाहीं करावें स्नान । प्रातर्मध्यान्ह दोहीं काळीं ॥ ७८ ॥ आसनीं श्वेत पीठासन । श्वेत वस्त्रांचें धारण । रुद्राक्ष अथवा पद्माक्ष जाण । मालाग्रहण जपार्थ ॥ ७९ ॥ कुशादि दर्भ पवित्र । तिंहीं युक्त असावे

—आतां अगोदर आश्रमांपैकीं ब्रह्मचाऱ्याचे धर्म सांगतात. ब्रह्मचारी दोन प्रकारचा आहे. एक उपकुर्वाणक व दुसरा नैष्ठिक. जो अध्ययनानंतर समावर्तन करून गृहस्थाश्रमी होतो, तो उपकुर्वाण व जो मरेपर्यंत गुरुगृहीं राहातो तो नैष्ठिक, त्यांतील उपकुर्वाणाचे धर्म पुढील नऊ श्लोकांनीं सांगतात—

द्विजः आनुपूर्व्यात् द्वितीयं उपनयनं जन्म प्राप्य—ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांतील बालकांनीं गर्भाधानादि संस्कारद्वारां उपनयनाख्य दुसऱ्या जन्माला प्राप्त होऊन, गुरुकुले दान्तः वसन् (आचार्येण आहूतः) ब्रह्म आहूतः अधीयीत च—गुरुकुलामध्यें बाह्य इंद्रियांचें दमन करून वास करावा व आचार्यानें अध्ययनासाठीं बोलाविलें असतां त्याच्या-जवळ जाऊन वेदाचें अध्ययन व अर्थाचा विचार करावा. २२. मेखला०...कमण्डलून्—त्या त्या वर्णाला उचित असलेली मेखला, अजिन, दंड, जपमाला, यज्ञोपवीत, कमंडलु, यांस धारण करणारा, जटिलः—अभ्यंगादि न केल्यामुळें ज्याच्या केसांच्या जटा झाल्या आहेत, अधौतदद्वासः अऽरक्तपीठः—ज्यानें आपले दांत व वस्त्र हीं गृहस्थाप्रमाणें धुतलेलीं नाहींत व ज्याचें आसन रंगविलेलें नाहीं असा, कुशान् दधत्—पवित्रादि निमित्तानें दर्भाचें धारण करणारा. २३. स्नान-भोजन-होमेषु जपोच्चारे च वाग्यतः—स्नान, भोजन व होम या प्रसंगीं, जप करतांना व मलत्याग प्रसंगीं मौन धारण करणारा असा होत्साता. कक्षोपस्थगतानि अपि नखरोमाणि न च्छिंद्यात्—खांका, इतर गुह्य भाग यांवरील लोम व नखें याचा छेद करूं नये. २४.

गर्भाधान, पुंसवन, जातकर्म, अन्नप्राशन यांपासून चूडाकर्मापर्यंत सर्व धार्मिक संस्कार पूर्वीं झालेले असून ७१ नंतर उपनयन, गुरुमुखानें गायत्रीमंत्राचें ग्रहण, गायत्रीच्या उपदेशानें दुसरा जन्म (म्ह० ब्रह्मचर्याश्रमाचें ग्रहण) या सर्व विधीला व्रतबंध म्हणतात. ७२ याप्रमाणें या गायत्रीमंत्रानें ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य हे तीन वर्ण द्विज होतात. ७३ वेदाध्ययनासाठीं व्रत धारण करणें या स्वरूपाचा हा ब्रह्मचर्याश्रम आहे व त्या आश्रमांतील व्रत व नियम यांचे प्रकार सांगतों, ऐक. ७४ ब्रह्मचाऱ्यानें कमरेला मोळांचा कडदोरा, गळ्यांत जानवें, हरिणाचें कातडें, पळसाच्या झाडाचा दंड व पाणी पिण्यासाठीं कमंडलु इतक्या वस्तु जवळ बाळगाव्या. ७५ त्यानें मस्तकावरील केशांचें वपन करूं नये, तेल-उटणें लावून मंगल स्नान करूं नये, दंतमंजन लावून दांत घासूं नयेत व सुवासिक तेल लावून केंस विंचरूं नयेत. ७६ नखें काढूं नयेत व शरीराच्या कोणत्याहि भागावरील केंस काढूं नयेत. ७७ परिटानें धुतलेलें वस्त्र नेसूं नये. पहाटे व मध्यान्हीं या दोन्हीं काळीं नदीच्या प्रवाहांत स्नान करावें. ७८ शुभ्र आसनावर बसावें. पांढरें वस्त्र धारण करावें, रुद्राक्षाची किंवा कमलांतील बीजाची माळा जपासाठीं जवळ ठेवावी. ७९ कुशादि दर्भपवित्रक नेहमीं हातांत ठेवावें. आतां त्याच्या मौनाचा विचार

कर । ऐक मौनाचा विचार । तुज मी साचार सांगेन ।। २८० ।। मळमूत्र करितां स्नान । जप होम आणि भोजन । उभय संध्याकाळीं जाण । निश्चित मौन धरावें ।। ८१ ।। नाहीं अभ्यंग केशविंचरण । तेणें जटा वळल्या आपण । हें ब्रह्मचारियासी जाण । व्रतधारण नेमस्त ।। ८२ ।। इतुकेनि व्रतेंसीं जाण । सदा गुरुसेवेसी सावधान । गुरु कृपेनें सांगे अध्ययन । तेव्हां वेदपठन करावें ।। ८३ ।। मज पढों सांगावें आतां । हा आग्रह न धरावा गुरुनाथा । त्याची आज्ञा वंदूनि माथां । निष्कपटतां गुरुसेवा ।। ८४ ।। अध्ययन सांगेना लवलाह्या । तरी सांडूनि कुलाचार्या । पढों गेलिया आणिका ठाया । गुरु त्यागिलिया महादोष ।। ८५ ।। सेवा करावी अहर्निशीं । जेणें कृपा उपजे स्वामीसी । तैं कृपेस्तव अध्ययनासीं । अहर्निशीं सांगेल ।। ८६ ।। ठेवूनि गुरुचरणीं भावार्था । पढावें गा वेदशास्त्रार्था । आकळावें वेदार्था । परमार्थतां निजबुद्धी ।। ८७ ।।

रेतो नावकिरेज्जातु ब्रह्मव्रतधरः स्वयम् । अवकीर्णेऽवगाह्याप्सु यतासुस्त्रिपदीं जपेत् ।। २५ ।।

या रीतीं ब्रह्मचारी देख । वीर्यत्याग बुद्धिपूर्वक । करूं नये आवश्यक । व्रतविशेष ब्रह्मचर्य ।। ८८ ।। स्वप्नीं जाहल्या वीर्यपतन । शास्त्रोक्तविधी करावें स्नान । मग प्रायश्चित्तार्थ जाण । गायत्री-स्मरण करावें ।। ८९ ।। ब्रह्मचारी वानप्रस्थ संन्यासी । प्रयत्नें वीर्य त्यागू नाहीं त्यांसी । जो करी तो अतिदोषी । आश्रमधर्मासी बुडविलें ।। २९० ।। स्वप्नीं जाहलिया वीर्यपतन । करावें मृत्तिका सचैल स्नान । मग प्रायश्चित्तार्थ जाण । विहिताचरण जप कीजे ।। ९१ ।।

अग्न्यर्काचार्यगोविप्रगुरुवृद्धसुरान् शुचिः । समाहित उपासीत सन्ध्ये च यतवाग्जपन् ।। २६ ।।

सांगतों, तो ऐक. २८० मलोत्सर्ग, स्नान, जप, होम व भोजन, या प्रसंगीं आणि सकाळीं व संध्याकाळीं, दोन्हीं संध्या करीत असतांना मौन धारण करावें. ८१ तेल लावून अभ्यंगस्नान न केल्यामुळें व केंस न विंचरल्यामुळें त्याच्या आपोआपच जटा बनतात. हें ब्रह्मचाऱ्याचें नेमलेलें व्रत आहे. ८२ या व्रतांनीं युक्त होऊन त्यानें निरंतर गुरुसेवेला तत्पर असावें. गुरु कृपा करून जेव्हां पाठ सांगतील तेव्हां वेदपठण करावें. ८३ 'मला आतांच पाठ सांगा' असा आग्रह धरूं नये. त्यांची आज्ञा मान्य करून निष्कपटपणानें गुरुसेवा करावी. ८४ गुरु लवकर अभ्यासक्रम संपवीत नाहींत, म्हणून आपल्या आश्रमांतील आचार्यास सोडून दुसऱ्या गुरुपाशीं अध्ययन करावयास जावूं नये. गुरूला सोडण्यांत महादोष आहे. ८५ गुरूच्या मनांत कृपा उत्पन्न होईल अशा प्रकारें त्यांची रात्रंदिवस सेवा करावी. म्हणजे त्या कृपेमुळें ते पाठ सांगतील. ८६ भक्तिभावानें गुरुचरणांवर मस्तक ठेवून वेद-शास्त्राचा अभ्यास करावा व आपल्या बुद्धिसामर्थ्यानें पाठ केलेल्या वेदाचा अर्थ समजून घ्यावा. २८७.

ब्रह्मव्रतधरः स्वयं जातु रेतः न अवकिरेत्–ब्रह्मव्रत धारण करणाऱ्या बटूनें बुद्धिपूर्वक केव्हांहि वीर्याचा भ्रंश करूं नये. स्वयं अवकीर्णे अप्सु अवगाह्य यतासुः त्रिपदीं जपेत्–आणि कांहीं कारणानें आपोआप वीर्यभ्रंश झाल्यास जला-मध्यें प्रवेश करून म्ह० स्नान करून प्राणायामपूर्वक गायत्रीचा जप करावा. २५.

ब्रह्मचाऱ्यानें अशा रीतीनें रहावें. त्यानें बुद्धिपूर्वक व्रतभंग करूं नये. कारण व्रतभंग होऊं न देणें हा ब्रह्मचर्य व्रतांतील विशेष आहे. ८८ स्वप्नावस्था झाल्यास त्यानें शास्त्रोक्त विधीनें स्नान करावें व प्रायश्चित्तासाठीं गायत्रीचा जप करावा. ८९ ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी यांनीं मुख्य ब्रह्मचर्य अवश्य पाळावें. जो तें पाळीत नाहीं त्याला आश्रमधर्म बुडविल्याचा फार मोठा दोष लागतो. २९० त्यांस स्वप्नावस्था झाली तर त्यांनीं अंगाला मृत्तिका लावून सचैल स्नान करावें. त्यानंतर प्रायश्चित्तासाठीं जप करणें विहित आहे. २९१.

शुचिः समाहितः अग्नि–अर्क–आचार्य–गो–विप्र–गुरु–वृद्ध–सुरान् उपासीत–पवित्र व शांत चित्त होऊन अग्नि, सूर्य, आचार्य, गाय, ब्राह्मण, गुरु, वृद्ध, व देव यांची उपासना करावी. सन्ध्ये च यतवाक् जपन्–(उपासीत) प्रातःसंध्या व सायंसंध्या या दोन संध्यांची, वाणीचें नियमन करून, जप करीत उपासना करावी. (मध्यान्ह संध्येच्या वेळीं मौनाचें विधान नाहीं, म्हणून येथें संध्ये असें द्विवचन योजिलें आहे.) २६.

गायत्रीदात्या आचार्यपण । माता पिता तें गुरुस्थान । अग्निसूर्यादि सुरगण । गोब्राह्मण अतिज्येष्ठ ॥ ९२ ॥ त्यांचें करावया उपासन । बाह्य शुचि अंतरीं समाधान । गुरुचरणीं अनन्य शरण । आज्ञापालन पितरांचें ॥ ९३ ॥ अग्नीचे ठायीं हवन । इंद्रादि देवांचें स्तवन । ब्राह्मण तें पूज्यस्थान । अर्घ्यदान सूर्यास ॥ ९४ ॥ ज्येष्ठांसी साष्टांग नमन । गायीसी अंगकुरवाळण । सायंप्रातःसंध्येसी मौन । मध्यान्हीं जाण मौन नाहीं ॥ ९५ ॥ सद्‌गुरूचा समर्थवादू । सर्वां वरिष्ठ सर्व वंद्यू । ज्याचा प्रताप प्रसिद्धू । स्वयें गोविंदू सांगत ॥ ९६ ॥

आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत कर्हिचित् । न मर्त्यबुद्ध्याऽसूयेत सर्वदेवमयो गुरुः ॥ २७ ॥

जो अंतर्यामीं ईश्वरू । जो विश्वात्मा विश्वंभरू । जो अनंत अपरंपारू । तो मी सद्‌गुरु शिष्यासी ॥ ९७ ॥ गुरुनामाची जे मातू । तो मी साचार भगवंतू । देखोनि भजनभावार्थू । पुरवी मनोरथू शिष्याचा ॥ ९८ ॥ ज्या सद्‌गुरूच्या अंगुष्ठीं । ब्रह्मादि देवांचिया कोटी । ज्याच्या नांवाची गोठी । वंद्य वैकुंठीं कैलासीं ॥ ९८ ॥ ज्याचें नांव ऐकतां कानीं । यम काळ कांपती दोनी । ब्रह्मा विष्णु रुद्र तिन्ही । हात जोडूनी तिष्ठती ॥ ३०० ॥ सकळ वेदांचें निजसार । तें सद्‌गुरुस्वरूप साचार । ऐसा शिष्यासी निर्धार । निरंतर असावा ॥ १ ॥ त्यासी मनुष्यबुद्धीं आपण । कदा न करावें हेळण । गुरुनिंदा बोलतां जाण । आली नागवण सर्वार्थीं ॥ २ ॥ सद्‌गुरुनिंदेचा एकांतू । करूं आला परम आप्तू । तो त्यागावा जेवीं पतितू । हा नव्हे अर्थू तैं पळावें ॥ ३ ॥ सद्‌गुरुनिंदेची वाणी । ऐकतां बोटें द्यावीं कानीं । सद्‌गुरूसी भावें स्मरोनी । तें स्थानही त्यजोनी पळावें ॥ ४ ॥ त्या सद्‌गुरुनिंदेची स्वयें मातू । करितां

गायत्री मंत्राचा उपदेश करणारा जो गुरु तो आचार्य; माता व पिता हे गुरु; अग्नि, सूर्य इत्यादि देवता व गो-ब्राह्मण हे अति पूज्य आहेत. ९२ या सर्वांची उपासना करण्यासाठीं अंतर्बाह्य शुद्धि व समाधान असावें. गुरुचरणांना अनन्य शरण जाऊन पितरांच्या आज्ञेचें पालन करावें. अग्नींत हवन करावें. इंद्रादि देवांची स्तुति करावी. ब्राह्मणांची पूजा करावी व सूर्याला अर्घ्यदान द्यावें. ९४ वडिलांस साष्टांग नमस्कार घालावा. गायीच्या अंगावरून हात फिरवावा. सकाळीं व संध्याकाळीं मौन धरून संध्या करावी. दुपारच्या संध्येला मौन नाहीं. ९५ सद्‌गुरु हा समर्थ उपदेशक आहे. त्यामुळें तो सर्वांहून वरिष्ठ व सर्ववंद्य आहे. स्वतः श्रीकृष्ण त्याचा प्रभाव सांगत आहे. २९६.

आचार्यं मां विजानीयात्–आपला आचार्य मी परमेश्वरच आहें, असें जाणावें. कर्हिचित् न अवमन्येत–त्याचा कधींहि अवमान करूं नये. मर्त्यबुद्ध्या न असूयेत–तो सामान्य मनुष्य आहे, असें समजून त्याची असूया म्ह० गुणांमध्यें दोषदृष्टि करूं नये. गुरुः सर्वदेवमयः–कारण गुरु सर्वदेवमय आहे. २७.

जो सर्वान्तर्यामी ईश्वर, सर्व विश्वांत भरून राहिलेला परमात्मा, अनंत, अपार तो मीच शिष्याचा सद्‌गुरु आहें. ९७ गुरुनामाचा जेवढा प्रभाव आहे, तो सर्व मी भगवंतच आहें. त्याची भक्ति पाहून मी त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करितों. ९८ ज्या सद्‌गुरूच्या अंगठ्यावर कोट्यवधि देव रहातात त्याच्या नांवाची कथा कैलास व वैकुंठांतहि वंद्य असते. ९९ ज्याचें नांव ऐकतांच यम व काळ दोघेहि चळचळां कांपतात व ज्याच्या पुढें ब्रह्मा-विष्णु-महेश हात जोडून उभे असतात, ३०० त्या गुरूचें सगळ्या वेदांचें जें सार तेंच खरें स्वरूप आहे, असाच शिष्याचा निरंतर भाव असावा. १ गुरूला सामान्य बुद्धीचा मनुष्य समजून त्यावर दोषारोप करूं नयेत व त्याचा अनादर करूं नये. गुरूची निंदा केली असतां तत्काळ आपला नाश होतो. २ एखादा कोणी परम आप्त गुरु-निंदेच्या गोष्टी करावयास जर आला, तर भ्रष्ट माणसाप्रमाणें त्याला दूर करावें व तें जर शक्य नसेल तर आपण तेथून पळ काढावा. ३ सद्‌गुरूच्या निंदेचे शब्द कानीं पडतांच दोन्ही कान झांकावे. श्रद्धेनें सद्‌गुरूचें स्मरण करून तें स्थळ सोडून पळावें. ४ सद्‌गुरूची निंदा जर आपणच आरंभिली, तर आपण सर्वस्वाला नागवलों,

बुडाला निजस्वार्थू । धुळीस मिळाला परमार्थू । आला अपघातू अंगासी ।। ५ ।। ऐशिया गुरूच्या ठायीं जाण । पत्र पुष्प अन्न धन । शिष्यें करूं नये वंचन । तें स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ६ ।।

सायं प्रातरुपानीय भैक्ष्यं तस्मै निवेदयेत् । यच्चान्यदप्यनुज्ञातमुपयुञ्जीत संयतः ।। २८ ।।

अन्नधनपुष्पीं फळीं । सायंप्रातर्मध्यान्हकाळीं । भिक्षा मिळे ते गुरूजवळी । अर्पूनि कृतांजळीं रहावें ।। ७ ।। तेथ गुरुआज्ञा जाहल्याही जाण । उदरापुरतें घ्यावें अन्न । अन्नावेगळा पदार्थ भरण । घेवों नये जाण ब्रह्मचाऱ्या ।। ८ ।। सायं प्रातःकाळीं जाण । ब्रह्मचाऱ्या विहित भोजन । गुरुआज्ञा जें दीधलें अन्न । तेणें प्राणतर्पण करावें ।। ९ ।। तेथ न म्हणावें धडगोड । न करावें रसनाकोड । न वाढवावा विषय वाड । देहनिर्वाहें चाड शिष्यासी ।। ३१० ।। भोजनीं कांहीं न मागावें जाण । यालागीं दृढ धरावें मौन । अधिक खादलिया अन्न । तें प्रतिबंधन गुरुसेवे ।। ११ ।। आहारीं अधिक घेतलिया अन्न । निद्रा आलस्य दाटी गहन । अत्यंत अल्प जें भोजन । तेणें विकळपण देहाचें ।। १२ ।। गुरुसेवेलागीं जाण । शरीर राखावें सावधान । यालागीं शिष्यासी भोजन । युक्ताहारपण सर्वदा ।। १३ ।। गुरुसेवेलागीं जाण । शरीर राखावें सावधन । तें गुरुसेवेचें लक्षण । स्वयें जनार्दन सांगत ।। १४ ।।

शुश्रूषमाण आचार्यं सदोपासीत नीचवत् । यानशय्यासनस्थानैर्नातिदूरे कृताञ्जलिः ।। २९ ।।

परमार्थ धुळीस मिळाला व अंगावर अपघात कोसळला असें समजावें. ५ अशा गुरूला पानें, फुलें, अन्न, धन यांत शिष्यानें केव्हांहि फसवूं नये. तेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ३०६.

सायं प्रातः भैक्ष्यं उपानीय तस्मै निवेदयेत्—सकाळीं व सायंकाळीं भिक्षा आणून तीं गुरूला अर्पण करावी. यत् च अन्यत् अपि—आणि जें दुसरेंहि कांहीं मिळालें असेल तें गुरूला निवेदन करावें. अनुज्ञातं संयतः उपयुञ्जीत—त्यानें तें भिक्षान्न खाण्याची आज्ञा दिली असतां चांगल्या प्रकारें नियमित होऊन तें अन्न खावें. २८.

शिष्यानें सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं अन्न-धन-पुष्प-फल वगैरे जी कांहीं भिक्षा मिळेल ती गुरूपाशीं आणून द्यावी व हात जोडून उभे रहावें. ७ व गुरूनें आज्ञा दिल्यावरहि केवळ पोटापुरतें अन्न तेवढें घ्यावें. अन्नावांचून दुसरा कसलाहि खाण्याचा पदार्थ ब्रह्मचाऱ्यानें घेऊं नये. ८ सकाळीं व संध्याकाळीं ब्रह्मचाऱ्यानें भोजन करावें. गुरूच्या आज्ञेनें जेवढें अन्न मिळेल तेवढ्यावरच त्यानें आपली भूक शांत करावी. ९ त्यास बरें-वाईट म्हणूं नयें. जिभेचे लाड पुरवूं नयेत. विषयांची आवड वाढवूं नये. शिष्यानें केवळ शरीर-रक्षणापुरतें अन्न भक्षण करावें. ३१० जेवते वेळीं कांहीं मागूं नये. त्यासाठीं मौन धारण करावें. कारण जास्त अन्न खाल्ल्यास गुरुसेवेंत अडथळा येतो. ११ अधिक अन्न खाल्लें असतां त्याला झोंप घेरते किंवा आळस येतो. अगदीं अल्प भोजन केलें तर शरीराला दुर्बलता येते. १२ गुरुसेवेसाठीं शरीर तयार असावें, म्हणून शिष्यानें नेहमीं युक्त आहार करावा. १३ गुरुसेवेसाठीं शरीर चांगलें सुदृढ ठेवावें. हें गुरुसेवेचें लक्षण श्रीकृष्णानें सांगितलें. ३१४.

आचार्यं शुश्रूषमाणः यान शय्या-आसन स्थानैः नातिदूरे कृताञ्जलिः सदा नीचवत् उपासीत—आचार्यांची शुश्रूषा करणाऱ्या ब्रह्मचाऱ्यानें यान, शय्या, आसन व स्थान यांच्या योगानें म्ह॰ आचार्य कोठें जाऊं लागला असतां त्याच्या मागोमाग गमन करून, तो निजला असतां त्याच्याजवळच आपलें अंथरुण घालून, सावधपणानें शयन करून, आचार्य श्रांत झाले असतां त्याचें पाय दाबणें इत्यादि उपायानें श्रमनिवृत्ति करून व तो बसला असतां त्याच्या जवळच हात जोडून तो कांहीं आज्ञा करील म्हणून वाट पहात उभें राहून सर्वदा नीचाप्रमाणें त्याची सेवा करावी. २९.

सर्वदा अतिसादर । न पडतांही अंतर । गुरुसेवेसी निरंतर । अतितत्पर उल्हासें ॥ १५ ॥ गुरु यानारूढ असतां । पुढें चालावें साटोपतां । पाठीसी यावें चरणीं चालतां । उपचारता समवेत ॥ १६ ॥ समयोचित जाणोन । द्यावें तांबूल जीवन । करावें चरणसंवाहन । घालावें आसन बैसती तेथें ॥ १७ ॥ सद्गुरु बैसल्या आसनीं । शिष्यें न बैसावें नेहटूनी । दूरी नवजावें तेथूनी । नयनोन्मीलनीं रहावें ॥ १८ ॥ अंजळिसंपुट जोडूनी । सन्मुख रहावें सावधानीं । गुरूची संज्ञा ज्यालागूनी । तें अविलंबनी करावें ॥ १९ ॥ गुरु शेजेवरी निजले असतां । जवळी नसावें सर्वथा । जेथूनि ऐकूं ये वचनार्था । तेथें निशीं अवस्था क्रमावी ॥ ३२० ॥ मी एक सेवेनें संपन्न । ऐसा धरिलिया अभिमान । केलें सेवेसी आंचवण । सर्वेचि जाण होईल ॥ २१ ॥ सेवकांमाजीं मी एक । केवळ रंकाचाही रंक । ऐसा भावो निष्टंक । सेवेसी देख करावा ॥ २२ ॥ तैसेंचि नीच काम करितां । लाज न धरावी सर्वथा । उबग न मानूनी चित्ता । उल्हासता गुरुभजनीं ॥ २३ ॥

एवंवृत्तो गुरुकुले वसेद्भोगविवर्जितः । विद्या समाप्यते यावद्बिभ्रद्व्रतमखण्डितम् ॥ ३० ॥

सांडोनि सकळ भोगांतें । गुरुकुळीं राहोनि तेथें । गुरुसेवेचि व्रतें । प्रिय सर्वांतें तो जाहला ॥ २४ ॥ एवं गुरुसेवायुक्त । धरोनियां अखंड व्रत । पावला वेदशास्त्र समस्त । पठणें समाप्त पैं जाहलें ॥ २५ ॥ एवं विद्या जाहालिया समाप्त । उपकुर्वाण नैष्ठिक व्रत । स्वयें सांगावयास अनंत । पुढील श्लोकार्थ सांगतू ॥ २६ ॥

शिष्यानें अत्यंत आदरानें गुरुसेवेंत यत्किंचित् अंतर पडूं न देतां उल्हासानें निरंतर तत्पर रहावें. १५ गुरु वाहनांत बसले असतां त्यांचें सामान घेऊन शिष्यानें पुढें चालत जावें. गुरु जर पायांनीं जात असले तर त्यांच्या सामानासह मागून चालावें. १६ ज्या कालीं जें योग्य असेल त्याप्रमाणें गुरूंस पाणी, विडा द्यावा. त्यांचे पाय रगडावे. ते जेथें बसतील तेथें आसन पसरून द्यावें. १७ गुरु आसनावर बसले असतां शिष्यानें त्यांना चिकटून त्यांच्या शेजारीं बसूं नये, किंवा तेथून फार लांबहि जाऊं नये. तर नजरेच्या टप्प्यांत रहावें. १८ व हात जोडून त्यांच्या समोर यावें. गुरूंनीं नुसती खूण करितांच तें काम तत्काल करावें. १९ गुरु अंथरुणावर निजले असतां, शिष्यानें जवळ केव्हांहि बसूं नये. त्यांची हांक ऐकूं येईल इतक्या अंतरावर रात्रीं निजावें. ३२० परंतु 'मीच कायतो एक गुरुसेवापरायण आहें ' असा अभिमान धरिला असतां शिष्य केलेल्या सर्व सेवेच्या श्रेयाला मुकतो. २१ अनेक सेवकांपैकीं मीहि एक त्यांच्या दासांचाहि दास आहें, अशी निरभिमानाची वृत्ति ठेवावी. २२ त्याचप्रमाणें गुरूंचें कसलेंहि हलकें काम करण्यांत लाज मानूं नये. मनाला त्रास न येऊं देतां गुरुसेवेविषयीं उत्साह बाळगावा. ३२३.

एवंवृत्तः भोगविवर्जितः अखण्डितं व्रतं बिभ्रत् यावत् विद्या समाप्यते तावत् गुरुकुले वसेत्—ज्याचें वर्तन असें आहे अशा ब्रह्मचाऱ्यानें सर्वभोगरहित होऊन आपलें ब्रह्मचर्यव्रत अखंडित पाळून विद्या समाप्त होईपर्यंत गुरुकुलांत वास करावा. ३०.

अशाप्रकारें सगळे सुखोपभोग सोडून, गुरुगृहीं राहून जो शिष्य गुरुसेवेचें व्रत आचरितो, तो सर्वांना प्रिय होतो. २४ अशी गुरुसेवा करून अखंड ब्रह्मचर्य पाळून समस्त वेदशास्त्राध्यायन पूर्ण झालें म्हणजे त्याचा अभ्यास-क्रम संपला. २५ ही विद्या शिकून झाली कीं, मग उपकुर्वाण किंवा नैष्ठिक व्रत कसें पाळावें तें पुढील श्लोकांत भगवान् सांगत आहे. ३२६.

यद्यसौ छन्दसां लोकमारोक्ष्यन् ब्रह्मविष्टपम् । गुरवे विन्यसेद्देहं स्वाध्यायार्थं बृहद्व्रतः ॥ ३१ ॥

जरी ब्रह्मचारी व्रतस्थ । येणेंचि आश्रमें निश्चित । सत्यलोक वैकुंठपर्यंत । वांछी वेदोक्त मत्प्राती ॥ २७ ॥ तेणें यावज्जन्म आपण । दृढ करावया गुरुभजन । निजदेहाचेंही जाण । करी समर्पण गुरुचरणीं ॥ २८ ॥ सद्गुरुभजनाची परवडी । नित्य नूतन आवडी । निजात्मभावें चोखडी । लागली गोडी गुरुचरणीं ॥ २९ ॥ पूर्वील व्रतें व्रत धरी । तेंचि व्रत दृढ करी । होय नैष्ठिक ब्रह्मचारी । गुरुभजनावरी निर्धारू ॥ ३३० ॥ न मनीं सन्मानाचें कोड । न म्हणे हे विषय गोड । न धरी संसाराची चाड । व्रतीं दृढ व्रतस्थ ॥ ३१ ॥ ऐसा थोर व्रतें व्रतधर । तैसाचि गुरुभजनीं सादर । करी सद्गुरूशीं विचार । वेदांतसार स्वाध्यायें ॥ ३२ ॥ स्व म्हणिजे आत्मा जाण । ते ठायीं नित्य अनुसंधान तो स्वाध्याय म्हणती सज्ञान । ज्ञानविचक्षण निजद्रष्टे ॥ ३३ ॥ ऐशिया साधकासी जाण । सर्वत्र ब्रह्मभावन । हेंचि स्वमुखें मधुसूदन । स्वयें आपण सांगत ॥ ३४ ॥

अग्नौ गुरावात्मनि च सर्वभूतेषु मां परम् । अपृथग्धीरुपासीत ब्रह्मवर्चस्व्यकल्मषः ॥ ३२ ॥

ब्रह्मचर्यव्रत धरणें । ब्रह्मचर्यस्व चढे तेणें । आणि सद्गुरुचेनि भजनें । निष्पाप होणें निजवृत्तीं ॥ ३५ ॥ तेथें अग्नि गुरु आपण । सर्व भूतांच्या ठायीं जाण । अभिन्न ब्रह्मभावन । अनुसंधान सर्वदा ॥ ३६ ॥ तेव्हां जें जें देखे दृश्यजात । तेथें ब्रह्मभावो अचुंबित । यापरी मातें उपासित । ब्रह्मयुक्त

—याप्रमाणें उपकुर्वाणक ब्रह्मचाऱ्यांचे धर्म सांगून नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांचे धर्म पुढील सहा श्लोकांनीं सांगतात—

यदि असौ छन्दसां लोकं ब्रह्मविष्टपं आरोक्ष्यन् (स्यात्)—जर हा ब्रह्मचारी वेदांचा लोक अशा ब्रह्मभुवनामध्यें आरूढ होण्याची इच्छा करीत असेल (अ. १७-५. पृ. ७९७) तर, बृहद्व्रतः सन् स्वाध्यायार्थं गुरवेः देहं विन्यसेत्—नैष्ठिक ब्रह्मचारी होऊन त्यानें अधिक अध्ययनासाठीं किंवा केलेल्या अध्ययनाच्या निष्क्रयासाठीं गुरूला अर्पण स्वदेह करावा. ३१.

जर व्रतस्थ ब्रह्मचारी ' याच आश्रमानें मी वेदोक्त सत्यलोक म्ह० वैकुंठापर्यंत ईश्वरप्राप्ति निश्चयानें करून घेईन ' अशी इच्छा करीत असेल तर, २७ त्यानें जन्मभर गुरुसेवा करण्यासाठीं स्वतःचा देह गुरुचरणीं अर्पण करावा. २८ जो नित्य नव्या आवडीनें गुरूचें भजन करितो, त्याला गुरूच्या ठिकाणीं आत्मभावना ठेविली असतां गुरुचरणाची गोडी लागते. २९ जो पूर्वीं धरलेलें ब्रह्मचर्य व्रतच पुढें चालवितो व जन्मभर गुरुभजनावर निष्ठा ठेवून तेंच व्रत दृढ करितो, त्याला नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणतात. ३३० त्याच्या मनाला मानसन्मानाची आवड नसते. तो विषयांत गोडी मानीत नाहीं. संसाराची इच्छा करीत नाहीं. व्रतस्थ राहून आपलें व्रत दृढ करितो. ३१ या थोर व्रतानें तो व्रतधारी होतो. तसाच तो गुरुभक्तींत तत्पर रहातो. तो सद्गुरूबरोबर स्वाध्यायपूर्वक वेदान्तरहस्याचीच चर्चा करितो. ३२ ' स्व ' म्हणजे आत्मा, त्या आत्म्याचें जें नित्य चिंतन त्याला आत्मज्ञानी विद्वान् ' स्वाध्याय ' असें म्हणतात. ३३ अशा साधकाला सर्व ठिकाणीं आत्मभावच दिसत असतो. हेंच आतां मधुसूदन स्वतः सांगत आहे. ३३४.

ब्रह्मवर्चस्वी अकल्मषः अपृथग्धीः अग्नौ गुरौ आत्मनि सर्वभूतेषु च मां परं उपासीत—वेदाभ्यासजन्य तेजानें युक्त असलेला निष्पाप व द्वैतबुद्धिरहित अशा त्यानें अग्नि, गुरु, आत्मा व सर्व भूतें यांमध्यें मज परमात्म्याची उपासना करावी. ३२.

असें ब्रह्मचर्य व्रत आचरिल्यानें शिष्याच्या अंगीं ब्रह्मतेज उत्पन्न होतें. सद्गुरूच्या सेवेनें त्याची वृत्ति निष्पाप होते. ३५ तो अग्नि, गुरु व सर्व प्राणिमात्र आपणच आहेंत, अशी निरंतर आत्मभावना ठेवितो. ३६ जेवढा पदार्थ त्याच्या दृष्टीस पडतो तेवढा सगळा तो पूर्ण ब्रह्ममयच आहे, असें पहातो. अशाप्रकारें जो ब्रह्मरूप

सद्भावें ॥ ३७ ॥ नैष्ठिक ब्रह्मचर्याचा नेम । वानप्रस्थसंन्याशांसम । तेथील जो धर्म । मुख्य धर्म त्यागाचें ॥ ३८ ॥

स्त्रीणां निरीक्षणस्पर्शसंलापक्ष्वेलनादिकम् । प्राणिनो मिथुनीभूतानगृहस्थोऽग्रतस्त्यजेत ॥ ३३ ॥

नैष्ठिक ब्रह्मचारी संन्यासी । वानप्रस्थ वनवासी । तिहीं न पहावें स्त्रियांसी । हा मुख्यत्वें त्यांसी स्वधर्म ॥ ३९ ॥ स्त्री देखतांचि दिठीं । सांडूनियां पर्णकुटी । पळावें गा उठाउठी । मा कराव्या गोठी घडे केवीं ॥ ३४० ॥ स्वप्नींही स्त्रियेच्या स्पर्शासी । करूं नये या तिघांशीं । करितां मदनू त्यांसी । वीर्यपातासी उपजवी ॥ ४१ ॥ त्या स्त्रियांसी क्रीडाविनोद । करितां विध्वंसे धर्मकंद । यालागीं स्त्रीगुणानुवाद । न करिती शुद्ध सज्ञान ॥ ४२ ॥ स्त्रियांचें हावभावदर्शन । एकांत गुह्य संभाषण । नाना विनोद अंगस्पर्शन । परिहासन मदनोक्ती ॥ ४३ ॥ इतुकें जेथ घडे । तेथ कामाचा घाला पडे । स्वधर्म समूळ बुडे । धैर्याचें उडे निजसत्व ॥ ४४ ॥ गृहस्थाचिये प्रवृत्ती । परस्त्रीयेसी ऐसी गती । जाहलिया जाण निश्चितीं । अपावो अंतीं पावेल ॥ ४५ ॥ स्त्री ते अग्निकुंडासमान । पुरुष तो घृतकुंभ जाण । तेथ द्रवतां अंतःकरण । अर्ध क्षण लागेना ॥ ४६ ॥ घृत वेंचलियापाठीं । घटासी जाहल्या वर्षें साठी । तरी अग्नीशीं जाहल्या भेटी । द्रवता पोटीं तोही धरी ॥ ४७ ॥ तेवीं वार्धक्यवयसेंसीं । एकांत जाहलिया स्त्रियेशीं । गोष्टीमात विनोदेंसीं । कामाचा त्यासी घाला पडे ॥ ४८ ॥ त्यागावी कामिनीसंगती । हा मुख्य त्याग परमार्थीं । हेंचि स्वमुखें श्रीपती । उद्धवाप्रती बोलिजेला ॥ ४९ ॥ पराशराऐसा महंत । मत्स्योदरीशीं जाहला रत । यालागीं स्त्रियेचा एकांत । अनर्थभूत पुरुषासी ॥ ३५० ॥ मैथूनभूत जे

होतो, तो भक्तिभावानें माझीच उपासना करीत असतो. ३७ हें नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याचें व्रत वानप्रस्थ व संन्यासी यांच्यासारखेंच असतें. सर्वसंगपरित्याग करणें हेंच त्यांतील मुख्य धर्म आहे. ३३८.

—आतां यति व वानप्रस्थ यांना साधारण असे नैष्ठिक ब्रम्हचाऱ्याचे धर्म सांगतात—

अगृहस्थः स्त्रीणां निरीक्षणस्पर्शसंलापक्ष्वेलनादिकं त्यजेत्—अगृहस्थानें सकामवृत्तीनें स्त्रियांकडे पहाणें, त्यांना स्पर्श करणें, त्यांच्याशीं भाषण, थट्टा-मस्करी इत्यादिकांचा त्याग करावा. मिथुनीभूतान् प्राणिनः अग्रतः त्यजेत्—रतिनिमित्तानें परस्पर संयुक्त झालेल्या प्राण्यांकडे नुसतें पाहूंहि नये. ३३.

नैष्ठिक ब्रह्मचारी, संन्यासी व वनांत रहाणारा वानप्रस्थ या तिघांनीं स्त्रियांकडे पाहूं नये. हा त्यांचा मुख्य स्वधर्म आहे. ३९ स्त्री दृष्टीस पडतांच त्यांनीं आपली झोंपडी सोडून तत्काळ तेथून पळ काढावा. मग त्यांच्याशीं भाषण तर दूरच राहिलें ! ३४० या तिघांनीं स्वप्नांतहि स्त्रियांचा स्पर्श होऊं देऊं नये. कारण स्वप्नांत जरी स्त्रीचा स्पर्श झाला तरी तत्काल मनांत कामविकार उद्भवतो व स्वप्नावस्था होते. ४१ स्त्रियांशीं क्रीडा, विनोद केला असतां धर्माचें मूळबीजच नाश पावतें; म्हणून जाणते विद्वान् स्त्रियांचें गुणवर्णन करीत नाहींत. ४२ स्त्रियांचे हावभाव, दर्शन, एकान्तांत भाषण, थट्टा-मस्करी, स्पर्श, विनोद, श्रृंगारिक भाषण ४३ इत्यादि प्रकार जेथें घडतात, तेथें कामाचा हल्ला अवश्य होतो, स्वधर्म समूळ बुडतो व धैर्याचें मूलतत्त्वच नाश पावतें. ४४ गृहस्थाचीहि परस्त्रियांशीं अशाप्रकारें वागण्याची प्रवृत्ति होतांच त्यांचाहि शेवटीं नाशच होतो. ४५ स्त्री अग्निकुंडासारखी आहे व पुरुष थिजलेल्या तुपाच्या बुधल्या सारखा आहे. अग्नीपाशीं तुपाचें भांडें नेतांच त्यांतील तूप वितळण्यास जसा क्षणभरहि अवधि लागत नाहीं त्याप्रमाणें पुरुषाचें स्त्रीशीं सान्निध्य घडतांच त्याचें मन ताब्यांत रहात नाहीं. ४६ साठ वर्षें गोठवून ठेवलेलें तूप अग्नीपाशीं आणितांच तें तत्काळ जसें पातळ होतें, ४७ तसें साठ वर्षांच्या वृद्ध पुरुषानें स्त्रीबरोबर एकांतांत थट्टा-विनोद केल्यास तोहि तत्क्षणीं कामातुर होतो. ४८ म्हणून स्त्रियांची संगति सोडावी. हा परमार्थांतील मुख्य त्याग आहे, असें श्रीकृष्णानें स्वमुखानें उद्धवाला सांगितलें. पराशरासारखा एवढा श्रेष्ठ तपस्वी, पण तोहि कोळ्याची कन्या मत्स्यगंधा दृष्टीस पडतांच, आपल्या धर्मापासून भ्रष्ट झाला. यास्तव स्त्रियांचा एकान्त पुरुषाला अनर्थकारक आहे. ३५० त्याचप्रमाणें या तीन्ही आश्रमांतील साधकांनीं कामासक्तीनें परस्पर संयुक्त झालेल्या

प्राणी । पशुपक्षि आदिकरूनी । सादर न पहावे नयनीं । पाहतां कडकडूनि काम खवळे ॥ ५१ ॥ मत्स्यमैथुन देखिल्यासाठीं । खवळल्या कामाच्या परिपाठीं । सौभर ऋषीश्वरें तपकोटी । मैथुनासाठीं नाशिल्या ॥ ५२ ॥ यालागीं कामाचें दर्शन । कां कामाची आठवण । पुरुषासी बाधक जाण । कामस्मरण न करावें ॥ ५३ ॥ हृदयीं नव्हे कामसंचार । तैसा करावा सदाचार । भूतें पहावीं मदाकार । हा मुख्य प्रकार हरि बोले ॥ ५४ ॥

शौचमाचमनं स्नानं सन्ध्योपासनमार्जवम् । तीर्थसेवा जपोऽस्पृश्याभक्ष्यासंभाष्यवर्जनम् ॥ ३४ ॥

सर्वाश्रमप्रयुक्तोऽयं नियमः कुलनन्दन । मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायसंयमः ॥ ३५ ॥

शौच आचमन स्नान । संध्या तर्पण उपासन । जपादिक अनुष्ठान । तीर्थसेवन विश्वासें ॥ ५५ ॥ अधर्म अकर्माचा विटाळ । हों न द्यावा अळुमाळ । आलियाही संकटकाळ । अभक्षणशीळ नव्हे भावो ॥ ५६ ॥ ज्यासी असे व्रतधारण । तेणें रजस्वलादि निंद्य जन । त्यांसी न करावें संभाषण । धरावें मौन निंदास्तवनीं ॥ ५७ ॥ सर्वांही आश्रमांसी जाण । स्वधर्मनियमाचें लक्षण । सांगेन म्हणे श्रीकृष्ण । ऐक सावधान उद्धवा ॥ ५८ ॥

यदुवंशकुलनंदन । ऐक उद्धवा सज्ञान । वर्णाश्रमस्वधर्मलक्षण । सर्वांस जाण निष्ठा हे एक ॥ ५९ ॥ मनसा वाचा कर्मणा । नेमूनि आपआपणा । सर्वांभूतीं ब्रह्मभावना । अखंड भावना राखावी ॥ ३६० ॥ ऐसा मद्भाव सर्वांभूतीं । दृढ ठसावल्या चित्तवृत्ती । ऐशा नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याप्रती । मोक्षफलप्राप्ती हरि बोले ॥ ६१ ॥

पशु-पक्ष्यादिकांकडे केव्हांहि उत्सुकतेनें पाहूं नये. कारण ते दृष्टीस पडले तरीहि कामवासना अतिशय खवळते. ५१ अहो नुसत्या मत्स्याचा परस्पर संयोग पाहिल्यामुळें सौभर ऋषीचा काम खवळला व त्याच्या तृप्तीसाठीं त्यानें असंख्य वर्षांची तपश्चर्या फुटक घालविली. ५२ कामाचें दर्शन, स्मरण, पुरुषाला अतिशय बाधक आहे म्हणून केव्हांहि कामाचें स्मरण करूं नये. ५३ ज्यायोगें अंतःकरणांत कामाचा प्रवेश होणार नाहीं, अशा सदाचारानें वागावें. सर्व भूतांना मद्रूप पहावें, हें मुख्य लक्षण आतां श्रीहरि सांगत आहे. ३५४.

—आतां नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याचेच सर्व-आश्रम-साधारण धर्म सांगतात—

शौच०...जपः–बाह्य व आंतर शौच, आचमन, त्रिकाल स्नान, संध्योपासना, मनाचा सरळपणा, तीर्थयात्रा, जप, **अस्पृश्याभक्ष्यासंभाष्यवर्जनम्**–अस्पृश्य, अभक्ष्य व असंभाष्य म्ह० संभाषणास अयोग्य यांना वर्ज करणें. ३४. **अयं सर्वाश्रमप्रयुक्तः नियमः**–हा सर्व आश्रमांना साधारण असा नियम आहे. **कुलनंदन**–हे कुलनन्दन ! **सर्वभूतेषु मद्भावः**–सर्व भूतांमध्यें मद्भाव, **मनोवाक्कायसंयमः**–आणि मन, वाणी व शरीर यांचें नियमन हाहि सर्वाश्रमसाधारण नियम आहे. ३५.

शुचिर्भूतपणा, आचमन, स्नान, संध्या, तर्पण, पूजा-अर्चा, जपादि अनुष्ठान व श्रद्धापूर्वक तीर्थग्रहण करावें. ५५ अधर्म व अकर्म यांचा लवमात्रहि विटाळ होऊं देऊं नये. कसलेंहि संकट ओढवलें तरी अभक्ष्य-भक्षण करूं नये. ५६ व्रतस्थ पुरुषानें रजस्वलादिकांसारख्या अपवित्र अवस्थेंत असलेल्या व्यक्तींबरोबर भाषण करूं नये. निंदा-स्तुति या दोन्ही प्रसंगींहि मौन धरावें. ५७ ! उद्धवा ! सर्व आश्रमांना सारख्याच असणाऱ्या स्वधर्म-नियमांचें लक्षण आतां सांगतों, तें सावध चित्तानें ऐक, असें श्रीकृष्ण म्हणाले. ३५८.

हे यदुवंशांतील कुलनंदना, ज्ञानी उद्धवा ! ऐक. वर्णाश्रमांच्या स्वधर्मांचीं लक्षणें सर्वांना एकसारखींच आहेत. ५९ काया-वाचा-मनानें आत्मसंयमन करून सर्व प्राणिमात्रांमध्यें ब्रह्मस्वरूपाचीच भावना धरावी. ३६० अशी सर्व भूतांमध्यें मत्स्वरूपाची भावना दृढ झाली म्हणजे नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यालाहि मोक्षाची प्राप्ति होते. ३६१.

एवं बृहद्व्रतधरो ब्राह्मणोऽग्निरिव ज्वलन् । मद्भक्तस्तीव्रतपसा दग्धकर्माशयोऽमलः ॥ ३६ ॥

यापरी जो ब्रह्मचारी । महाव्रतें व्रत धरी । मद्भावना भूताकारीं । धारण धरी अविश्रम ॥ ६२ ॥ यापरी करितां मद्भजना । जळाल्या कर्मबीजेंसीं वासना । तेव्हां पूर्ण भक्ति माझी जाणा । वरी अंतःकरणा भक्तांच्या ॥ ६३ ॥ तेव्हां निरुपचार निजस्थिती । सहजचि घडे माझी भक्ती । जेथ ज्या ज्या देखे दृश्य व्यक्ती । मद्भावप्रतीती चिद्रूप ॥ ६४ ॥ ऐशी घडतां माझी भक्ती । आर्त जिज्ञासु अर्थार्थी । यांची उठवूनियां पंक्ती । चिन्मात्रैक चौथी भक्ती तो लाभे ॥ ६५ ॥ सांचविजे भक्तीच्या ठायीं । चारी मुक्ती लोळती पायीं । ते स्वानंदें मद्भक्तांच्या देहीं । संपूर्ण पाहीं उल्हासे ॥ ६६ ॥ तेव्हां मज व्हावी मुक्तता । हेंही नाठवे त्याच्या चित्ता । कां गेली माझी बद्धता । हेंही सर्वथा स्मरेना ॥ ६७ ॥ एवं माझेनि भजनसुखें । विसरला सकळ सुखदुःखें । माझे भक्तीचेनि हरिखें । स्वानंदतोखें संतुष्ट ॥ ६८ ॥ ऐसा नैष्ठिक ब्रह्मचारी । मज पावला स्वधर्मैकरीं । आतां उपकुर्वाणाची परी । ऐक दुसरी अवस्था ॥ ६९ ॥

अथानंतरमावेक्षन्यथा जिज्ञासितागमः । गुरवे दक्षिणां दत्त्वा स्नायाद्गुर्वनुमोदितः ॥ ३७ ॥

संपूर्ण केलिया अध्ययन । जाहलिया वेदशास्त्रसंपन्न । तेणें गुरूसी आज्ञा पुसोन । व्रतविसर्जन सकामा ॥ ३७० ॥ सकामनिष्कामतेचा भरू । देखोनि विवेकविचारू । तैशीच आज्ञा देती गुरू । जैसा अधिकारू शिष्याचा ॥ ७१ ॥ ज्यासी गृहाश्रमाची आसक्ती । तेणें आपुल्या यथाशक्ती । दक्षिणा देऊनि

—आतां निष्काम नैष्ठिकाला मोक्ष हें फल सांगतात—

एवं बृहद्व्रतधरः तीव्रतपसा अग्निः इव ज्वलन् ब्राह्मणः अमलः (चेत्)—याप्रमाणें नैष्ठिक ब्रह्मचर्य व्रत धारण करणारा व तीव्र तपानें अग्निसारखा उज्वल झालेला ब्राह्मण जर निष्काम असला तर, दग्धकर्माशयः मद्भक्तः भवति—तो ज्याचें अंतःकरण दग्ध झालें आहे असा होत्साता माझा भक्त होतो. ३६.

असा जो ब्रह्मचारी कडक व्रत पाळितो आणि सर्व भूतांमध्यें माझीच भावना ठेवून ती दृढ करितो, ६२ त्याच्या सर्व वासना कर्मबीजासह माझ्या भक्तीनें जळून जातात व माझी पूर्ण भक्ति त्याच्या अंतःकरणांत दृढ होते. ६३ व मग कांहीं साधनावांचूनच माझी भक्ति सहज घडते. तो जेवढें दृश्य किंवा जेवढ्या व्यक्ति पहातो तेवढें सगळें त्याला मद्रूपच दिसतें. ६४ अशी माझी भक्ति जेव्हां घडते तेव्हां आर्त म्ह० शरीरव्यथेनें पीडिलेला जिज्ञासु व अर्थार्थी या तिघांच्या पंक्ति उठवून तो सर्वांतील श्रेष्ठ अशी जी माझी चौथी ज्ञानभक्ति तिला प्राप्त होतो. ६५ (सु. गी. १८–५४ पृ. ३४०) या भक्तींतच चारी मुक्ति सांठविलेल्या असतात. त्या या ज्ञानी भक्तांच्या पायाशीं लोळण घेतात. अशाप्रकारचा आत्मानंद माझ्या भक्तांच्या देहांत मोठ्या उल्हासानें पूर्ण भरलेला असतो. ६६ त्यावेळीं ' आपण मुक्त व्हावें ' हा विचारहि त्याच्या मनाला शिवत नाहीं किंवा ' माझा बंधच मुळीं नाहींसा झाला ' हेंहि त्याला स्मरत नाहीं. ६७ त्याप्रमाणें तो माझ्या भजनाच्या सुखानें सगळीं सुखःदुखें विसरतो व माझ्या भक्तीच्या आनंदांत संतुष्ट असतो. ६८ असा जो नैष्ठिक ब्रह्मचारी असतो तो स्वधर्माचरणानें मला प्राप्त होतो. आतां ब्रह्मचर्याश्रमांतीलच उपकुर्वाण नांवाची जी दुसरी अवस्था, तिचा प्रकार ऐक. ३६९.

—आतां उपकुर्वाणाच्या समावर्तनाचा प्रकार सांगतात—

अथ अनंतरं आवेक्षन् यथा जिज्ञासितागमः गुरवे दक्षिणां दत्त्वा गुर्वनुमोदितः स्नायात्—आतां दुसऱ्या आश्रमांत प्रवेश करण्याची इच्छा करणाऱ्या ब्रह्मचाऱ्यानें यथाशास्त्र वेदार्थाचा पूर्ण विचार करून गुरूला दक्षिणा देऊन त्यानें अनुज्ञा दिली असतां अभ्यंगस्नान करून गुरुकुलांतून निवृत्त व्हावें. ३७.

ब्रह्मचारी शिष्यानें अध्ययन पुरें झाल्यावर वेदशास्त्राचें संपूर्ण ज्ञान मिळवून, गुरूची आज्ञा घ्यावी आणि गृहस्थाश्रमाची इच्छा करणारानें व्रतविसर्जन करावें. ३७० गुरूदेखील शिष्याचा विषयांकडे कल आहे कीं तो निष्काम आहे हें जाणून व त्याची योग्यता पाहून त्याच्या अधिकारानुसार त्यास आज्ञा देतात. ७१ ज्याला

गुरूप्रती । व्रतसमाप्ती करावी ॥ ७२ ॥ करावया समावर्तन । घेऊनि गुरूचें अनुमोदन । करावें मंगल-स्नान । विसर्जन व्रतबंधा ॥ ७३ ॥ येथ अधिकाराचा भेदू । स्वयें सांगतो गोविंदू । तोचि श्लोकार्थी विशदू । वैराग्यसंबंधू अधिकारा ॥ ७४ ॥

गृहं वनं वोपविशेत्प्रव्रजेद्वा द्विजोत्तमः । आश्रमादाश्रमं गच्छेन्नान्यथा मत्परश्चरेत् ॥ ३८ ॥

ज्यासी वैराग्य नाहीं सर्वथा । हृदयीं स्त्रीकामाची आस्था । तेणें द्वितीयाश्रमसंस्था । गार्हस्थ्या करावें ॥ ७५ ॥ स्त्रीकाम तरी नावडे । विवेक वैराग्य ज्यासी थोडें । तेणें वानप्रस्थाश्रमाकडे । रिघावें रोकडें तत्काल ॥ ७६ ॥ जो विवेकतेजें दीप्तिमंत । ज्यासी सदा वैराग्य धडधडित । जो सर्वार्थी दिसे विरक्त । त्यासीच निश्चित चतुर्थाश्रम ॥ ७७ ॥ मुख्यत्वें ज्यासी ब्राह्मणधर्म । तोचि बोलिजे द्विजोत्तम । त्यासीच बोलिला चतुर्थाश्रम । वैश्यक्षत्रियां नेम संन्यासीं नाहीं ॥ ७८ ॥ क्षत्रिय संन्यास अंगीकारिती । तिहीं रिघावें महापंथीं । दंडकमंडलादिप्रवृत्ती । व्यवहारस्थिती त्यां नाहीं ॥ ७९ ॥ ब्राह्मणासी ब्रह्म-चर्याच्या पोटीं । धडधडीत जैं वैराग्य उठी । तैं संन्यासपरिपाठीं । उठाउठी अंगीकारू ॥ ३८० ॥ बैसतां भार्येच्या पाटीं । बहुल्यावरी वैराग्य उठी । त्यासी संन्यासग्रहणी गोठी । अधिकारू श्रेष्ठीं बोलिला ॥ ८१ ॥ संन्यासग्रहणीं ज्याचें । वैराग्य दिसे अर्धकाचें । त्यासी संन्यासग्रहणाचें । योग्यत्व साचें असेना ॥ ८२ ॥ जैसा कां वोकिला वोक । ज्याचा त्यास नावडे देख । तैसें विषयभोगसुख । ज्यासी निःशेख नावडे

गृहस्थाश्रमाची आसक्ति असते, त्यानें यथाशक्ति गुरुदक्षिणा देऊन व्रताची समाप्ति करावी. ७२ नंतर गुरूची आज्ञा घेऊन समावर्तन म्ह० सोडमुंज करावी. अगोदर मंगलस्नान करून व्रतविसर्जन करावें. ७३ यांतील अधिकाराचा भेद आतां श्रीकृष्ण सांगत आहे. वैराग्यामुळें अधिकारभेद कसा होतो तेंच आतां भगवान् पुढील श्लोकांत स्पष्ट करून सांगतात. ३७४.

—त्याच्या अधिकारानुसार आश्रमांचा विकल्प व समुच्चय सांगतात—

गृहं वनं वा उपविशेत्–ब्रह्मचारी जर सकाम असेल तर त्यानें गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावा. अंतःकरणशुद्धि इत्यादिकांची इच्छा असेल तर वनांत प्रवेश करावा (म्ह० वानप्रस्थाश्रम स्वीकारावा). द्विजोत्तमः प्रव्रजेत् वा–किंवा ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे, असा ब्राह्मण जर तो असेल तर त्यानें संन्यास करावा. आश्रमात् आश्रमं वा गच्छेत्–किंवा ब्रह्मचर्यांतून गृहस्थाश्रमांत, त्यांतून वनाश्रमांत व त्यांतून चतुर्थाश्रमांत असा क्रमानें आश्रमप्रवेश करावा. मत्परः अन्यथा न चरेत्–मत्परायण झालेल्या पुरुषानें अनाश्रमी राहूं नये किंवा उलट क्रमानें आश्रम स्वीकारूं नयेत. [अथवा अमत्परः अन्यथा न चरेत्–म्ह० जो मत्परायण नाहीं, त्यानें अनाश्रमी राहूं नये. किंवा आश्रमांचा व्युत्क्रम करूं नये, असा पदच्छेद व अर्थ करावा. कारण ईश्वरभक्ताला आश्रमांचा नियम नाहीं, असें पुढें सांगावयाचें आहे.] ३८.

ज्याच्या मनांत मुळींच वैराग्य नसतें व अंतःकरणांत सतत स्त्रीसुखाची उत्सुकता असते, त्यानें दुसऱ्या गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावा. ७५ ज्याला स्त्रीसुखाची फारशी आवड नसते, पण विवेक-वैराग्यहि तीव्र नसतें, त्यानें तत्काल वानप्रस्थाश्रम पत्करावा. ७६ जो विवेकाच्या तेजानें झळकत असतो, ज्याचें वैराग्य निरंतर प्रखर असतें, जो सर्व विषयांविषयीं पूर्ण विरक्त असतो, त्यानें नियमानें चतुर्थाश्रमच स्वीकारावा. ७७ ज्याला ब्राह्मणधर्म मुख्यत्वेंकरून असतो त्याला द्विजोत्तम म्हणतात, त्यानेंच संन्यास घ्यावा. क्षत्रिय व वैश्य यांना संन्यासाचा अधिकार नाहीं. ७८ जे क्षत्रिय संन्यास घेतात त्यांनीं बहूदक संन्यास घेऊन महायात्रा करीत हिंडावें. त्यांस दंड-कमंडलु इत्यादिकांचा नियम नाहीं. ७९ ब्राह्मणांच्या मनांत ब्रह्मचर्यांतच तीव्र वैराग्य बाणलें, तर त्यानें लगेच संन्यास घ्यावा. ३८० लग्न करण्यासाठीं भार्येच्या समोर बहुल्यावर उभें राहिलें असतांहि जरी वैराग्य उत्पन्न झालें तरी त्यानें संन्यास करावा, असा श्रेष्ठांनीं त्याला संन्यासाधिकार सांगितला आहे. ८१ संन्यासग्रहणाविषयीं ज्याचें वैराग्य अर्धवट असतें म्ह० तीव्र नसतें त्याला संन्यासाचा अधिकार नाहीं. ८२ ज्याप्रमाणें ओकून टाकिलेल्या

॥ ८३ ॥ त्यासी संन्यासीं अधिकारू । तोचि संन्यासी साचारू । ज्यासी विषयांचा विकारू । अणुमात्रू बाधेना ॥ ८४ ॥ प्रथम ब्रह्मचर्ययुक्त । वैराग्या न चढेचि हात । तरी होऊनि गृहस्थ । स्वधर्मयुक्त वर्तावें ॥ ८५ ॥ तेथें स्वधर्में विषय सेवितां । दृढ साधावी विरक्तता । तेथही वैराग्य न ये हाता । तरी वानप्रस्थाश्रमी व्हावें ॥ ८६ ॥ यापरी आश्रमांतूनि आश्रमीं जातां । वैराग्यें संन्यासग्रहणता । परी अनाश्रमीं तत्त्वतां । नाहीं सर्वथा अधिकारू ॥ ८७ ॥ सांडूनि पूर्वाश्रमासी । जो गेला आश्रमांतरासी । तेथूनि पुढारां मार्ग त्यासी । परी माघारें यावयासी विधि नाहीं ॥ ८८ ॥ कां मत्पर जो माझा भक्त । त्यासी आश्रमनेम नाहीं तेथ । तो माझेनि भजनें कृतकृत्य । जाण निश्चित उद्धवा ॥ ८९ ॥ सद्भावें माझी भक्ति करितां । विवेकवैराग्ययोग्यता । पावोनि माझी पूर्ण सत्ता । सायुज्यता नेघती ॥ ३९० ॥ ऐसे जे माझे भक्तोत्तम । त्यांसी न लगे आश्रमनेम । त्यांचा सर्वही मी स्वधर्म । ऐसें पुरुषोत्तम बोलिला ॥ ९१ ॥ उद्धवा ऐक पां निश्चितीं । गृहस्थाची स्वधर्मस्थिती । समूळ सांगेन तुजप्रती । ऐसें श्रीपति बोलिला ॥ ९२ ॥

गृहार्थी सदृशीं भार्यामुद्वहेदजुगुप्सिताम् । यवीयसीं तु वयसा यां सवर्णामनुक्रमात् ॥ ३९ ॥

करोनियां समावर्तन । व्रतबंधाचें विसर्जन । गुरुआज्ञा घेऊनि जाण । पाणिग्रहण करावें ॥ ९३ ॥ भार्या पर्णावी सवर्ण । इतर वर्जिले तिन्ही वर्ण । स्ववेदस्वशाखेचे वर्ण । सगोत्रपण चुकवूनि ॥ ९४ ॥ जे उभय कुळीं विशुद्ध । जे दशलक्षणीं अनिंद्य । देखतां मातापित्यासी आल्हाद । तो श्लाघ्य संबंध

अन्नाकडे ज्याचें त्यालाच पुनः ढुंकून पहावेंसें वाटत नाहीं, त्याप्रमाणें ज्याला विषयभोगांच्या सुखाचा तिटकारा येतो, ८३ तोच खरा संन्यासाचा अधिकारी आहे. त्याला विषयांचा विकार यत्किंचित्‌हि बाधत नाहीं. ८४ ज्याला ब्रह्मचर्यांत राहून विरक्ति येत नाहीं, त्यानें गृहस्थाश्रम स्वीकारून स्वधर्मानें वागावें. ८५ आणि गृहस्थाच्या धर्माप्रमाणें वागून विषयोपभोग घेत असतां, हळूहळू त्या विषयांविषयीं विरक्त होत जावें; पण त्यांतहि वैराग्य उत्पन्न झालें नाहीं, तर वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. ८६ याप्रमाणें एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत जात असतां उत्तरोत्तर विरक्त होऊन शेवटीं संन्यास घ्यावा; पण आश्रमावांचून रहाण्याचा मात्र त्यांस सर्वथा अधिकार नाहीं. ८८ पहिला आश्रम सोडून पुढल्या आश्रमांत ज्यानें पाऊल टाकिलें, त्यानें त्याच्या पुढल्या आश्रमांत जावें; पण त्याला मागें वळून पहिल्या आश्रमांत जाण्याचा अधिकार नाहीं. (म्ह० गृहस्थाश्रमांतून वानप्रस्थ किंवा संन्यासाश्रम घेतां येतो; पण संन्याशाला पुनः गृहस्थ किंवा गृहस्थाला ब्रह्मचारी होतां येत नाहीं.) ८८ किंवा माझा जो परम भक्त असतो, त्याला हे आश्रमांचे नियम नाहींत. तो केवळ माझ्या भजनानेंच कृतकृत्य होतो, हें खात्रीनें जाण. ८९ श्रद्धेनें माझी भक्ति केली असतां विवेक-वैराग्यादि योग्यता येते व भक्त माझ्या पूर्ण सत्तेला प्राप्त होतो. तो सायुज्य मुक्ति दिली तरी घेत नाहीं. ३९० असे जे माझे श्रेष्ठ भक्त आहेत, त्यांना आश्रमनियम नाहीं. त्यांचा सर्व स्वधर्म मीच आहें. ९१ उद्धवा ! आतां गृहस्थाच्या स्वधर्माचें लक्षण तुला सांगतों, तें ऐक, असें श्रीपति म्हणाला. ३९२.

—विवाहनियमपूर्वक वर्णधर्मासह गृहस्थाश्रम सांगतात—

गृहार्थी सदृशीं अजुगुप्सितां वयसा यवीयसीं भार्यां उद्वहेत्—गृहस्थाश्रमाची इच्छा करणाऱ्या पुरुषानें आपल्या वर्णाची, कुल व लक्षण यांनीं निंदित नसलेली व वयानें आपल्यापेक्षां लहान असलेली अशा कन्येचें पाणिग्रहण करावें. तु यां सवर्णां अनुक्रमात् [उद्वहेत्]—पण कामतः ज्या दुसऱ्या वर्णाच्या कन्येशीं विवाह करावयाचा असेल तिच्याशीं सवर्णा स्त्रीच्या मागून व वर्णांच्या क्रमानें विवाह करावा. [ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना अनुक्रमानें इतर तीन, दोन व एक वर्णाच्या भार्या करण्याचा अधिकार स्मृतीनें सांगितला आहे. शूद्राला मात्र त्याच्याच वर्णाची स्त्री विहित आहे. या मनुवचनाला अनुसरून हें येथील विधान आहे.] ३९.

ब्रह्मचाऱ्यानें सोडमुंज करून व्रतबंधाचें विसर्जन करावें आणि गुरूची आज्ञा घेऊन विवाह करावा. ९३ आपल्याच वर्णांतील कुमारिकेबरोबर लग्न करावें, इतर तीन वर्णांतील कन्या वरूं नयेत. (ब्राह्मण असल्यास त्यानें क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णांशीं विवाहसंबंध करूं नये.) त्याचप्रमाणें स्वगोत्र व प्रवर वर्ज्य करून आपला

पर्णावा ॥ ९५ ॥ जिची जन्मोत्तरी पाहातां । वयें वरापरीस अधिकता । का समान वयें समता । या दोनी सर्वथा त्यागाव्या ॥ ९६ ॥ जन्मपत्र पाहतां दिठीं । वरुषें सातेपांचें धाकुटी । ते पर्णावी स्वधर्मदृष्टीं । भार्या गोमटी ती नांव ॥ ९७ ॥ नोवरी पाणिग्रहणयुक्त । आठांपासूनि दशवर्षांत । अधिक ते वृषली निश्चित । शास्त्रार्थप्रयोगें ॥ ९८ ॥ गर्भाष्टमहूनि खालती । जिची वयसा असे निश्चितीं । ते नारी वराधिकारी अप्राप्ती । ऐसें शास्त्रार्थीं बोलिजेलें ॥ ९९ ॥ ऐशा लक्षणांचा नाहीं बाधू । तैशी पर्णावी शुद्ध वधू । मग आश्रमधर्म अतिशुद्धू । शास्त्र अविरुद्धू तो ऐक ॥ ४०० ॥

इज्याध्ययनदानानि सर्वेषां च द्विजन्मनाम् । प्रतिग्रहोऽध्यापनं च ब्राह्मणस्यैव याजनम् ॥ ४० ॥

ब्राह्मणाचें षट्कर्म जाण । यजन याजन अध्ययन । अध्यापन प्रतिग्रहो दान । नेमस्त जाण हीं सहा ॥१॥ हो कां द्विजन्में तिन्ही वर्ण । त्यांत क्षत्रिय वैश्य दोघेजण । त्यांस तीं कर्मीं अधिकारपण । यजन दान अध्ययन ॥ २ ॥ जे उत्तमजन्मे ब्राह्मण । त्यांसी षट्कर्मीं अधिकार जाण । तीनी परमार्थासी पूर्ण । जीविकावर्तन तीं कर्मीं ॥ ३ ॥ कोणें कर्में जीविकेसी । कोणें पाविजे परमार्थासी । त्या ब्राह्मणकर्मविभागासी । ऐक तुजपाशीं सांगेन ॥ ४ ॥ यजन तें यज्ञाचरण । अध्ययन तें वेदपठण । दान जें देणें आपण । हें त्रिकर्म जाण परमार्था ॥ ५ ॥ गुरुत्व घेऊनि आपणें । याजन तें याग करवणें । अध्यापन वेद पढवणें । स्वयें दान घेणें तो प्रतिग्रहो ॥ ६ ॥ जाहलिया सच्छिष्यसंपत्ती । इये तिहीं कर्में जीविकावृत्ती । गुरुत्वें गुरुपूजाप्राप्ती । तेणें जीविकास्थिति ब्राह्मणा ॥ ७ ॥ क्षत्रियवैश्यद्विजन्म्यांसी ।

वेद व आपली शाखा यांतील कन्या विवाहास योग्य आहे. ९४ ज्यांचीं दोन्हीं कुळें शुद्ध आहेत, जे अनिंद्य लक्षणांनीं युक्त, ज्यांस पाहून माता-पित्यांस आनंद होतो, असा योग्य संबंध करावा. ९५ ज्या कन्येच्या जन्मपत्रिकेवरून तिचें वय वरापेक्षां अधिक ठरेल, किंवा दोघांचेंहि वय सारखेंच असेल तर त्या दोन्ही कन्या त्याज्य आहेत. ९६ जन्मपत्रिकेवरून जी वरापेक्षां पांच-सात वर्षें लहान ठरते, तीच धर्मशास्त्रदृष्ट्या योग्य वधू होय. ९७ विवाहसमयीं वधू आठपासून दहा वर्षांच्या वयाची असावी. याहून मोठी असल्यास ती शूद्र समजावी, असें शास्त्र म्हणतें. ९८ गर्भावस्थेपासून आठ वर्षांहून कमी वयाची असलेली कन्या विवाहाला पात्र नाहीं, असें शास्त्रांनीं सांगितलें आहे. ९९ अशा प्रकारच्या पवित्र लक्षणांनीं युक्त वधूबरोबर विवाह करावा. आतां शास्त्रोक्त, अतिशय शुद्ध आश्रमधर्माचें लक्षण सांगतों, तें ऐक. ४००.

सर्वेषां च द्विजन्मनां इज्याध्ययनदानानि—ब्राह्मण—क्षत्रिय—वैश्य या तीन्हीं द्विजांना यज्ञ, अध्ययन व दान हे आवश्यक धर्म आहेत. प्रतिग्रहः अध्यापनं याजनं च ब्राह्मणस्य एव—प्रतिग्रह, अध्यापन व याजन हे ब्राह्मणाचेच धर्म आहेत. ४०.

यजन-याजन, अध्ययन-अध्यापन, दान-प्रतिग्रह, हीं सहा ब्राह्मणांचीं नित्य कर्में आहेत. १ ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या तीन वर्णांना द्विज म्हणतात. तेव्हां राहिलेले दोन वर्ण क्षत्रिय व वैश्य यांना यजन, अध्ययन करणें व दान देणें या तीनच कर्मांचा अधिकार आहे. २ परंतु ज्यांचा जन्म श्रेष्ठ आहे अशा ब्राह्मणांना सहा कर्मांचा अधिकार आहे. यांतील पहिलीं तीन म्ह० यजन-अध्यापन-दान हीं परमार्थप्राप्तीचीं साधनें आहेत व बाकीचीं तीन उदरनिर्वाहाचीं साधनें आहेत. ३ कोणतीं कर्में उपजीविकेच्या योग्य आहेत व कोणत्या कर्मानें परमार्थप्राप्ति होते, तो ब्राह्मणांच्या कर्मांतील विभाग मी तुला सांगतों, ऐक. ४ यजन म्ह० यज्ञ-याग करणें; अध्ययन म्ह० वेदपठण, शास्त्राभ्यास; दान म्ह० दुसऱ्याला धन-वस्त्र-द्रव्यादि देणें. हीं तीन कर्में परमार्थप्राप्ति करून देणारीं आहेत. ५ याजन म्ह० आपण गुरु होऊन दुसऱ्यांकडून यज्ञ करविणें; अध्यापन म्ह० शिष्यांना वेद शिकविणें; आणि प्रतिग्रह म्ह० दिलेलें दान स्वीकारिणें. ६ गुरूपाशीं पुष्कळ शिष्य जमले, म्हणजे या तीन कर्मांनीं त्यांचीं उपजीविका चालवितां येते. गुरुपणा प्राप्त झाला म्हणजे गुरुपूजेचा मान मिळतो व त्यायोगें ब्राह्मणांचा चरितार्थ चालतो, ७ क्षत्रिय व वैश्य जरी द्विज आहेत, तरी त्यांस गुरु होण्याचा अधिकार नाहीं. म्हणून हीं तीन कर्में त्यांना

गुरुत्व बोलिलें नाहीं यांसी । हीं तीन्हीं कर्मे त्यांसी । निषेधतेसी यालागीं ॥ ८ ॥ आतां ब्राह्मणाचें लक्षण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । मुख्य मुख्यतम साधारण । त्रिविध जाण उद्धवा ॥ ९ ॥

प्रतिग्रहं मन्यमानस्तपस्तेजोयशोनुदम् । अन्याभ्यामेव जीवेत शिलैर्वा दोषदृक् तयोः ॥ ४१ ॥

स्वधर्मनिष्ठ ब्राह्मणापाशीं । तपतेजधैर्ययशोराशी । प्रतिग्रहो इतुकियांसी । मूळनाशासी कारण ॥ ४१० ॥ जो स्वधर्मनिष्ठ ब्राह्मण । करी प्रतिग्रहो अंगीकरण । तो जाण पां साधारण । हें एक लक्षण द्विजाचें ॥ ११ ॥ जो प्रतिग्रहा पराङ्मुख ब्राह्मण । तेणें याजन अध्यापन जाण । स्वधर्मेंकरूनि द्रव्यार्जन । जीविकावर्तन करावें ॥ १२ ॥ धरोनि द्रव्याशा मानसीं । न करवावें यागांत कर्मासी । कां सांगोनि वेदाक्षरासी । द्रव्य त्यापाशीं इच्छूं नये ॥ १३ ॥ करूनि वेदाक्षरदान । जो शिष्याचेंही न घे धन । ऐसा वैराग्यें परिपूर्ण । तो शुद्ध ब्राह्मण सर्वथा ॥ १४ ॥ ऐक त्याचें जीविकावर्तन । शिल का उंछवृत्ती जाण । ऐक त्याचेंही लक्षण । सकारण सांगेन ॥ १५ ॥ शेत संवगूनि नेल्या जाण । ते शेतीं प्राप्त कणिसें कां कण । ते शिलवृत्ति संपूर्ण । ऐक लक्षण उंछवृत्ती ॥ १६ ॥ स्वामी नसतां सांपडले जाण । ऐसे हाटवाटीं पडिले कण । ते वेंचूनि घेणें आपण । जीविकावर्तन यावरी ॥ १७ ॥ या नांव उंछवृत्तीं । ब्राह्मणाची अतिशुद्ध स्थिती । तोही प्रकार उद्धवाप्रती । स्वयें श्रीपति सांगत ॥ १८ ॥

ब्राह्मणस्य ही देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते । कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानंतसुखाय च ॥ ४२ ॥

निषिद्ध आहेत. ८ उद्धवा ! आतां ब्राह्मणांचें लक्षण ऐक. त्यांत उत्तम, मध्यम व सामान्य असे तीन भेद आहेत. ४०९.

—प्रतिग्रहादि त्रय हें उपजीविकेचें साधन आहे व तें ब्राह्मणासाठींच आहे, पण त्यांतहि मुख्य, मुख्यतम व आणखी एक वृत्ति सांगतात—

प्रतिग्रहं तपस्तेजोयशोनुदं मन्यमानः अन्याभ्यां एव जीवेत–पण प्रतिग्रह, तप, तेज व यश यांचा नाश करणारा आहे असें समजणाऱ्या ब्राह्मणानें अध्यापन व याजन या उपायांनींच आपलें जीवन संपादन करावें, तयोः वा दोषदृक् शिलैः–पण त्या दोन उपायांतहि कार्पण्यादि दोष पहाणाऱ्या ब्राह्मणानें शिलांनीं म्ह० शेताच्या स्वामीनें टाकलेल्या व शेतांत पडलेल्या कणसांवर उपजीविका करावी. ४१.

स्वधर्मावर निष्ठा ठेवणाऱ्या ब्राह्मणापाशीं तप-तेज-धैर्य-यश यांचा ठेवा असतो. पण त्यानें प्रतिग्रह घेतल्यास त्याच्या या सर्व श्रेष्ठ संपत्तीचा समूळ नाश होतो. ४१० जो ब्राह्मण स्वधर्मनिष्ठ असून प्रतिग्रह घेतो, तो साधारण प्रतीचा समजावा. हें ब्राह्मणाचें एक लक्षण झालें. ११ जो ब्राह्मण प्रतिग्रह स्वीकारीत नाहीं, त्यानें याजन व अध्यापन करून स्वधर्मानेंच द्रव्य मिळवावें व त्यावर निर्वाह करावा. १२ द्रव्याची आशा मनांत ठेवून यज्ञकर्म कोणाकडूनहि करवूं नये. किंवा शिष्याला वेदाक्षर पढवून त्याच्यापासून द्रव्याची इच्छा करूं नये. १३ वेदाक्षर शिकवून शिष्यापासूनहि दाक्षिणा न घेणारा जो विरक्त ब्राह्मण तोच खरोखर शुद्ध ब्राह्मण होय. १४ तो आपला निर्वाह कसा चालवितो तें सांगतों, ऐक. त्यानें 'शिल-'वृत्तीनें किंवा 'उंछ-' वृत्तीनें चारितार्थ करावा. आतां अगोदर शिलवृत्ति व उञ्छवृत्ति यांचें यथार्थ लक्षण सांगतों. १५ शेताची कापणी झाल्यावर, शेतांत पडलेलीं कणसें किंवा जे दाणे सांपडतील त्यांवर निर्वाह करणें याला शिलवृत्ति म्हणतात. आतां उञ्छवृत्ति ऐक. १६ धनी जवळ नसतांना बाजारांत सांडलेले धान्याचे कण वेंचून आणणें व त्यावर उपजीविका करणें, याला उञ्छवृत्ति म्हणतात. १७ ही ब्राह्मणाची अति पवित्र स्थिति आहे. आतां याचाहि प्रकार श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. ४१८.

—याप्रमाणें ब्राह्मणानें आपल्या उपजीविकेचे कष्ट सहन करावेत, असें आतां सांगतात—

ब्राह्मणस्य हि अयं देहः क्षुद्रकामाय नेष्यते–कारण ब्राह्मणांचा हा देह क्षुद्र विषयोपभोगासाठीं अभीष्ट नाहीं, तर, इह च कृच्छ्राय तपसे प्रेत्य च अनंतसुखाय–या लोकीं कृच्छ्र तपासाठीं व परलोकीं अनंत सुखासाठीं तो अभीष्ट आहे. ४२.

वर्णांमाजीं उत्तम वर्ण । त्या ब्राह्मणाचा देहो जाण । क्षुद्रकामार्थ निर्माण । देवें आपण नाहीं केला ॥ १९ ॥ पशुपक्ष्यादि योनींच्या ठायीं । कामावांचूनि आन नाहीं । तेंचि ब्राह्मणाचे देहीं । तैं विशेष कोण उत्तमत्वें ॥ ४२० ॥ ब्राह्मणाचे देहीं जाण । करावें स्वधर्म अनुष्ठान । माझेनि उद्देशें संपूर्ण । तपसाधन कृच्छ्रादिकें ॥ २१ ॥ मी हृदयीं धरोनि अनंत । जो पूर्णवैराग्ययुक्त । तपादि साधनीं सतत । सदा शिणत ब्राह्मण जे ॥ २२ ॥ त्यांसी देहपाताच्या अंतीं । माझ्या अनंत सुखाची प्राप्ती । तेथ स्वर्गसुखादि संपत्ती । मावळती तत्काळ ॥ २३ ॥ ज्या सुखाचे सुखस्थितीं । स्फुरेना संसारस्फूर्ती । जेथूनि नाहीं पुनरावृत्ती । ते सुखप्राप्ती त्या ब्राह्मणां ॥ २४ ॥ कृच्छ्रादि साधनयुक्तीं । ब्राह्मणा ब्रह्मसुखप्राप्ती । त्याचि सुखाची सुखसंपत्ती । शिलोंछवृत्ती साधकां ॥ २५ ॥

शिलोञ्छवृत्त्या परितुष्टचित्तो धर्मं महान्तं विरजं जुषाणः ।
मय्यर्पितात्मा गृह एव तिष्ठन्नातिप्रसक्तः समुपैति शान्तिम् ॥ ४३ ॥

शिल अथवा उंछवृत्ती । करूनि संतुष्ट चित्तवृत्ती । विषयवैराग्यें मत्प्राप्ती । पूजिती अतिथी मद्भावें ॥ २६ ॥ अतिथी आलिया देख । प्राणांतींही नव्हे पराङ्मुख । नाठवे निज तहानभूक । समयीं आवश्यक दे अन्न ॥ २७ ॥ तेथ अत्यादरेंसीं जाण । देऊनि अत्यंत सन्मान । यथानुशक्त्या देतां अन्न । मी जनार्दन संतुष्टें ॥ २८ ॥ सांडूनियां अभिमान । सर्व जीवांसी सर्वदा लीन । या नांव महद्धर्म जाण । शुद्ध लक्षण हें धर्माचें ॥ २९ ॥ ऐसें जें स्वधर्माचरण । तें कर्त्यासी अतिभूषण । ये धर्मीं न रिघे दूषण । अतिशुद्धाचरण या नांव ॥ ४३० ॥ मजमाजीं रंगली चित्तवृत्ती । यालागीं विसरला गृहासक्ती । त्यासी

सर्व वर्णांमध्यें उत्तम वर्ण असलेल्या ब्राह्मणांचा देह ईश्वरानें क्षुद्र काम पुरविण्यासाठीं निर्माण केलेला नाहीं. १९ पशु-पक्ष्यादि योनींत कामावांचून दुसरें कांहीं नसतें. ब्राह्मणजन्म घेऊनहि जर तेंच इच्छिलें, तर मग त्याच्या उत्तम वर्णाचा विशेष तो काय राहिला! ४२० ब्राह्मणदेह प्राप्त झाला असतां स्वधर्माचें अनुष्ठान करावें व मदर्पण बुद्धीनें कृच्छ्र-चांद्रायणादि तपें आचरावीं. २१ जे ब्राह्मण हृदयांत मज अनंताचें चिंतन करून, पूर्ण वैराग्यानें युक्त होऊन सतत तपादि साधनानें देह कष्टवितात, २२ ते मरणोत्तर माझ्या अनंत सुखाला प्राप्त होतात. त्या सुखापुढें स्वर्गसुखादिक सर्व ऐश्वर्य लोपून जातें. २३ त्या सुखाच्या निजानंदांत संसाराची स्फूर्तीहि होत नाहीं. जेथून पुनः जन्म होण्याची भीति नाहीं, असें शाश्वत सुख त्या ब्राह्मणांना प्राप्त होतें. २४ कृच्छ्र-चांद्रायण व्रतें करून ब्राह्मणांस ब्रह्मसुख लाभतें व शिलोञ्छवृत्तीनें रहाणाऱ्या साधकांसहि तेंच पद प्राप्त होतें. ४२५.

शिलोञ्छवृत्त्या परितुष्टचित्तः महान्तं विरजं धर्मं जुषाणः मयि अर्पितात्मा न अतिप्रसक्तः गृहे एव तिष्ठन् शांतिं समुपैति—बाजारादिकांत पडलेले धान्याचे कण वेंचून घेणें याला उञ्छवृत्ति म्हणतात, तिला शिलवृत्तीशी एक करून अशा शिलोञ्छवृत्तीनें ज्याचें चित्त संतुष्ट आहे, जो अतिथ्यादिलक्षण निर्दोष धर्म आचरीत आहे, ज्यानें आपलें चित्त माझ्या ठिकाणीं अर्पिलें आहे, जो विषयांमध्यें अत्यंत आसक्त नाहीं, असा माझा भक्त गृहस्थाश्रमांत रहात असतांना मोक्षाख्य शान्तीला प्राप्त होतो. ४३.

जे ब्राह्मण शील किंवा उञ्छवृत्तीनें निर्वाह करितात, चित्तवृत्ति संतुष्ट ठेवितात, विषयांविषयीं विरक्त होऊन माझ्या प्राप्तीसाठीं अतिथींना मद्रूप मानून पूजितात, २६ अतिथि आल्यास प्राण गेला तरी त्यास विमुख जाऊं देत नाहींत, प्रसंगीं स्वतःची तहान-भूक विसरून त्यांस अवश्य अन्न देतात, २७ असे जे अत्यंत आदरानें अतिथींचा सन्मान करून त्यांस यथाशक्ति अन्न देतात, त्यांच्यावर मी जनार्दन प्रसन्न होतों. २८ जो अभिमान सोडून सर्व प्राण्यांशीं सर्वदा नम्र असतो, त्या नम्रपणाला महद्धर्म म्हणतात. हें धर्माचें शुद्धलक्षण आहे. असें जें स्वधर्माचरण तें कर्त्याला अत्यंत भूषणावह आहे. या धर्मांत कोठेंहि दोष नाहीं. यालाच अतिशुद्ध आचरण म्हणतात. ४३० त्याची चित्तवृत्ति मजमध्यें रंगल्यामुळें तो गृहासक्ति विसरतो; त्यामुळें तो गृहस्थाश्रमांत असतांनाच

गृहाश्रमीं माझी प्राप्ती । सुखसंपत्ती निजबोधू ॥ ३१ ॥ निर्धनासी ऐशिया रीतीं । गृहाश्रमीं माझी प्राप्ती । आतां सधनाचे प्राप्तीची स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ३२ ॥ सधन होय जैं सज्ञान । तैं न करितां अतिसाधन । माझी प्राप्ति अतिसुगम जाण । ऐक लक्षण तयाचें ॥ ३३ ॥

समुद्धरन्ति ये विप्रं सीदन्तं मत्परायणम् । तानुद्धरिष्ये नचिरादापद्भ्यो नौरिवार्णवात् ॥ ४४ ॥

आधींच पूज्य ब्राह्मण । त्याहीवरी माझा भक्त जाण । माझे निजभजनें अतिसंपन्न । मद्भावें पूर्ण परिपक्व ॥ १३ ॥ मागणें नाहीं सर्वथा । हा नेम माझिया निजभक्ता । त्यासी पीडिजे क्षुधादि व्यथा । ते निवारिता जो होय ॥ ३५ ॥ देऊनि अन्न धन जीवन । वस्त्र आदिकरूनि लवण । ऐसें वेंचूनियां निजधन । भक्तसंरक्षण जो करी ॥ ३६ ॥ नाहीं देणें निर्भर्त्सितां । देऊनि आभार न ठेवी माथां । सन्मानें अतिनम्रता । जो मद्भक्तां संरक्षी ॥ ३७ ॥ जेवीं पोटांतले कळवळेंसीं । माता गोड तें दे बाळकासी । तेवीं सांडोनि निजस्वार्थासी । माझ्या भक्तांसी जो रक्षी ॥ ३८ ॥ तैं मागें सांडूनि निजभक्ता । त्यासी मी वाहीं आपुले माथां । मग वैकुंठाही वरुता । त्याहीपरता पाववीं ॥ ३९ ॥ ज्यासी म्यां वाहिलें निजमाथां । त्यासी कोण्या अर्थाची दुर्लभता । जो संरक्षी माझ्या निजभक्तां । त्यासी उद्धरिता मी उद्धवा ॥ ४४० ॥ माझे भक्तांचीं सांकडीं । जो कोणी निजांगें दवडी । त्यासी भवार्णवपरथडी । तत्काळ रोकडी मी पाववीं ॥ ४१ ॥ जेवीं कां जळसागरीं । नाव धनवंतातें तारी । तेवीं भक्तरक्षका संसारीं । मी उद्धरीं उद्धवा ॥ ४२ ॥ यापरी धनवंत जन । जो करी भक्तसंरक्षण । देवकीवसुदेवांची

त्याला माझी प्राप्ति होते व तो आत्मबोधानें संपन्न होतो. ३१ निर्धन ब्राह्मणाला अशाप्रकारें गृहस्थाश्रमांतच माझी प्राप्ति होते. आतां धनिकाच्या आत्मप्राप्तीचा प्रकार तुला सांगतों, तो ऐक. ३२ धनवान् ब्राह्मण जर सज्ञान असेल तर त्यास विशेष साधनांवांचूनच सहज माझी प्राप्ति होते. त्याचें लक्षण ऐक. ४३३.

—याप्रमाणें निर्धन गृहस्थाचे धर्म सांगून सधन गृहस्थाचे धर्म पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

ये मत्परायणं सीदन्तं विप्रं समुद्धरन्ति—जे मत्परायण झालेल्या पण दारिद्र्यानें पीडलेल्या ब्राह्मणादिकांचा त्या दारिद्र्यांतून उद्धार करितात,—तान् अर्णवात् नौः इव आपद्भ्यः न चिरात् उद्धरिष्ये—त्यांना नौका जशी समुद्रांतून तारिते, त्याप्रमाणें आपत्तींतून मी सत्वर उद्धरितो. [जे समर्थ गृहस्थ माझ्या दरिद्री भक्तांचा दारिद्र्यांतून उद्धार करितात, त्यांचा मी आपत्तींतून सत्वर उद्धार करितों. समुद्रांतून नौका जशी तारिते त्याप्रमाणें मी त्यांना तारितों.] ४४.

आधींच ब्राह्मण पूज्य; त्यांत माझा भक्त आणि तोहि माझ्या भक्तीनें अति संपन्न व मद्भावानें परिपूर्ण झालेला, ३४ कोणापाशीं कांहीं याचना करावयाची नाहीं, असा ज्या माझ्या भक्ताचा नेम आहे, त्याच्या क्षुधादि कारणानें होणाऱ्या पीडेचें जो निवारण करितो; ३५ जो स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून अन्न-वस्त्र, द्रव्य, जल, मीठ इत्यादि देऊन माझ्या भक्ताचें रक्षण करितो; ३६ कधीं तिरस्कार, निंदा करून दान देत नाहीं किंवा आपल्या दानानें याचकाच्या माथ्यावर उपकाराचें ओझें करून ठेवीत नाहीं, तर अत्यंत आदरानें व नम्रतेनें जो माझ्या भक्तांचा सांभाळ करितो; ३७ माता जशी अंतःकरणांतील कळवळ्यानें मुलाला गोड पदार्थ देत असते, त्याप्रमाणें आपला स्वार्थ सोडून जो माझ्या भक्ताचें रक्षण करितो, ३८ त्याला मी मस्तकावर घेऊन नाचतों, माझ्या भक्तांसहि मागें सारून मी त्यास वैकुंठाच्याहि पलीकडे नेऊन पोंचवितों. ३९ ज्याला मी स्वतः मस्तकावर वहातों, त्याला कोणती गोष्ट दुर्लभ असणार ! हे उद्धवा ! जो माझ्या भक्ताचें संरक्षण करितो, त्याला मी उद्धारितों. ४४० भक्तांचें संकट जो स्वतः झीज सोसून दूर सारितो, त्याला मी या भवसागराच्या परतीरावर नेऊन पोंचवितों. ४१ उद्धवा ! नौका जशी धनवान् मनुष्याला समुद्रांतून तारून नेते, त्याप्रमाणें माझ्या भक्तांचें रक्षण करणाराचा मी संसारांतून उद्धार करितों. ४२ अशाप्रकारें जो श्रीमान् गृहस्थ माझ्या भक्तांचें संरक्षण करितो, त्यास मी उद्धारून

आण । त्याचें उद्धरण मी करीं ॥ ४३ ॥ सर्वांचें आपत्तीचें निवारण । राजेनि करावें आपण । त्या राजधर्माचें लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४४ ॥

सर्वाः समुद्धरेद्राजा पितेव व्यसनात्प्रजाः । आत्मानमात्मना धीरो यथा गजपतिर्गजान् ॥ ४५ ॥

सर्वांचें आपत्तींत रक्षण । रायें करावें आपण । दीन दुर्बळ ब्राह्मण । अयाचित जन शोधूनी ॥ ४५ ॥ व्यसन प्राप्त निजात्मजा । पिता संरक्षणीं निघे पैजा । तेवीं आपत्तीपासोनि प्रजा- । संरक्षणीं राजा सादर ॥ ४६ ॥ करूनि प्रजाचें संरक्षण । आपुल्या आपत्तीसी आपण । स्वयें करावें निवारण । हा स्वधर्म जाण रायाचा ॥ ४७ ॥ चिखलीं रुतल्या भद्रजाती । स्वयें निघे आत्मशक्तीं । गजी गजशावे नेणों किती । काढिती रुतीबाहेरीं ॥ ४८ ॥ तेवीं राजा जो भूपती । तेणें प्रजा रक्षाव्या आपत्तीं । आपुलेही आपत्तीची निवृत्ती । निजात्मशक्तीं जो करी ॥ ४९ ॥ ऐशिया स्वधर्मस्थिती । सादरें वर्ते जो भूपती । त्याच्या स्वधर्माची फलप्राप्ती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ४५० ॥

एवंविधो नरपतिर्विमानेनार्कवर्चसा । विधूयेहाशुभं कृत्स्नमिन्द्रेण सह मोदते ॥ ४६ ॥

यापरी जो कां नृपती । इहलोकींच्या राज्यप्राप्ती । अधर्म नाशोनि स्वधर्मस्थितीं । स्वर्गप्राप्ती तो पावे ॥ ५१ ॥ राज्याचे अंतीं नरक । ऐसें बोलती ज्ञाते लोक । ते निरयगती नाशोनि देख । स्वधर्में परलोक पावले ॥ ५२ ॥ ते स्वर्गलोकीं गा जाण । अर्कप्रकाशासम विमान । तेथ आरूढोनि आपण । इंद्रासमान सुख भोगिती ॥ ५३ ॥ गृहस्थाश्रम अतिविषम । तेथें आचरतां स्वधर्म । बोडवती जे कां दुर्गम । ते आपद्धर्म अवधारीं ॥ ५४ ॥

नेतों, हें मी वसुदेव-देवकीची शपथ घेऊन सांगतों. ४३ आतां सर्वांवरील संकटाचें निवारण करणें, या राजधर्माचें लक्षण श्रीकृष्ण सांगत आहे. ४४४.

—राजाला दिनांचा उद्धार करणें तर अवश्यच आहे असें सांगतात—

राजा पिता इव सर्वाः प्रजाः व्यसनात् समुद्धरेत्—राजानें पित्याप्रमाणें सर्व प्रजेचा संकटांतून उद्धार करावा. यथा गजपतिः गजान्—ज्याप्रमाणें गजेंद्र इतर गजांचा उद्धार करितो त्याप्रमाणें त्यानें प्रजेचा उद्धार करून, धीरः आत्मना आत्मानं उद्धरेत्—धीर पुरुषानें आपणच आपला उद्धार करावा. ४५.

राजानें आपण होऊन दीन-दुबळ्या ब्राह्मणांचा शोध करून त्या सर्वांचें संकटापासून रक्षण करावें. ४५ आपल्या पुत्रांवर कांहीं संकट आलें असतां पिता जसा त्याचें रक्षण करावयास दृढनिश्चयानें निघतो, त्याप्रमाणें आपल्या प्रजेचें संकटापासून रक्षण करावयास राजानें तत्पर असावें. ४६ प्रजेचें संरक्षण करून स्वतःवरील संकटाचें स्वतःच निवारण करावें, हा राजाचा स्वधर्म आहे. ४७ हत्ती चिखलांत रुतला तरी तो स्वतःच्या बळानेंच त्यांतून बाहेर निघतो व दुसऱ्याहि किती छाव्यांना व हत्तिणींना त्यांतून काढितो, याची गणतीच नसते. ४८ त्याप्रमाणें पृथिवीपति राजानें संकटांत पडलेल्या प्रजेचें संरक्षण करावें. व आपल्यावर कांहीं संकट आल्यास त्याचेंहि स्वतःच्या बाहुबलानें निवारण करावें. ४९ अशा स्वधर्मानें जो राजा वागतो, त्याला काय फलप्राप्ति होते, तें श्रीपति आतां सांगत आहे. ४५०.

एवंविधः नरपतिः इह कृतस्नं अशुभं विधूय—अशा प्रकारचा राजा याच लोकीं सर्व अशुभ कर्मांचा नाश करून, अर्कवर्चसा विमानेन इंद्रेणसह मोदते—सूर्यासारख्या तेजस्वी विमानांत बसून इंद्रासह आनंदित होतो. ४६.

अशा प्रकारें जो राजा इहलोकीं राज्य करीत असतां अधर्माचा नाश करून स्वधर्माप्रमाणें वागतो, त्याला स्वर्गप्राप्ति होते. ५१ राज्याच्या शेवटीं राजाला नरकप्राप्ति होते, असें ज्ञाते लोक बोलतात; पण अनेक राजे त्या नरकप्राप्तीचा नाश करून स्वधर्माचरणानें परलोकाला प्राप्त झाले आहेत. ५२ त्या स्वर्गलोकांत सूर्यप्रकाशाप्रमाणें तेजस्वी विमानांत बसून ते इंद्रासारखें सुख भोगितात. ५२ गृहस्थाश्रम फार कठिण आहे, त्यांत स्वधर्मानें वागत असतां, बिकट प्रसंग ओढवतात, त्यावेळचे आपद्धर्म आतां ऐक. ४५४.

सीदन् विप्रो वणिग्वृत्त्या पण्यैरेवापदं तरेत् । खड्गेन वापदाक्रान्तो न श्ववृत्त्या कथंचन ॥ ४७ ॥

स्वधर्में पीडितां ब्राह्मणासी । तेणें करावें वणिग्वृत्तीसी । कां दुरावले क्षात्रधर्मासीं । ते हिंसादि दोषीं अतिदुष्ट ॥ ५५ ॥ ब्राह्मणासी हिंसाकर्म । तो जाण पां परम अधर्म । लागल्या अनुपपत्ती परम दुर्गम । तैं क्षात्रधर्म करावा ॥ ५६ ॥ करितां वाणिज्यकर्मास । तिळ सर्षप कार्पास । का लवणादि रस तैजस । यांच्या महादोष विक्रयीं ॥ ५७ ॥ या सोडोनि सदोषां समस्तां । लागावें वाणिज्यपंथा । तांबूलपर्णें श्वेतवस्त्रता । हें विक्रितां निर्दुष्ट ॥ ५८ ॥ ऐशिया वाणिज्यस्थितीं । ज्याची टळेना अनुपपत्ती । तेणें खड्ग घेऊनि हातीं । क्षात्रवृत्ती करावी ॥ ५९ ॥ तेथें चोरावीं ना अंगें । रणीं न सरावें मागें । स्वामिकार्याचेनि योगें । देहत्यागें उठावें ॥४६०॥ ऐशिया शुद्ध क्षात्रवृत्तीं । ब्राह्मणें कंठावी अनुपपत्ती । परी नीच सेवा प्राणांतीं । श्ववृत्ती न करावी ॥ ६१ ॥ क्षत्रियांसी स्वधर्में अनुपपत्ती । लागल्या वर्तावें कोणे स्थिती । तें विशद करूनि श्रीपती । उद्धवाप्रती सांगत ॥ ६२ ॥

वैश्यवृत्त्या तु राजन्यो जीवेन्मृगययाऽऽपदि । चरेद्वा विप्ररूपेण न श्ववृत्त्या कथञ्चन ॥ ४८ ॥

क्षत्रियासी लागल्या अनुपपत्ती । पूर्वोक्त करावी वणिग्वृत्ती । कां पारधी करावी वनांतीं । तेणें अनुपपत्ती कंठावी ॥ ६३ ॥ येणेंही न कंठे अनुपपत्ती । तरी भीक मागावी विप्रगतीं । परी नीचसेवा

--आतां सर्वांची आपद्वृत्ति तीन श्लोकांनीं सांगतात--

सीदन् विप्रः वणिग्वृत्त्या पण्यैः एव आपदं तरेत्—स्वधर्मावर ज्याची उपजीविका चालत नाहीं, अशा ब्राह्मणानें शुद्ध पदार्थांच्या विक्रीनें त्या आपत्तींतून तरून जावें. **आपदाक्रान्तः खड्गेन वा**—आपत्तींत पडलेल्या त्यानें शस्त्रवृत्तीनें निर्वाह करावा. **श्ववृत्त्या कथंचन न**—श्ववृत्तीवर म्ह० नीच सेवेवर केव्हांहि उपजीविका करूं नये. [सुरा, लवण, दुधादि रस इत्यादि पदार्थांचा विक्रय ब्राह्मणानें केव्हांहि करूं नये, हें सांगण्यासाठीं श्लोकांत 'पण्यैः' असें म्हटलें आहे. गौतमस्मृतींत ब्राह्मणानें अत्यंत पापी वैश्यवृत्ति कधींहि स्वीकारूं नये, असें म्हणून गौतममुनि ब्राह्मणाला व्यापारापेक्षां क्षत्रियवृत्ति श्रेष्ठ आहे असें जरी मानितो, तरी ब्राह्मणाला हिंसेपेक्षां वैश्यवृत्तीच श्रेष्ठ आहे असें भगवानाचें मत आहे.] ४७.

ब्राह्मण स्वधर्मानें वागत असतां त्याला पीडा होऊं लागली, तर त्यानें वैश्यवृत्ति स्वीकारावी व व्यापार करावा. क्षत्रियधर्म हिंसादि क्रूर दोषांनीं युक्त असल्यामुळें त्यापासून दूर रहावें. ५५ कारण ब्राह्मणानें हिंसाकर्म करण्यांत अतिशय अधर्म आहे. परंतु जेव्हां अगदीं गत्यंतरच नसेल, तेव्हां त्यानें क्षत्रियवृत्ति स्वीकारावी. ५६ ब्राह्मणाला व्यापारांत तीळ, मोहरी, कापूस, मीठ, तेल, तूप या पदार्थांचा विक्रय करण्यांत फार मोठा दोष सांगितला आहे. ५७ हे सर्व सदोष पदार्थ खेरीज करून इतर पदार्थांचा व्यापार करावा. विड्याचीं पानें व पांढरें कापड विकण्यानेंहि ब्राह्मणाला दोष लागतो. ५८ अशाप्रकारें व्यापार करूनहि जर त्याची आपत्ति दूर होत नसली, तर मग त्यानें हातांत शस्त्र घेऊन क्षत्रियवृत्ति पत्करावी. ५९ मग त्यांत कधीं अंगचोरपणा करूं नये. स्वामिकार्यासाठीं प्राणावर उदार होऊन युद्ध करावें. ४६० अशा तऱ्हेची शुद्ध क्षत्रियवृत्ति ब्राह्मणानें विपत्कालीं स्वीकारावी. परंतु प्राण गेला तरी नीचांची सेवा करूं नये. ६१ आतां क्षत्रियावर आपत्ति आली असतां त्यानें कसें वागावें, हें श्रीकृष्ण उद्धवाला स्पष्ट करून सांगत आहे. ४६२.

राजन्यः तु आपदि वैश्यवृत्त्या मृगयया वा जीवेत्—क्षत्रियानें आपत्तींत वैश्यवृत्तीनें किंवा मृगया करून निर्वाह करावा. **विप्ररूपेण वा चरेत्**—किंवा ब्राह्मणाच्या अध्यापनादि उपायांनीं निर्वाह करावा. **श्ववृत्त्या न कथंचन**—परंतु नीचसेवेनें केव्हांहि उपजीविका करूं नये. ४८.

क्षत्रियावर संकट ओढवलें असतां त्यानें वर सांगितल्याप्रमाणें वैश्यवृत्ति पत्करून व्यापार करावा. किंवा वनांत जाऊन शिकार करावी व त्यावर चरितार्थ चालवावा. ६३ तेवढ्यानेंहि जर भागत नसेल तर ब्राह्मणांसारखी

प्राणांतीं । श्ववृत्ती न करावी ।। ६४ ।। स्वधर्मे वैश्यासी अनुपपत्ती । लागल्या वर्तावें कोणे स्थितीं । ते विवंचना उद्धवाप्रती । कृष्ण कृपामूर्ति सांगत ।। ६५ ।।

शूद्रवृत्तिं भजेद्वैश्यः शूद्रः कारुकटक्रियाम् । कृच्छ्रान्मुक्तो न गर्ह्येण वृत्तिं लिप्सेत कर्मणा ।। ४९ ।।

वैश्यासी लागल्या अनुपपत्ती । तेणें धरावी शूद्रवृत्ती । निष्कपट सेवा यथास्थिती । तीं वर्णांप्रती करावी ।। ६६ ।। वैश्य पीडिल्याही अनुपपत्ती । ब्राह्मण क्षत्रियांची वृत्ती । सर्वथा धरूं नये हातीं । जाण निश्चितीं उद्धवा ।। ६७ ।। वैश्यासी अतिअनुपपत्ती । मांडल्याही प्राणांतगती । तरी नीचसेवेची स्थिती । कोणेही अर्थी न करावी ।। ६८ ।। शूद्रासी लागलिया अनुपपत्ती । तेणेंही करावी श्ववृत्ती । धरूनि बुरुडक्रिया हातीं । जीविकावृत्ती करावी ।। ६९ ।। विकावीं दोर दावीं शिंकीं । पाटे वरवंटे टवळीं निकीं । कां काष्ठें वहावीं मस्तकीं । जीविकेविखीं उदरार्थ ।। ४७० ।। आपत्काळाचिये गती । चतुर्वर्णी जीविकास्थिती । म्यां सांगीतली तुजप्रती । परी सर्वथा स्ववृत्ती न सांडावी ।। ७१ ।। एवं क्रमिलिया अनुपपत्ती । म्यां सांगीतल्या ज्या जीविकावृत्ती । तेथें देखिलियाही लाभाप्राप्ती । सर्वथा हातीं न धराव्या ।। ७२ ।। आपत्काळीं आपद्वृत्ती । अनुतापें क्रमिल्याअंतीं । सांडूनियां स्वधर्मस्थितीं । यथानिगुतीं रहावें ।। ७३ ।। गृहस्थाचें विहित कर्म । त्यांतीलही आवश्यक धर्म । तेथील ब्रह्मार्पण वर्म । स्वयें पुरुषोत्तम सांगत ।। ७४ ।।

वेदाध्यायस्वधास्वाहाबल्यन्नाद्यैर्यथोदयम् । देवर्षिपितृभूतानि मद्रूपाण्यन्वहं यजेत् ।। ५० ।।

भिक्षा मागावी; पण प्राण गेला तरी कुत्र्यासारखी नीचांची सेवा करूं नये. ६४ आतां वैश्यावर स्वधर्मानें वागत असतां आपत्ति आली तर त्यानें कसें वागावें, त्याचाच विचार दयासागर श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. ४६५.

वैश्यः शूद्रवृत्तिं भजेत्—आपत्कालीं वैश्यानें शूद्रवृत्तीवर उपजीविका करावी. शूद्रः **कारुकटक्रियाम्—शूद्रानें** बुरुडादिक प्रतिलोम संकर जातीच्या वृत्तीचा स्वीकार करावा. म्ह० चटया, तट्टे, टोपल्या इत्यादि विणून त्यावर उपजीविका करावी, **कृच्छ्रात् मुक्तः गर्ह्येण कर्मणा वृत्तिं न लिप्सेत**—पण आपत्तींतून मुक्त झालेल्या ब्राह्मणादिकांनीं निंद्य कर्मानीं म्ह० पूर्वोक्त अनुकल्पानें आपली जीविका संपादन करूं नये. ४९.

वैश्यावर आपत्ति आली असतां त्यानें सेवाधर्म पत्करावा व ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या तीन्ही वर्णांची निष्कपट सेवा करावी. ६६ परंतु त्यानें कसल्याहि संकटप्रसंगीं ब्राह्मण-क्षत्रियांची वृत्ति स्वीकारूं नये. ६७ त्याचप्रमाणें हे उद्धवा ! वैश्यानें प्राणांतींहि नीचसेवा करूं नये. ६७ शूद्रावर संकटप्रसंग आल्यास त्यानें बुरुडाचें काम करून उदरनिर्वाह करावा. ६९ त्यानें दोर, दावीं, शिंकीं विणून विकावीं; पाटे, वरवंटे, दिवठणी इत्यादि पाथरवटाचा धंदा करावा; किंवा लांकडाच्या मोळ्या डोकीवर घेऊन विकाव्या व त्यावर चरितार्थ चालवावा. ४७० आपत्कालीं चारी वर्णांचे उपजीविकेचे प्रकार मीं तुला सांगितले. त्यांनीं आपला स्वधर्म सर्वथा सोडूं नये. ७१ अशा प्रकारें संकटाचे दिवस निघून गेल्यानंतर या सर्व वर्णांनीं पुनः पूर्ववत् आपापल्या वर्णाचें काम स्वीकारावें. मीं सांगितलेल्या वृत्तीवर जरी अधिक द्रव्यप्राप्ति होत असली, तरी त्या वृत्तीवर आपत्काल संपल्यावर केव्हांहि लोभानें उपजीविका करूं नये. ७२ आपत्तीमुळें स्वीकारलेला परधर्म निरुपायानें आचरावा; पण आपत्ति दूर होतांच पूर्ववत् स्वधर्माप्रमाणेंच चालावें. ७३ आतां श्रीकृष्ण गृहस्थाचें विहित कर्म त्यांचें आवश्यक धर्म व ब्रह्मार्पणाचें वर्म सांगत आहे. ४७४.

—याप्रमाणें वृत्तीच्या व्यवस्था सांगून पुनरपि गृहस्थाचें आवश्यक पंचयज्ञ सांगतात—

वेदाध्याय-स्वधा-स्वाहा-बलि-अन्नाद्यैः यथोदयं मद्रूपाणी देवर्षि-पितृ-भूतानि अन्वहं यजेत्—वेदाध्ययन, स्वधाकार, स्वाहाकार, बलिहरण व अन्नोदकादि यांच्या योगानें आपल्या शक्तीप्रमाणें मद्रूप असलेल्या देव-ऋषि-पितर व भूतें यांचें प्रत्यहीं यजन करावें. [ब्रह्मयज्ञानें ऋषींचें, पिंड व तर्पण यांच्या योगानें पितरांचें, स्वाहाकारानें देवांचें, बलिहरणानें भूतांचें, अन्नोदकांनीं मनुष्यांचें यथाशक्ति पूजन करावें. त्या सर्वांमध्यें ईश्वर दृष्टि ठेवावी, असें 'मद्रूपाणि' या पदानें सुचविलें आहे.] ५०.

स्वाध्यायीं वेदाध्ययन । वेदप्रोक्त ब्रह्मयज्ञ । स्वधा म्हणजे पितृतर्पण । स्वाहा जाण देवतादिकां ॥ ७५ ॥ बळिदानादिकीं जाण । तृप्त होय भूतगण । मनुष्यांसी अन्नोदकदान । हे पंचयज्ञ जाण नित्यकर्म ॥ ७६ ॥ हेंचि ब्रह्मकर्म जाण । जेणें होय ब्रह्मार्पण । त्या अर्पणाची निजखूण । तुज मी संपूर्ण सांगेन ॥ ७७ ॥ मी एक कर्मकर्ता येथें । हें सांडोनियां निजचित्तें । भगवद्रूप भावितां भूतें । ब्रह्मार्पण तेथें होय कर्म ॥ ७८ ॥ सांडितां कर्माभिमान । कर्म होय ब्रह्मार्पण । हें संकल्पेंवीण जाण । अर्पिती खूण उद्धवा ॥ ७९ ॥ माझेनि कर्म हें जाहलें । तें म्यां कृष्णार्पण केलें । येणें संकल्पाचेनि बोलें । अंगा आलें कर्तृत्व ॥ ४८० ॥ जो मी म्हणे कर्मकर्ता । तो होय कर्मफळभोक्ता । मुख्य बाधक ते अहंता । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ८१ ॥ ज्याच्या ठायीं अहंममता । त्याचे अंगीं निजबद्धता । जो निरभिमानी निर्ममता । नित्यमुक्तता त्यापाशीं ॥ ८२ ॥ यालागीं सांडूनि अभिमान । पंचमहायज्ञाचरण । गृहस्थें प्रत्यहीं करितां जाण । कर्म ब्रह्मार्पण सहजेंचि ॥ ८३ ॥ ऐसेनि अर्पे भगवंता । ते गृहस्थाची नित्यकर्मता । तुज म्यां सांगीतली तत्त्वतां । यज्ञादि कथा ते ऐक ॥ ८४ ॥ यज्ञ करावया अधिकारवंत । गांठी शुद्ध बारा सहस्र अर्थ । ज्यासी वेदीं ज्ञान यज्ञांत । तोचि येथ अधिकारी ॥ ८५ ॥

यदृच्छयोपपन्नेन शुक्लेनोपार्जितेन वा । धनेनाऽपीडयन् भृत्यान्न्यायेनैवाऽऽहरेत् क्रतून् ॥ ५१ ॥

उदीमव्यापारें जोडिलें । कां जें असत्यें गृहा आलें । नातरी परपीडा प्राप्त जाहलें । कां अडवूनी घेतलें जें द्रव्य ॥ ८६ ॥ द्रव्य देतां चरफडी । ते शिष्या घालून सांकडीं । असा अर्थ जोडिला जोडी । ते अपरवडी द्रव्याची ॥ ८७ ॥ जें यदृच्छा सहज आलें । कां जें शुक्लवृत्तीं जोडिलें । जें सुखोपायें हातां

स्वाध्याय म्ह० वेदाध्ययन, वेदोक्त ब्रह्मयज्ञ; स्वधा म्ह० पितृतर्पण व स्वाहा म्हणजे देवतादिकांना आहुति; बलिदानादिकांनीं भूतगणांची तृप्ति, अन्नोदकांनीं मनुष्यांचें पोषण, हे पंचयज्ञ गृहस्थाचें नित्यकर्म आहे. ७६ ज्यानें ब्रह्मार्पण होतें तें ब्रह्मकर्म हेंच आहे. त्या अर्पणाची खूण मी तुला सविस्तर सांगतों, ऐक. ७७ 'या कर्माचा मीच एक कर्ता आहें' असा चित्तांतील अभिमान सोडून सर्व भूतांमध्यें भगवद्भावना ठेविली म्हणजे तें कर्म ब्रह्मार्पण होतें. ७८ कर्मांचा अभिमान सोडिला कीं, संकल्प केल्यावांचून तें कर्म ब्रह्मार्पण होतें. उद्धवा ! हीच मदर्पण करण्याची खूण आहे. ७९ 'हें कर्म मीं केलें, तें कर्म मीं कृष्णार्पण केलें.' अशा संकल्पानेंच अंगीं कर्तृत्व येतें. ४८० 'मी कर्मकर्ता' असें जो म्हणतो, तोच कर्मफलभोक्ता होतो. उद्धवा ! यांत अभिमानच मुख्य बाधक आहे. ८१ ज्याच्या अंगीं अहं-ममता असते, तो स्वतःलाच बद्ध करितो व जो निरभिमानी व ममताशून्य असतो त्याच्यापाशीं मुक्ति नित्य रहाते. ८२ यासाठीं गृहस्थानें अभिमान सोडून पंचमहायज्ञ नित्य आचरिले असतां त्याचें सर्व कर्म सहजच ब्रह्मार्पण होतें. ८३ याप्रमाणें गृहस्थाचें नित्यकर्म भगवानाला कसें अर्पण होतें, हें मीं तुला सविस्तर सांगितलें. उद्धवा ! आतां यज्ञादिकांची कथा ऐक. ८४ ज्याच्यापाशीं निदान बारा हजार रुपये असतील तोच यज्ञाचा खरा अधिकारी होय. किंवा ज्याला वेदार्थज्ञान असतें त्याला यज्ञ करण्याचा अधिकार आहे. ४८५.

——याप्रमाणें आवश्यक धर्म सांगून शक्त्यानुसार धर्म सांगतात——

यदृच्छयोपपन्नेन शुक्लेन उपार्जितेन वा धनेन भृत्यान् अपीडयन् न्यायेन एव क्रतून् आहरेत्—यदृच्छेनें म्ह० उद्यम व याचना यांवांचून प्राप्त झालेल्या किंवा आपल्या वृत्तीनें मिळालेल्या धनानें पोषण करण्यास योग्य असलेल्या कुटुंबांतील लोकांना पीडा न देतां यथाशास्त्र यज्ञ करावेत. ५१.

ब्राह्मणानें व्यापार-धंदा करून संपादिलेलें किंवा अमार्गानें हातीं आलेलें किंवा दुसऱ्याला पीडा देऊन किंवा अडवून मिळविलेलें, ८६ किंवा शिष्याला संकटांत घालून त्यानें चडफडून दिलेलें, अशा प्रकारें संपादिलेलें जें द्रव्य तें यज्ञाला अयोग्य होय. ८७ जें धन सहज घरीं चालून आलेलें, किंवा सरळ न्यायानें मिळविलेलें, किंवा

आलें । तें द्रव्य विहिलें यज्ञार्थ ॥ ८८ ॥ पाडूनि कुटुंबासी लंघन । सर्व द्रव्य वेंचूनि जाण । करूं नये यज्ञाचरण । अधर्मपण तेणेंही ॥ ८९ ॥ कां जीविका जीवनवृत्ती । याग करूं नये निश्चितीं । लौकिकीं मिरवावया स्फीती । याग करिती ते मंद ॥ ४९० ॥ न धरितां कर्माभिमान । शुद्ध द्रव्य जोडिल्या जाण । करावें यज्ञाचरण । हें स्वधर्मलक्षण गृहस्थाचें ॥ ९० ॥ सांडूनियां विषयलिप्सा चित्तीं । त्यजूनि गृहाची गृहासक्ती । गृहस्थें धरावी निवृत्ती । हें स्वयें श्रीपती सांगत ॥ ९२ ॥

कुटुम्बेषु न सज्जेत न प्रमाद्येत्कुटुम्ब्यपि । विपश्चिन्नश्वरं पश्येददृष्टमपि दृष्टवत् ॥ ५२ ॥

जरी जाहली स्त्रीपुत्रगृहस्थिती । परी न धरावी त्यांची आसक्ती । सावध राखावी चित्तवृत्ती । परमात्मयुक्तिसाधनें ॥ ९३ ॥ सांडूनि कल्पना प्रमाद संग । चुकवूनि प्रमदांचें अंग । ईश्वरनिष्ठा अतिचांग । वृत्ति अभंग राखावी ॥ ९४ ॥ गृहस्थ कुटुंबविषयासक्ती । पाहतां विवेकाचिये स्थितीं । परिपाकें नश्वरप्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९५ ॥ जैसा इहलोकींचा परिपाकू । तैसाचि जाण स्वर्गलोकू । उभयतां नश्वर देखू । केवळ मायिकू मिथ्यात्वें ॥ ९६ ॥ स्त्री पुत्र आणि धन । हें नश्वर जैसें कां स्वप्न । येचिविषयीं निरूपण । स्वयें नारायण सांगत ॥ ९७ ॥

पुत्रदाराप्तबन्धूनां सङ्गमः पान्थसङ्गमः । अनुदेहं वियन्त्येते स्वप्नो निद्रानुगो यथा ॥ ५३ ॥

चांगल्या उपायानें प्राप्त झालेलें असतें, तेंच यज्ञाच्या उपयोगीं आहे. ८८ परंतु कुटुंबांतील माणसांची अन्नावांचून उपासमार करून सर्व धन यज्ञांत खर्च करूं नये. तो अधर्म आहे. ८९ किंवा आपला चरितार्थ चालविण्यासाठीं यज्ञ करूं नये. लोकांत मोठेपणा मिरविण्यासाठीं दंभानें मंदमति लोक यज्ञ करितात. ४९० कर्माचा अभिमान न धरितां पवित्र मार्गानें द्रव्य मिळवून यज्ञ करावा. हा गृहस्थाचा स्वधर्म आहे. ९१ मनांतील विषयेच्छा टाकून, घरावरील आसक्ति सोडून गृहस्थानें निवृत्त व्हावें, असें श्रीपति सांगत आहे. ४९२.

—गृहस्थाचीहि निवृत्तिनिष्ठा पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

कुटुम्बेषु न सज्जेत–कुटुंबामध्यें कधींहि आसक्त होऊं नये. कुटुम्बी अपि न प्रमाद्येत्–कुटुंबी पुरुषानेंहि ईश्वरनिष्ठेमध्यें अनवधान करूं नये. (तर त्यानें सुद्धां ईश्वरनिष्ठेमध्यें सावधान असावें. अहोपण, दृष्टफल व अदृष्टफल देणाऱ्या कर्मांमध्यें आसक्त असलेल्या पुरुषाचा अप्रमाद कसा संभवतो ! ‘ विचारानें त्याचेंहि अवधान ईश्वरनिष्ठेमध्यें राहूं शकतें ’ असें उत्तर–) विपश्चित् दृष्टवत् अदृष्टं अपि नश्वरं पश्येत्–विद्वानानें दृष्टफलाप्रमाणें अदृष्टफलहि क्षणभंगुर आहे असें पहावें. ५२.

स्त्री पुत्रादिकांच्या योगानें जरी घरांत कुटुंब वाढलें तरी त्यांच्यावर आसक्ति ठेवूं नये. परमात्मयुक्तिसाधनानें चित्तवृत्ति सावध ठेवावी. ९३ कल्पना, दोष, आसक्ति व स्त्रीसंग हीं सर्व सोडून ईश्वरावर परम निष्ठा ठेवून वृत्ति अभंग राखावी. ९४ उद्धवा ! गृहस्थाच्या कुटुंबांतील विषयांचा विचार केला असतां खरोखर परिणामीं ते सर्व अशाश्वतच ठरतात. ९५ इहलोकीं जें फल मिळतें तेंच परलोकींहि; दोन्हीं नश्वरच, केवळ मायिक, मिथ्या आहेत, हें जाणून मद्रूपीं आसक्त व्हावें. ९६ स्त्री-पुत्र-धन हीं स्वप्नासारखीं नश्वर आहेत. याचेंच आतां श्रीकृष्ण निरूपण करीत आहे. ४९७.

—त्यांतल्या त्यांत दृष्टफलकर्मांतील आसक्ति अधिक असल्यामुळें दृष्टफलांची नश्वरता वर्णितात—

पुत्र-दारा-आप्तबंधूनां सङ्गमः पान्थसङ्गमः–पुत्र, स्त्री, आप्त व बंधु यांचा समागम पांथस्थांच्या पाणपोयींतील किंवा धर्मशाळेंतील समागमासारखा आहे. (त्याविषयीं हेतु–) यथा निद्रानुगः स्वप्नः तथा एते अनुदेहं वियन्ति–ज्याप्रमाणें निद्रेच्या अधीन असलेलें स्वप्न निद्रा निवृत्त झाली असतां निवृत्त होतें, त्याप्रमाणें प्रत्येक देहामध्यें हे पुत्रादि विनाश पावतात. ५३.

जैसे वृक्षातळीं पथिक । एकत्र मीनले क्षण एक । तैसे पुत्रदाराप्तलोक । सर्वही क्षणिक संगम ॥ ९८ ॥ उभय नदीप्रवाहेंसीं । काष्ठें मीनलीं संगमीं जैसीं । सोयरीं सर्व जाण तैसीं । हेलाव्यासरसीं फांकती ॥ ९९ ॥ जे योनीं जीव देहधारी । तेथें तेचि योनीचीं सोयरीं । ऐशीं अनंत जन्में संसारीं । तैं अमित सोयरीं जीवाचीं ॥ ५०० ॥ परी ये योनीचीं योन्यंतरीं । येरयेरां नोळखती सोयरीं । जैसी ये स्वप्नींची पदार्थपरी । स्वप्नांतरीं रिघेना ॥ १ ॥ यापरी हे समस्त । स्त्री पुत्र बंधु आप्त । मायामय कल्पित । जाणे निश्चित तो धन्य ॥ २ ॥

इत्थं परिमृशन्मुक्तो गृहेष्वतिथिवद्वसन् । न गृहैरनुबध्येत निर्ममो निरहङ्कृतः ॥ ५४ ॥

ऐसेनि विवेकें विवेकवंता । कदा न बाधी मोहममता । अतिथीच्या परी सर्वथा । अनासक्त गृहवासीं ॥ ३ ॥ एवं निर्मानमोहममता । जो उदासीन गृहावस्था । ज्यासी निष्कामनिर्लोभता । त्यासी अहंता बाधीना ॥ ४ ॥ निर्ममता निरभिमान । व्हावया मुख्य गुरुभजन । तेणें वैराग्यविवेकज्ञान । सहजचि जाण गुरुभक्तां ॥ ५ ॥ ऐशिया वैराग्यविवेकस्थिती । गृहीं वसतां गृहस्थाप्रती । प्राप्त होय निजमुक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६ ॥ आतां आश्रमांतराची गती । स्वयें सांगताहे लक्ष्मीपती । भक्ती विरक्ति निजशांती । आश्रमस्थितिविभाग ॥ ७ ॥

कर्मभिर्गृहमेधीयैरिष्ट्वा मामेव भक्तिमान् । तिष्ठेद्वनं वोपविशेत्प्रजावान् वा परिव्रजेत ॥ ५५ ॥

ज्याप्रमाणें अनेक प्रवासी (एखाद्या वृक्षाखालीं) विश्रांति घेण्यासाठीं क्षणभर एकत्र जमतात, त्याप्रमाणें स्त्री-पुत्र, आप्त-इष्ट या सर्वांचा सहवास क्षणिकच आहे. ९८ किंवा दोन नद्यांच्या प्रवाहांतून वहात आलेले काष्ठादि-पदार्थ जसे संगमावर एकत्र होतात व एका लाटेसरसे दूर जातात, त्याचप्रमाणें या संसारांत सोयरे-धायरे एका ठिकाणीं जमतात व नाहींसे होतात. ९९ ज्या योनींत जीव जन्म घेतो, त्याच योनींतील अनेक आप्त तो जोडतो. याप्रमाणें जीवानें असंख्य जन्मांत अगणित आप्तांचा सहवास केला आहे. ५०० परंतु प्रत्येक जन्मांत मागच्या जन्मींच्या देहाची कांहीं परस्परांस ओळख रहात नाहीं. एका स्वप्नांत पाहिलेला पदार्थ जसा दुसऱ्या स्वप्नांत दृष्टीस पडत नाहीं, त्याप्रमाणें एका जन्मांत जोडलेले आप्त-इष्ट दुसऱ्या जन्मांत ओळखतां येत नाहींत. याप्रमाणें हे सर्व स्त्री-पुत्र-बंधु-आप्त मायेनें कल्पिलेले आहेत, असें जो जाणतो, तोच खरोखर धन्य होय. ५०२.

इत्थं परिमृशन् मुक्तः गृहेषु अतिथिवत् वसन् निर्ममः निरहङ्कृतः गृहैः न अनुबध्येत—याप्रमाणें विचार करणारा, मुक्त, गृहामध्यें अतिथीप्रमाणें रहाणारा, ममताशून्य, अहंकाररहित पुरुष गृहांनीं बद्ध केला जात नाहीं. ५४.

असा विचार करणारास मोह-ममता कधींहि बाधत नाहीं. अतिथि होऊन आलेला मनुष्य जसा जेवतो, रहातो, पण त्या घरावर आसक्ति ठेवीत नाहीं, त्याप्रमाणें गृहस्थानें घरांत राहून गृहासक्ति टाकावी. ३ असा जो गृहस्थ मान, मोह, ममता याविषयीं उदासीन असतो, जो निष्काम व निर्लोभ असतो त्याला अहंकार बाधत नाहीं. ४ ममताशून्य व अभिमानरहित होण्यास ' गुरुभजन ' हाच मुख्य उपाय आहे. त्यायोगें गुरुभक्ताला वैराग्य-विवेकाचें ज्ञान सहजच प्राप्त होतें. ५ उद्धवा ! अशा वैराग्य-विवेकानें युक्त असलेल्या गृहस्थाला घरीं बसूनच मुक्ति प्राप्त होते. ६ आतां दुसऱ्या आश्रमांतील आचार, विचार, भक्ति, विरक्ति व शांति आश्रमविभागपूर्वक श्रीहरि सांगत आहे. ५०७.

—आतां या गृहस्थाचाहि आश्रमविकल्प सांगतात—

भक्तिमान् गृहमेधीयैः कर्मभिः माम् एव इष्ट्वा तिष्ठेत्—याप्रमाणें भक्तिमान गृहस्थानें गृहस्थाश्रमांतील कर्मांनी माझेंच पूजन करून गृहस्थाश्रमांतच रहावें. **वनं वा उपविशेत्**—किंवा वनामध्यें वास करावा. **प्रजावान् वा परिव्रजेत्**—किंवा प्रजावान् असल्यास त्यानें संन्यास करावा. ५५.

गृहीं असोनि आश्रमस्थितीं । ज्यासी मुख्यत्वें भगवद्भक्ती । त्यासी आश्रमांतरप्रप्ती । न लगे निश्चितीं मद्भक्तां ॥ ८ ॥ तेंचि माझें कैसें भजन । स्वाहा स्वधा यज्ञदान । जें जें येथें अर्पे जाण । तें तें मदर्पण निश्चित ॥ ९ ॥ काळीं अकाळीं सर्वथा । भजनीं पालट नाहीं चित्ता । ऐशी ज्या गृहस्थाची अवस्था । तेणें असावें सर्वथा गृहाश्रमीं ॥ ५१० ॥ जया कर्मांची अतिआसक्ती । आणि विषयांची अनासक्ती । नाहीं ज्ञानयुक्त निजशांती । त्यासी वानप्रस्थीं अधिकारू ॥ ११ ॥ ज्यासी विरक्ति शांति ज्ञानस्थिती । करतळामळकहस्तप्राप्ती । संन्यासग्रहणस्थिती । जाण निश्चितीं अधिकारी ॥ १२ ॥ जाहलिया पुत्रसंतती । भार्या देऊनि पुत्राच्या हातीं । संन्यास करावा निश्चितीं । श्रुती ये अर्थीं संमत ॥ १३ ॥ ज्यासी गृहस्थाश्रमीं नावडे भक्ती । अपार पोरांची संतती । जाहल्याही न धरी विरक्ती । जो वानप्रस्थीं रिघेना ॥ १४ ॥ ज्याचा फिटे विषयभ्रम । जो संन्यासी नव्हे निष्कर्म । त्याचें जाण निंद्य कर्म । स्वयें पुरुषोत्तम सांगत ॥ १५ ॥

यत्स्वासक्तमतिर्गेहे पुत्रवित्तैषणातुरः । स्त्रैणः कृपणधीर्मूढो ममाहमिति बध्यते ॥ ५६ ॥

जो गृहासक्तीं सुभट्ट । तो ईषणात्रयीं वरिष्ठ । जो विषयांलागीं लंपट्ट । अतिलोभिष्ठ धनेच्छा ॥ १६ ॥ जो विकारांचा अंकिला । जो स्त्रियेसीं जीवें विकिला । जो अहंममतेचा पोसणा जाहला । तो मूढतेच्या पडिला महादुर्गीं ॥ १७ ॥ जो आशेचिया वणवणा । सर्वांगांचा वोळगणा । यालागीं बद्धतेचा जाणा । जाहला आंदणा जीवेंभावें ॥ १८ ॥ तेचि बद्धतेची गती । त्याची मूर्खांची वदंती । स्वयें सांगताहे श्रीपती । उद्धवाप्रती उद्देशें ॥ १९ ॥

जो गृहस्थ घरीं राहून आश्रमधर्म पाळतो व जो मुख्यत्वेंकरून माझी भक्ति करितो, त्याला दुसऱ्या आश्रमांचें कांहीं कारणच उरत नाहीं. ८ तें माझें भजन कसें म्हणशील, तर ऐक. स्वाहा, स्वधा, यज्ञदान इत्यादि जें कांहीं तो करितो तें खरोखर मदर्पणच होतें. ९ त्याच्या चित्तांत वेळीं, अवेळीं माझ्या भजनांत अंतर नसतें. अशी ज्या गृहस्थाची स्थिति असते, त्यानें सर्वथा गृहस्थाश्रमीच असावें. १० ज्याला कर्मांची अत्यंत आसक्ति असते, पण विषयांची आवड नसते आणि मनाला ज्ञानयुक्त शांति नसते, त्याला वानप्रस्थाश्रमाचा अधिकार आहे. ११ त्याला विरक्ति, शांति व ज्ञान तळहातावरील आवळ्यासारखीं सुलभ आहेत, तो संन्यासग्रहणाचा अधिकारी आहे. १२ पुत्रसंतति झाल्यावर पत्नीला पुत्राच्या स्वाधीन करून गृहस्थानें संन्यास घ्यावा. याअर्थीं श्रुतीचें प्रमाण आहे. १३ गृहस्थाश्रमांत राहून ज्याला भक्ति आवडत नाहीं, असंख्य पोरांचें लेंढार पाठीस लागलें तरी ज्याला विरक्ति येत नाहीं, जो वानप्रस्थाश्रमहि स्वीकारीत नाहीं, १४ ज्याचा विषयभ्रम दूर होत नाहीं, जो निष्काम संन्यासी होत नाहीं, त्याच्या निंद्य कर्मांचें वर्णन श्रीकृष्ण करीत आहे. ५१५.

—गृहादिकांवरील आसक्तींतील दोष पुढील श्लोकांनीं सांगतात—

यः तु गेहे आसक्तमतिः पुत्रवित्तैषणातुरः स्त्रैणः कृपणधीः मूढः मम अहं इति बध्यते—पण जो गृहस्थ गृहामध्यें आसक्तचित्त असतो, पुत्र व धन यांच्या इच्छेनें आतुर असतो, स्त्रैण म्ह० स्त्रीलंपट असतो व ज्याची बुद्धि कृपण असते, तो मूढ 'हा मी, हें माझें' असें म्हणून बद्ध होतो. ५६.

ज्याची गृहासक्ति अनिवार आहे, ज्याचें एषणात्रय म्ह० पुत्र, द्रव्य व परलोक यांची इच्छा प्रबल आहे, जो विषयलंपट व द्रव्याचा पराकाष्ठेचा लोभी, १६ जो विकारांचा दास, स्त्रीला तर जीवा-भावानें वाहून घेतलेला, अहं-ममतेचा आश्रित असा जो पुरुष असतो, तो अज्ञानरूपी घोर किल्ल्यांत खितपत पडतो. १७ जो आशेच्या भ्रमानें इंद्रियांचा किंकर होतो, तो बंधनाचा आंदण दिलेला दास बनतो. १८ त्याच्या बंधाचा प्रकार व त्या मूर्खांची वटवट उद्धवाला आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ५१९.

अहो मे पितरौ वृद्धौ भार्या बालात्मजात्मजाः । अनाथा मामृते दीनाः कथं जीवन्ति दुःखिताः ॥ ५७ ॥

माता पिता वृद्ध केवळें । भार्या धाकुटीं तान्हीं बाळें । मज होतां यांवेगळें । तेणेंचि काळें मरतील ॥५२०॥ ऐशिया नानावस्था । आपुल्या मरणाहीपरता । वाहे कुटुंबाची चिंता । ऐक आतां सांगेन ॥ २१ ॥ एखादेनि अकाळकाळें । मजचि जैं मरण आलें । तैं काय करितील स्त्रिया बाळें । आंसवीं डोळे लोटती ॥ २२ ॥ मातापित्यांची पडो वाट । स्त्रियेसी होईल हृदयस्फोट । बाळांचा शोषेल कंठ । पिटी ललाट तेणें दुःखें ॥२३॥ मज निमालिया अंतीं । हीं अतिदुःखी कैशीं जीती ।ऐशी जीतांची करी खंती । मूढमति यालागीं ॥ २४ ॥ गाढ मूढतेचें भरितें । अपार उथळलें जेथें । विवेकाचें तारूं तेथें । विपरीतार्थें बुडालें ॥ २५ ॥

एवं गृहाशयाक्षिप्तहृदयो मूढधीरयम् । अतृप्तस्ताननुध्यायन् मृतोऽन्धं विशते तमः ॥ ५८ ॥

यापरी गृहासक्ती आसक्त । सदा विषयीं अतृप्तचित्त । अखंड स्त्रीपुत्रांतें ध्यात । हृदयाआंत मोहित ॥ २६ ॥ त्या मोहाचे मोहविधी । मूढ जाहली हृदयबुद्धी । ऐसा निमाला जो त्रिशुद्धी तो । प्रवेशे अंधीं महातमीं ॥२७॥ ज्या तमाचेनि महाबळें । ज्ञान होऊनि ठाके आंधळें । तेथ सूर्याचे फुटती डोळे । ते तमीं लोळे तो तामस ॥ २८ ॥ ज्या तमापासूनि उपरती । हों नेणें गा कल्पांतीं । त्या अंधतमातें पावती । मूढमति अतिमंद ॥ २९ ॥ महामोहाचे परिपाटीं । नश्वर विषयासाठीं । चुकोनि अनंतसुखाची पुष्टी ।

—तो कसा बद्ध होतो तेंच अभिनय करून दाखवितात—

अहो मे पितरौ वृद्धौ—अहो ! माझीं आई व बाप म्हातारीं झालीं आहेत. बालात्मजा भार्या–जिचीं मुलें लहान आहेत अशी माझी भार्या आहे, आत्मजाः माम् ऋते अनाथाः दीनाः दुःखिताः कथं जीवन्ति–माझीं अपत्यें माझ्यावांचून अनाथ, दीन, दुःखित होऊन कशीं जिवंत रहातील ! ५७.

'माझी माता व पिता तर केवळ वृद्ध झालीं आहेत, भार्या लहान आहे, मुलें-बाळें तान्हीं लेंकरें आहेत, यांच्यापासून मी दूर झालों तर तीं तत्काळ प्राणच सोडतील.' ५२० अशा प्रकारें तो मूढ गृहस्थ स्वतःच्या मरणानंतर काय होईल याची भयंकर कल्पना करून कुटुंबाची कशी चिंता वहात असतो, ती ऐक. २१ 'कदाचित् मला जर अकालीं मरण आलें, तर या माझ्या बायकोची व मुलांची काय बरें स्थिति होईल !' असें म्हणून तो अश्रु ढाळूं लागतो. २२ 'आई-बापांचें एक राहों. (तीं म्हातारीं आहेत. मरणाच्या पंथाला लागतील.) पण माझ्या बायकोचें मात्र शोकानें हृदय फुटून जाईल. लहान बचव्यांचा आक्रोश करून घसा कोरडा पडेल.' असा मनांत विचार आणून तो स्वतःचें कपाळ बडवून घेतो. २३ 'मी मेल्यावर हीं माझीं लाडकीं बायका-मुलें दुःखामुळें जिवंत तरी कशीं राहातील !' अशी तो जिवंत असलेल्या माणसांचीच काळजी करीत बसतो. म्हणून तो मूढमति होय. २४ अशाप्रकारें मूर्खपणाचें अपार भरतें जेथें येतें, तेथें विपरीतार्थाच्या वाऱ्यानें विवेकाची नौका खात्रीनें बुडून जाते. ५२५.

एवं अयं गृहाशयाक्षिप्तहृदयः मूढधीः अतृप्तः तान् अनुध्यायन् मृतः अन्धंतमः विशते–याप्रमाणें हा गृहस्थ गृहासक्तीनें ज्याचें हृदय सर्व प्रकारें चंचल आहे, ज्याची बुद्धि मूढ आहे व जो अतृप्त आहे असा होत्साता त्या गृहादिकांचेंच चिंतन करितो व तामसी योनींत प्रवेश करितो. ५८.

याप्रमाणें जो गृहस्थ गृहासक्तीनें लुब्ध झालेला, विषयांविषयीं सदा अतृप्त, सतत स्त्री-पुत्रादिकांतच लोलुप व अंतःकरणानें मोहित झालेला असतो, २६ त्याची बुद्धीहि मोहाच्या मोहकत्वामुळें मूढ होते. अशा स्थितींत जो मरण पावतो, तो अंधतम-नांवाच्या नरकाला प्राप्त होतो. २७ त्या अज्ञानाच्या प्रवाहानें ज्ञान आंधळें होतें व जेथें सूर्याचेहि नेत्र फुटून जातील अशा गाढ अंधतमांत तो तामसी जीव लोळत पडतो. २८ तो मतिमंद, मूढ जीव ज्यांतून कल्पांतींहि वर निघतां येत नाहीं अशा अंधमताला प्राप्त होतो. २९ तो महामोहानें क्षणभंगुर विषयासाठीं

दुःखकोटी भोगिती ॥ ५३० ॥ यालागीं मनुष्यदेहीं जाण। करोनियां भगवद्भजन। चुकवावें जन्म-मरण। आपणा आपण उद्धरावें ॥ ३१ ॥ जीवा जे जे योनीं जन्मगती। तेथ तेथ विषयासक्ती। तेचि मनुष्यदेहीं विषयस्थिती। तैं परमार्थप्राप्ती कोणे देहीं ॥३२॥ विशेषें उत्तमोत्तम। प्राप्त जाहल्या ब्राह्मणजन्म। ज्याचे नित्यकर्मीं परब्रह्म। अतिसुगम सहजचि ॥३३॥ ज्यासी वर्ततां अहोराती। संध्यावंदनविधानस्थिती। त्रिकाळ पापाची निवृत्ती। जाण निश्चितीं ब्राह्मणा ॥ ३४ ॥ सकळ साराची सारमूर्ती। तो गायत्रीमंत्र ज्याचे हातीं। वेद मुखाची वास पाहती। एवढी प्राप्ती ब्राह्मणा ॥ ३५ ॥ ब्राह्मणाचे हृदयीं जाण। वेद-रूपें नारायण। स्वयें राहिला आपण। धन्य ब्राह्मण त्रिलोकीं ॥ ३६ ॥ ज्या ब्राह्मणासी सदा जाण। शिरीं वंदिती सुरगण। ज्या ब्राह्मणाचा श्रीचरण। स्वयें नारायण हृदयीं वाहे ॥ ३७ ॥ जयाअंगीं एक रती। पाप न राहे संध्येहातीं। यालागीं ब्राह्मण पुण्यमूर्ती। स्वयें रमापति बोलिला ॥ ३८ ॥ ज्याची भगवंत करी वर्णना। 'किं पुनर्ब्राह्मणाः पुण्याः'। भगवद्गीतावचना। त्या सत्यत्व जाणा या हेतू ॥ ३९ ॥ ब्राह्मण आणि भगवद्भक्त। तैं सकळ भाग्य आलें तेथ। त्यासी कोण अर्थ अप्राप्त। ज्याचे बोलांत हरि तिष्ठे ॥५४०॥ ते काष्ठपाषाणप्रतिमें पहा वो। प्रतिष्ठिती तेथ प्रकटे देवो। एवढा ब्राह्मणीं सद्भावो। सहजान्वयो सामर्थ्य ॥ ४१ ॥ पावोनियां ब्राह्मणजन्म। जो करी क्षुद्र विषयकर्म। त्याचे हातींचा गेला पुरुषोत्तम। अंधतम तो पावे ॥ ४२ ॥ एका जनार्दनाची विनंति। येऊनि मनुष्यदेहाप्रती। करोनियां भगवद्भक्ती। निजात्मप्राप्ती साधावी ॥ ५४३ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धव संवादे ब्रह्मचर्यगृहस्थकर्मधर्मनिरूपणे एकाकारटीकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

अनंतसुखाचें स्थान चुकवून दुःखराशी भोगीत रहातो. ५३० म्हणून मनुष्यदेह प्राप्त झाला असतां भगवद्भजन करून जन्म-मरण चुकवावें व आपणच आपला उद्धार करावा. (सु. गी. ६—५ पृ. १२३) ३१ जीव जेवढ्या योनींमध्यें जन्म घेतो, तेवढ्या सर्व देहांत विषयासक्ति आहेच. मग मनुष्यदेहांतहि जर विषयासक्ति ठेविली तर मग परमार्थप्राप्ति कोठच्या जन्मांत करणार! ३२ विशेषेंकरून उत्तमोत्तम ब्राह्मणजन्म प्राप्त झाला असतां त्याच्या नित्यकर्मानेंच परब्रह्म अतिशय सुलभ होतें. ३३ प्रत्यहि त्रिकाल संध्यावंदन केलें असतां ब्राह्मणाच्या पातकाची निवृत्ति होते. ३४ सगळ्या साराचेंहि मूर्तिमंत सारच असा गायत्री मंत्र त्यांच्या हातीं असतो व साक्षात् वेद तर त्याच्या मुखाची वाट पहात असतात. अशी ब्राह्मणांची योग्यता आहे. ३५ ज्या ब्राह्मणांच्या हृदयांत स्वतः नारायण वेदरूपानें राहिला ते ब्राह्मण त्रैलोक्यांत धन्य होत. ३६ ज्या ब्राह्मणांच्या चरणांना देव शिरसा वंदन करितात, त्या ब्राह्मणांचे चरण स्वतः नारायण आपल्या हृदयावर वहातो. ३७ संध्यावंदन करीत असल्यामुळें त्यांच्या अंगीं रेसभरहि पातक रहात नाहीं. म्हणून ब्राह्मण पुण्यमूर्ति आहेत, असें स्वतः श्रीपति सांगत आहे. ३८ याच कारणानें भगवानानें स्वतः भगवद्गीतेंत 'किं पुनर्ब्राह्मणाः पुण्याः०' म्ह० मग पुण्यवान् ब्राह्मणांविषयीं काय सांगावें! (सु. गी. ९—३३ पृ. १८९.) असें त्यांच्या योग्यतेचें वर्णन केलें आहे. ३९ आधींच ब्राह्मण आणि त्यांत भगवद्भक्त असला तर सगळीं भाग्यें त्याच्या पायाशीं येतात. साक्षात् हरि त्यांच्या अर्ध्या वचनांत असतो; ५४० मग त्यांना अप्राप्त असें काय आहे! लांकूड, दगड इत्यादिकांच्या प्रतिमेंत ब्राह्मणांनीं प्रतिष्ठा करितांच देव प्रकट होतो. ब्राह्मणांमध्यें एवढा सद्भाव व सहज सामर्थ्य असतें. ४१ सारांश, अशाप्रकारचा श्रेष्ठ ब्राह्मणजन्म प्राप्त झाला असूनहि जो क्षुद्र विषयांत लोलुप होऊन रहातो, त्यानें आपल्या हातचा पुरुषोत्तम घालविला म्हणून समजावें. तो ब्राह्मण 'अंधतम-'नांवाच्या नरकाला प्राप्त होतो. यास्तव मनुष्यदेहाला प्राप्त होऊन भगवद्भक्ति करावी व आत्मप्राप्ति साधावी, अशी एका-जनार्दनाची विनंति आहे. ५४३.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील ब्रह्मचर्य-गृहस्थकर्मधर्मनिरूपण नांवाचा सतरावा अध्याय समाप्त झाला.